कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २९ मे २०२६

किंमत ४ ₹

आज अकरावी प्रवेशाची पहिली यादी

मुंबई : अकरावी प्रवेश प्रक्रियेतील पहिली गुणवत्ता यादी शुक्रवारी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध होणार आहे. प्रवेश पोर्टलवर कनिष्ठ महाविद्यालय वाटपाची यादी उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांना ३ जूनपर्यंत प्रवेश निश्चित करावा लागणार आहे. राज्यात अकरावी प्रवेशासाठी सुमारे १२ लाख ५१ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, त्यापैकी ९ लाख ८ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज लॉक केले आहेत. यंदा पहिल्या गुणवत्ता यादीचा 'कट ऑफ' अधिक राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या यादीत प्रवेश मिळणार नाही, त्यांना पुढील फेरीपूर्वी महाविद्यालयांचा पसंतीक्रम बदलण्याची संधी मिळणार आहे.

जनगणनेच्या कामात चार शिक्षकांचा मृत्यू

मुंबई : जनगणनेच्या कामासाठी जात असताना मावळ तालुक्यातील शिक्षिका दीपाली तांबे यांचा भीषण अपघातात मृत्यू झाला आहे. जुना पुणे-मुंबई महामार्गावरील कान्हे फाटा येथे भरधाव डंपरने त्यांच्या मोपेडला जोरदार धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे शिक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.विशेष म्हणजे, जनगणनेच्या कामादरम्यान मृत्यू झालेल्या शिक्षकांची संख्या आता चारवर पोहोचली आहे. यापूर्वी कोल्हापूर येथील भगवान पाटील, सांगोला येथील राजाराम ढोले यांचा हृदयविकाराने, तर लातूर येथील सुंदरम वांगसकर यांचा अपघातात मृत्यू झाला होता.

वे|ध|क

नीट परीक्षेची जबाबदारी लष्करावर?

नवी दिल्ली : देशभरात प्रचंड खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती दिवसागणिक वाढत चालली आहे. भविष्यात असा कोणताही दगाफटका टाळण्यासाठी आणि परीक्षेची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी केंद्र सरकारने आता थेट भारतीय लष्कराची मदत घेण्याची तयारी सुरू केल्याची माहिती समोर येत आहे. आगामी परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका फुटू नयेत यासाठी लष्कराकडे गुप्तता आणि सुरक्षेची जबाबदारी सोपवण्याबाबत सरकारकडून गंभीर विचार सुरू आहे. या संदर्भात दिल्लीत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह अन्य महत्त्वाच्या मंत्र्यांची आणि अधिकाऱ्यांची एक उच्चस्तरीय बैठक झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

उर्दू शायर बशीर बद्र यांचे निधन


नवी दिल्ली : साहित्याच्या जगातून एक अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. आधुनिक गझलेचे उस्ताद मानले जाणारे प्रसिद्ध उर्दू शायर बशीर बद्र यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी निधन झाले आहे. ते दीर्घकाळापासून आजारी होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच साहित्यविश्वात आणि त्यांच्या लाखो चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे. बशीर बद्र यांच्या साहित्यातील अतुलनीय योगदानासाठी केंद्र सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९३५ रोजी उत्तर प्रदेशातील अयोध्या येथे झाला. त्यांनी अलीगढ मुस्लिम विद्यापीठातून आपले उच्च शिक्षण आणि पीएचडी पूर्ण केली.

डी.के. शिवकुमार कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री

नवी दिल्ली : कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी गुरुवारी लोकभवनात जाऊन त्यांचा राजीनामा सुपूर्द केला आहे. राज्यपाल थावरचंद गेहलोत हे सध्या राज्यात नसल्याने त्यांनी राज्याच्या सचिवांकडे आपला राजीनामा सोपवला आहे. सिद्धरामय्या यांची जागा सध्याचे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार घेणार आहेत. पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार मी आज राजीनामा दिला आहे. राज्यपाल हे सध्या राज्यात नसल्याने त्यांच्या सचिवांकडे माझा राजीनामा सुपूर्द केला आहे, असे सिद्धरामय्या यांनी सांगितले. डी.के. शिवकुमार यांच्या शपथविधीबाबत अद्याप अधिकृत घोषणा झाली नसली तरी ३० मे रोजी त्यांचा शपथविधी पार पडणार असल्याची चर्चा आहे.

अलिबागमध्ये महिलेचा विनयभंग

रायगड : अलिबागमध्ये एका महिलेचा विनयभंग करण्यात आला आहे याप्रकरणी त्या व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पीडित महिलेने अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला कामावर जात असताना वारंवार त्यांचा पाठलाग आरोपी करीत होता. तसेच २१ जानेवारी ते २१ मे २०२६ या कालावधीत त्याने तिचा विनयभंग केला. तिच्या मनात लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले. त्यामुळे आरोपीविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आचारसंहितेच्या विळख्यात 315 शाळा संकटात

निविदा प्रक्रियेलाच ब्रेक; शाळा सुरू होण्यापूर्वी शिक्षण विभागाची धावपळ

प्रमोद जाधव

▌रायगड ▌

रायगड जिल्हा परिषदेकडील तब्बल ३१५ शाळा नादुरुस्त अवस्थेत असून, त्यांच्या दुरुस्तीसमोर आता निवडणूक आचारसंहितेचा मोठा अडथळा उभा राहिला आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू झालेल्या आचारसंहितेमुळे शाळा दुरुस्तीची प्रक्रिया रखडण्याची शक्यता निर्माण झाली असून, शिक्षण विभागाची मोठी तारांबळ उडाली आहे. दुरुस्तीची कामे सुरू करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यापासून इतर प्रशासकीय कामांपर्यंत अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाची विशेष परवानगी घेतल्याशिवाय ही कामे पुढे सरकणे कठीण असल्याचे चित्र आहे.

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या अखत्यारित एकूण २ हजार ४७३ शाळा असून, त्यामध्ये सुमारे ९५ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. निसर्ग चक्रीवादळ, अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील ३१५ शाळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अलिबाग, कर्जत, खालापूर, महाड, माणगाव, मुरूड, पेण, रोहा, सुधागड, म्हसळा आणि पोलादपूर तालुक्यातील शाळांना सर्वाधिक फटका बसला आहे. त्याखालोखाल उरण, तळा, श्रीवर्धन आणि पनवेल तालुक्यातील प्रत्येकी पाच ते दहा शाळा बाधित झाल्या आहेत.

या शाळांच्या दुरुस्तीसाठी तब्बल २५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने जिल्हा नियोजन समिती, जिल्हा परिषद सेस फंड तसेच केंद्र सरकारच्या समग्र शिक्षण अभियानाकडे २५ कोटी ८३ लाख रुपयांची मागणी केली आहे.

सध्या जिल्हा परिषद शाळांना उन्हाळी सुट्टी असून १४ जूनपासून शाळा सुरू होणार आहेत. शाळा सुरू होण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना अनेक शाळांची अवस्था गंभीर आहे. काही शाळांच्या भिंती तडकल्या आहेत, खिडक्या व पत्रे खराब झाली आहेत, तर काही शाळांच्या इमारती जीर्ण अवस्थेत पोहोचल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने दुरुस्ती होणे आवश्यक असतानाच आचारसंहितेमुळे ही कामे रखडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शाळा दुरुस्तीसाठी शिक्षण विभागाने नियोजन पूर्ण केले होते. मात्र, विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने निविदा प्रक्रिया आणि निधीविषयक हालचालींवर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे शाळा सुरू होण्यापूर्वी दुरुस्ती पूर्ण होईल का, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नुकसान झालेल्या शाळांवर दृष्टीक्षेप

अलिबाग – ३५, कर्जत – २४, खालापूर – ३८, महाड – २४, माणगाव – २०, म्हसळा – १९, मुरूड – २६, पनवेल – ०८, पेण – ३३, पोलादपूर – १४, रोहा – ३५, श्रीवर्धन – ०६, सुधागड – १८, तळा – ०५, उरण – १० एकूण – ३१५

> जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे. जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माध्यमातून विशेष दुरुस्तीसाठी निवडणूक आयोगाची मान्यता घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ज्या शाळांच्या इमारती अत्यंत धोकादायक अवस्थेत आहेत, त्या शाळांच्या दुरुस्तीला प्राधान्य दिले जाईल.
>
> – ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी, रायगड जिल्हा परिषद

महाविकास आघाडी ठरवेल त्याप्रमाणेच उमेदवार

शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे संकेत



▌रायगड ▌जिल्हा प्रतिनिधी ▌

कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाने संघटनात्मक हालचालींना वेग दिला असून, महाविकास आघाडी जो निर्णय घेईल, त्यानुसार उमेदवार उभा केला जाईल, असे स्पष्ट संकेत शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी दिले. कार्यकर्त्यांनी त्याच पद्धतीने निवडणुकीची तयारी करून ताकदीने कामाला लागावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, या निवडणुकीत शेकापच्या मतदारांची भूमिका निर्णायक मानली जात आहे. या पार्श्वभूमीवर अलिबाग येथील शेकाप भवन येथे गुरुवारी (दि. २८) महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

या बैठकीला माजी आमदार बाळाराम पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते नारायण घरत, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, अलिबाग नगरपरिषदेचे वीज व बांधकाम सभापती •➤ पान २ वर

अल्पवयीन मुलगी हत्या प्रकरण

२४ तासांत आरोपीला बेड्या

▌माणगाव ▌प्रतिनिधी ▌

माणगाव तालुक्यातील घरोशीवाडी येथे १५ वर्षीय मुलीची निर्घृण हत्या करून तिचा मृतदेह जंगलात फेकून दिल्याच्या धक्कादायक प्रकरणात माणगाव पोलिसांनी अवघ्या २४ तासांत आरोपीला ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

पळसगाव ग्रामपंचायत हद्दीतील घरोशीवाडी येथे राहणाऱ्या निधी उतेकर या अल्पवयीन मुलीचा मृतदेह बुधवारी जंगल परिसरात आढळून आला होता. उतेकर कुटुंबीय उन्हाळी •➤ पान २ वर

शाळा 'अनधिकृत' असल्याचा दावा खोटा

▌रायगड ▌जिल्हा प्रतिनिधी ▌

अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथील आरसीएफ स्कूल अनधिकृत असल्याचा दावा शिक्षण विभागाने स्पष्ट शब्दांत फेटाळून लावला आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कर्मचाऱ्यांमार्फत सुरू असलेल्या शाळेत कोणताही अनुचित प्रकार घडल्यास किंवा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास आरसीएफ प्रशासन जबाबदार राहणार नाही, असे पत्र आरसीएफ प्रशासनाने माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना दिल्यानंतर पालकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, माध्यमिक शिक्षणाधिकारी महारुद्र नाले यांनी ही शाळा मान्यताप्राप्त असून, अनधिकृत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

अलिबाग तालुक्यातील थळ येथे सुमारे ४५ वर्षांपूर्वी खतनिर्मितीचा आरसीएफ प्रकल्प उभारण्यात आला. त्यानंतर कुरुळ परिसरात आरसीएफ कर्मचारी वसाहत उभी राहिली. कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या मुलांसह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचलित आरसीएफ स्कूल सुरू करण्यात आली. गेली अनेक दशके ही शाळा आरसीएफ वसाहतीच्या परिसरात कार्यरत असून, या शाळेतून अनेक गुणवंत विद्यार्थी घडले आहेत. राज्य आणि देशपातळीवर या शाळेतील विद्यार्थ्यांनी नाव कमावले आहे. अलिबाग तालुक्यातील सुडकोली ते रेवस परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी या शाळेत येतात.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि आरसीएफ व्यवस्थापन यांच्यातील अंतर्गत करारानुसार गेली ४५ वर्षे शाळा सुरू होती. मात्र, काही कारणांमुळे डेक्कन एज्युकेशन सोसायटीने २०२४ पासून शाळा चालविण्यास असमर्थता दर्शविल्याचे आरसीएफ प्रशासनाकडून सांगण्यात आले. हे प्रकरण शिक्षण उपसंचालकांपासून जिल्हा परिषद शिक्षण विभागापर्यंत गेले. •➤ पान २ वर



आरसीएफ प्रशासनाच्या पत्रावर शिक्षणाधिकाऱ्यांची भूमिका

> आरसीएफ शाळा मान्यताप्राप्त आहे. ती कोणत्याही परिस्थितीत अनधिकृत नाही. शिक्षण विभागाशिवाय कोणालाही शाळा अनधिकृत असल्याचे जाहीर करण्याचा अधिकार नाही. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शाळा सुरू ठेवण्याबरोबरच प्रवेश प्रक्रियेसंदर्भात मुख्याध्यापकांना आवश्यक पत्र देण्यात आले आहे.
>
> – महारुद्र नाले, शिक्षणाधिकारी, माध्यमिक विभाग



महाडमध्ये भीषण अग्नितांडव

▌महाड ▌प्रतिनिधी ▌

महाड शहरातील मुख्य बाजारपेठेत बुधवारी मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीने एकच खळबळ उडाली. महात्मा गांधी मार्गावरील व्यापारी सुभाष शेठ यांच्या संजय ऑइल ट्रेडिंग कंपनीच्या तीन मजली गोदामाला अचानक आग लागून संपूर्ण गोदाम जळून खाक झाले. आग इतकी भीषण होती की महाड नगरपालिका, औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन दल तसेच रोहा आणि माणगाव येथून बोलावण्यात आलेल्या अग्निशमन दलाला तब्बल सात तास शर्थीचे प्रयत्न करून आग नियंत्रणात आणावी लागली. या आगीत करोडो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

बुधवारी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास गोदामातून धूर आणि आगीच्या ज्वाळा बाहेर येताना शेजारी राहणाऱ्या वैष्णव कुटुंबीयांच्या •➤ पान २ वर

भरमसाठ वीज बिलाविरोधात महिलेचा टाहो!

- **महावितरण कार्यालयात तीन महिन्यांपासून हेलपाटे**
- **अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ केल्याचा आरोप**

▌रायगड ▌जिल्हा प्रतिनिधी ▌

भरमसाठ वीज बिलामुळे त्रस्त झालेल्या एका महिलेने अखेर महावितरण कार्यालयाबाहेरच टाहो फोडत संताप व्यक्त केला. गेल्या तीन महिन्यांपासून कार्यालयात फेऱ्या मारूनही संबंधित अधिकाऱ्यांनी समस्येचे निराकरण केले नाही, असा गंभीर आरोप या महिलेने केला आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या कारभारामुळे संतप्त झालेल्या या महिलेची व्यथा सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.



बुधवारी दुपारी अलिबाग येथील महावितरण कार्यालयाबाहेर संबंधित महिलेने अतिरिक्त कार्यकारी अभियंता तायडे आणि अभियंता वैभव डफळ यांच्याविरोधात जोरदार संताप व्यक्त करत त्यांना निलंबित करण्याची मागणी केली. या प्रकारामुळे महावितरण प्रशासनाविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील उज्ज्वला आळशी असे या महिलेचे नाव आहे. सर्वसामान्य कुटुंबातील असलेल्या या महिलेच्या घरात महावितरणचे जुने मीटर बसविण्यात आले होते. संबंधित मीटरची तपासणी •➤ पान २ वर

महाराष्ट्रासह कर्नाटक, गोव्यात मागणीत वाढ **कोळी बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण**

रायगडातून हजारो टन सुकटीची निर्यात

▌रायगड ▌जिल्हा प्रतिनिधी ▌

रायगड जिल्ह्यात सध्या सुका जवळा अर्थात सुकटीचा हंगाम जोरात सुरू असून, बाजारपेठांमध्ये सुकटीला मोठी मागणी निर्माण झाली आहे. पावसाळ्यात मासेमारी बंद राहणार असल्याने सुकी मासळी खरेदी करून साठवून ठेवण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. स्थानिक बाजारपेठेसह महाराष्ट्रातील विविध जिल्हे तसेच कर्नाटक आणि गोवा राज्यांत सुक्या जवळ्याला मोठी मागणी असून, आतापर्यंत सुमारे तीन हजार टन सुक्या जवळ्याची निर्यात झाल्याची माहिती समोर आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा जवळ्याला चांगला दर मिळाल्याने मच्छिमारांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. पावसाळ्यात समुद्र •➤ पान २ वर



(छायाचित्र : समीर मालोदे)



> यंदा मोठ्या प्रमाणात जवळा जाळ्यात सापडला. गतवर्षीपेक्षा यंदा जवळ्याला चांगला दर मिळाला आहे. काही ठिकाणी सुका जवळा १०० ते २०० रुपये किलो दराने विकला गेला. रायगडसह कोल्हापूर, सातारा, सांगली तसेच कर्नाटक आणि गोवा राज्यात सुमारे तीन हजार टन जवळ्याची निर्यात झाली आहे.
>
> – विजय गिदी, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबई



रिलायन्सविरोधात प्रकल्पग्रस्तांचा एल्गार

२ जूनपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा

। नागोठणे । प्रतिनिधी ।

रिलायन्स (पूर्वीची आयपीसीएल) कंपनीतील प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रधारकांना कायमस्वरूपी नोकरी देण्याच्या शासन आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेने आता आक्रमक भूमिका घेत रिलायन्स व्यवस्थापन आणि जिल्हाधिकारी प्रशासनाविरोधात एल्गार पुकारला आहे. प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा यासाठी २ जूनपासून अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा संस्थेकडून देण्यात आला आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीजच्या नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजनमध्ये प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रधारकांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याचे स्पष्ट आदेश महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांनी रायगड जिल्हाधिकारी आणि रिलायन्स व्यवस्थापनाला दिले होते. मात्र, या आदेशानंतरही कोणतीही ठोस अंमलबजावणी न करता केवळ वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप प्रकल्पग्रस्तांकडून करण्यात आला आहे.

भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था-चोळे ते नागोठणे यांच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून लढा सुरू आहे. रिलायन्स नागोठणे प्रकल्पात कायमस्वरूपी नोकरीपासून वंचित राहिलेल्या ३२४ प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्रधारकांच्या प्रश्नावर २४ जून २०२५ रोजी मंत्रालयात महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक झाली होती. त्यानंतर राज्याचे उद्योगमंत्री यांच्या दालनात झालेल्या बैठकीनंतर ३२४ प्रकल्पग्रस्तांना रिलायन्सच्या नागोठणे प्रकल्पात कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याचे लेखी आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले होते.

मात्र, शासन आदेश असूनही रिलायन्स नागोठणे कंपनीचे वरिष्ठ अधिकारी प्रकल्पग्रस्तांना नोकरीत घेण्याबाबत टाळाटाळ आणि आडमुठेपणाची भूमिका घेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेने २ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनामुळे रिलायन्स प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर येण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

दरम्यान, या बेमुदत आंदोलनाची रणनीती ठरवण्यासाठी रविवार, ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता शिवराय कार्यालय, आंबेघर येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला सर्व प्रकल्पग्रस्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेचे अध्यक्ष गंगाराम मिणमिने, उपाध्यक्ष रोशन जांबेकर आणि सचिव राकेश जवके यांनी केले आहे.

इंधन दरवाढ मोदी सरकारचे पाप : सपकाळ

। मुंबई । प्रतिनिधी ।

पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजी दरवाढीसाठी केंद्रातील मोदी सरकारच जबाबदार असून, आत्मनिर्भरतेचे गाजर दाखवत अर्थव्यवस्थेकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात आल्याचा घणाघाती आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. इंधनटंचाईचे संकट दिसत असतानाही पंतप्रधान नरेंद्र मोदी हे निवडणूक प्रचारात व्यस्त होते, त्यामुळे देशवासियांना मोठी किंमत मोजावी लागत असल्याचे त्यांनी म्हटले.

मुंबईतील टिळक भवन येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, २०१४ पासून मोदी सरकारने सातत्याने इंधन दरवाढ करून सरकारी व खासगी तेल कंपन्यांना फायदा करून दिला. योग्य नियोजनाऐवजी कंपन्यांचे हित जपल्याने आज इंधन व गॅसटंचाईचा फटका सामान्य नागरिक, हॉटेल व्यवसाय, छोटे उद्योग आणि घरगुती वापरकर्त्यांना बसत आहे.

महिनाभरापासून पाणीपुरवठा बंद

- नागरिकांमध्ये तीव्र नाराजी
- नवीन ठेकेदार नेमण्याची मागणी

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा तालुक्यातील तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी नवीन ठेकेदार नेमण्यात यावा अशी मागणी तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना अध्यक्ष महादेव चांगु पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना ही चार ग्रामपंचायतींच्या अंतर्गत असून, या योजनेत आठ गावे व बारा वाड्यांचा समावेश आहे. मात्र, या योजनेद्वारे नागरिकांना सातत्याने पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. सध्या गेल्या २५ दिवसांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे बंद असल्याने नागरिकांना मोठ्या पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

निवेदनात नमूद करताना त्यांनी या योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या टेंडरची मुदत आता संपलेली असून, यापूर्वी हे काम जयवंत आवेरे, म्हसळा यांच्याकडे होते. मात्र, त्यांनी योजनेच्या देखभालीकडे गांभीर्याने लक्ष दिले



नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.तसेच त्यांच्याकडे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने छोट्या दुरुस्तीच्या कामांनाही अनेक दिवस लागत असल्याने पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामुळे भविष्यात नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा मिळण्यासाठी योजनेच्या देखभाल दुरुस्तीचे नवीन टेंडर देताना नवीन सक्षम ठेकेदाराची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी महादेव पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

'भांडवलदारांसाठी मुंबईचा सौदा?'

मुंबई : मुंबईतील मोकळ्या जागा, मैदाने आणि रक्तपेढ्यांच्या खासगीकरणाच्या प्रस्तावांवरून शिवसेना नेते, युवा सेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सरकार सर्वसामान्यांच्या हिताला डावलून धनाढ्यांच्या फायद्यासाठी निर्णय घेत असल्याचा आरोप केला. शिवसेनेने मुंबई जपली आणि जोपासली मात्र हे सरकार मुंबई विकण्याच्या तयारीत आहे, असा घणाघात त्यांनी केला. सरकार सत्तेत आल्यानंतर मुंबईतील महत्त्वाच्या जागांबाबत अनेक वादग्रस्त प्रस्ताव पुढे आणण्यात आले. बांद्रा येथील मैदान प्रदर्शन केंद्रासाठी वापरण्याचा प्रस्ताव होता तर मलबार हिल परिसरातील मैदान एका व्यावसायिकाला देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच 'वर्षा' बंगल्यालगतच्या भूखंडाबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. यामधील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे मुंबईतील रक्तपेढ्यांच्या खासगीकरणाचा प्रस्ताव असल्याचे आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

केदारनाथ यात्रेदरम्यान हेमंत डोंबे यांचे निधन

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत शहरातील दहिवली येथील समर्थ नगरमध्ये राहणारे उद्योजक आणि माजी नगरसेवक हेमंत तथा नंदू दत्तात्रेय डोंबे यांचे केदारनाथ यात्रेदरम्यान निधन झाले. कुटुंबियांसमवेत केदारनाथ यात्रेसाठी गेले असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि त्यानंतर त्यांची प्राणज्योत मालवली. निधनसमयी ते ६८ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने कर्जत परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



हेमंत डोंबे हे सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रात सक्रिय कार्यरत होते. त्यांच्या वडिलांनी शहरातील सुमारे दोन एकर जमीन शिक्षण संस्थेला दान दिली होती. या जागेवर कर्जत विद्या प्रसारक मंडळातर्फे स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रेय पांडुरंग डोंबे विद्या निकेतन विद्यालय सुरू करण्यात आले आहे. नुकताच या विद्यालयाचा रौप्यमहोत्सवी सोहळा उत्साहात पार पडला होता.

डोंबे यांनी श्री कपालेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष म्हणून अनेक वर्षे काम पाहिले होते. तसेच महाराष्ट्र वीरशैव सभा रायगड जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली होती. गेल्या वर्षी अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेच्या वर्गमित्रांच्या सुवर्णमहोत्सवी स्नेहमेळाव्याच्या आयोजनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या पश्चात पत्नी आणि एक कन्या असा परिवार आहे.

श्रीवर्धनमध्ये कचरा संकलनाचा बोजवारा

घंटागाड्या दोन महिन्यांपासून बंद; नागरिकांची गैरसोय वाढली

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन नगर परिषदेच्या घंटागाड्या गेल्या सुमारे दोन महिन्यांपासून नियमितपणे शहरात फिरत नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. पूर्वी शहरातील घरोघरी जाऊन कचरा संकलित करून तो डंपिंग ग्राऊंडवर टाकला जात होता. मात्र, आता कचरा संकलन व्यवस्था विस्कळीत झाल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

नगर परिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार, कचरा संकलनासाठी देण्यात आलेले जुने कंत्राट संपले असून, नवीन निविदा प्रक्रिया सुरू आहे. नवीन ठेकेदाराची नियुक्ती झाल्यानंतर कचरा संकलन पूर्ववत सुरू होईल, असे सांगितले जात आहे. मात्र, या प्रक्रियेलाही जवळपास दोन महिने उलटून गेल्याने नागरिकांनी रोजचा कचरा नेमका कोठे टाकायचा, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



ज्यांच्याकडे स्वतःच्या वाड्या आहेत ते नागरिक एखाद्या कोपऱ्यात खड्डा करून कचरा टाकत आहेत. मात्र, भाडेकरू म्हणून राहणाऱ्या नागरिकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. सध्या क्वचित एखादी घंटागाडी ध्वनिक्षेपक लावून एखाद्या रस्त्यावर फिरताना दिसते. मात्र, तीही घरोघरी जाऊन कचरा संकलन करत नसल्याने नागरिकांना तिचा उपयोग होत नाही. गाडी कधी येते आणि कधी निघून जाते हेही नागरिकांना समजत नसल्याची तक्रार आहे.

नगर परिषदेकडे एकूण ६५ सफाई कर्मचाऱ्यांची आवश्यकता असताना सध्या केवळ १६ कर्मचारी उपलब्ध असल्याची माहिती काही दिवसांपूर्वी मुख्याधिकाऱ्यांकडून देण्यात आली होती. मात्र एवढा मोठा कालावधी उलटूनही नवीन कंत्राट प्रक्रिया पूर्ण का झाली नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

दरम्यान, पावसाळा तोंडावर आला असतानाही शहरातील गटार सफाईची कामे अद्याप सुरू झालेली दिसत नाहीत. त्यामुळे आगामी काळात अस्वच्छता आणि पाणी तुंबण्याच्या समस्येची भीती व्यक्त केली जात आहे. नगर परिषद प्रशासनाने याबाबत तातडीने भूमिका स्पष्ट करून कचरा संकलन आणि गटार सफाईची कामे युद्धपातळीवर सुरू करावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

धोदाणीत सरपंच उतरले गटारात

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील धोदाणी गावात स्वच्छतेच्या प्रश्नावर सरपंचांनीच थेट गटारात उतरून साफसफाई केल्याची घटना घडली आहे. ग्रुप ग्रामपंचायत मालडुंगे अंतर्गत येणाऱ्या धोदाणी गावात काही नागरिकांकडून गटारात प्लास्टिक व कचरा टाकला जात असल्याने पावसाळ्यात पाणी तुंबण्याची समस्या निर्माण झाली होती. वारंवार सूचना देऊनही नागरिकांकडून दुर्लक्ष होत असल्याने सरपंच सीताराम चौधरी यांनी स्वतः फावडे हातात घेत गटार साफ करत नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला.



ग्रामपंचायतीकडून नाल्यांचे काँक्रिटीकरण आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात येत असतानाही गटारात टाकला जाणारा कचरा नदी व धरणाच्या पाण्यात मिसळून पर्यावरणाचा प्रश्न निर्माण होत असल्याचे समोर आले आहे. सरपंचांच्या या कृतीचे परिसरात कौतुक होत असून, स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा संदेश त्यांनी कृतीतून दिला.

पान १ वरून

२४ तासांत आरोपीला बेड्या

सुट्टीसाठी गावात आले होते. सोमवार, २५ मे रोजी रात्री सुमारे नऊच्या सुमारास निधी वडिलांच्या मोबाईलवर बोलत घराबाहेर पडली होती. मात्र, त्यानंतर ती घरी परतलीच नाही. कुटुंबियांकडून तिचा शोध सुरू असतानाच बुधवारी घरोशीवाडीच्या जंगलातील निर्जन ठिकाणी तिचा मृतदेह आढळून आला.

मुलीच्या शरीरावरील जखमा पाहता हा खुनाचा प्रकार असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला होता. घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तपासासाठी फॉरेन्सिक पथक आणि श्वान पथकालाही पाचारण करण्यात आले होते.

या गंभीर घटनेचा तपास वेगाने करत माणगाव पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे घरोशीवाडी येथीलच शुभम उतेकर (३२) याला गुरुवार, २८ मे रोजी सकाळी सातच्या सुमारास ताब्यात घेतले.

यातपासासाठीपोलीसअधीक्षकआचलदलाल,पोलीसउपअधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली चार विशेष पथके तयार करण्यात आली होती. पोलिसांकडून आरोपीची कसून चौकशी सुरू असून, हत्या नेमकी कोणत्या कारणातून करण्यात आली, याचा तपास सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी दिली.

भरमसाठ वीज बिलाविरोधात महिलेचा टाहो!

करण्यात आली असता ते सुस्थितीत असल्याचे स्पष्ट झाले होते. मात्र, त्यानंतर महावितरणकडून जुन्या मीटरच्या शेजारी स्मार्ट मीटर बसविण्यात आले. सध्या दोन्ही मीटर सुरू असल्याचा आरोप करण्यात येत असून, याच गलथान कारभाराचा फटका महिलेला बसल्याचे समोर आले आहे.

महिलेला तब्बल ६८ हजार रुपयांहून अधिक वीज बिल आल्याने ती धास्तावली आहे. हे बिल कमी करून द्यावे यासाठी गेल्या तीन महिन्यांपासून ती महावितरण कार्यालयात हेलपाटे मारत आहे. कार्यकारी अभियंता शैलेंद्र कुमार यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी अतिरिक्त कार्यकारी अभियंता तायडे यांच्याकडे पाठविले. मात्र, तायडे यांनी भेट टाळत समस्येकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप महिलेने केला आहे. अभियंता वैभव डफळ यांचाही या प्रकरणात सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

समस्येच्या गर्तेत अडकलेल्या या महिलेला न्याय देण्याऐवजी महावितरणचे अधिकारी उदासीन राहिल्याने अखेर संतप्त झालेल्या महिलेने कार्यालयाबाहेरच आक्रोश केला. डफळ यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून त्यांना निलंबित करावे, अशी मागणी तिने केली आहे. महिलांच्या सन्मानाबाबत शासनाकडून सातत्याने सूचना दिल्या जात असताना, प्रत्यक्षात महावितरण कार्यालयातील अधिकाऱ्यांना महिलेच्या समस्यांकडे लक्ष देण्यास वेळ नसल्याचे चित्र बुधवारी अलिबागमध्ये पाहायला मिळाले.

जुन्या मीटरसह त्याच जागी स्मार्ट मीटर बसवून आर्थिक लूट केल्याचा आरोपही महिलेकडून करण्यात आला आहे. ६८ हजार रुपयांच्या वीज बिलामुळे संतप्त झालेल्या महिलेने महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, तायडे आणि वैभव डफळ यांच्याविरोधात चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न?

वरसोली येथील आळशी यांच्या घरात जुने मीटर कार्यरत असतानाच नवीन स्मार्ट मीटर ''टेस्टिंग''साठी बसविण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, दोन्ही मीटर सुरू असल्याने बिलात प्रचंड वाढ झाल्याचा आरोप आहे. यासंदर्भात महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे विचारणा करण्यात आली असता एकमेकांकडे बोट दाखवत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची मागणी अधिक तीव्र झाली आहे.

जुने मीटर आहे. नवीन मीटर टेस्टिंगसाठी बसविण्यात आले आहे. पार्ट पेमेंट करण्यास साहेबांनी सांगितले आहे. बाकीची माहिती तायडे साहेब देतील. - वैभव डफळ, अभियंता, महावितरण

महाविकास आघाडी ठरवेल त्याप्रमाणेच उमेदवार

प्रशांत नाईक, उरणच्या नंदा म्हात्रे, पनवेलचे अरविंद म्हात्रे, खालापूरच्या शिवानी जंगम, उरणचे सभापती महेश म्हात्रे, साक्षी पाटील, अश्विनी ठोसर, ॲड. निवेदिता वाघमारे, शैला भगत, सागर भगत, अनिल चोपडा, ॲड. निलम हजारे, सुषमा पाटील, खालापूरचे शेकाप नेते संतोष जंगम तसेच ॲड. परेश देशमुख यांच्यासह पनवेल, उरण, खालापूर, अलिबाग, खोपोली आदी भागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शेकापचे पदाधिकारी, नगरसेवक आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जयंत पाटील म्हणाले की, कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या मतदारसंघात स्थानिक स्वराज्य संस्थांचे एक हजारहून अधिक मतदार असून, त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. महाविकास आघाडी जो निर्णय घेईल त्यानुसार उमेदवार निश्चित केला जाईल. या संपूर्ण प्रक्रियेत शेतकरी कामगार पक्षाची भूमिका निर्णायक असेल. कार्यकर्त्यांनी या निवडणुकीकडे गांभीर्याने पाहात मोठ्या ताकदीने मैदानात उतरावे, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, बैठकीनंतर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मतदारांशी संवाद साधून निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा करण्यात आली.

शाळा 'अनधिकृत'चा दावा खोटा

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षण विभागाने मध्यस्थीची भूमिका घेत शाळा सुरू ठेवण्याबाबत मार्गदर्शनपर पत्र दिले.

२०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी नियमितपणे शाळा सुरू ठेवणे तसेच नवीन प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत शिक्षणाधिकारी महारुद्र नाले यांनी एप्रिल महिन्यात पत्र दिल्यानंतर आरसीएफ स्कूलमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र, त्यानंतर आरसीएफ कंपनीचे मुख्य प्रशासकीय व्यवस्थापक महेश पाटील यांनी १५ मे रोजी जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र पाठवत गंभीर मुद्दे उपस्थित केले.

या पत्रात डेक्कन एज्युकेशन सोसायटीने स्वेच्छेने शाळेची जबाबदारी नाकारल्यामुळे शाळा व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. जून २०२४ पासून कर्मचाऱ्यांच्या वेतनाची जबाबदारी संस्थेचीच असून, आरसीएफ प्रशासन आर्थिक मदत करू शकत नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच शिक्षण विभागाच्या आदेशांवर संस्थेमार्फत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याचे नमूद करण्यात आले. विशेष म्हणजे, शिक्षण विभागाच्या आदेशानुसार डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कर्मचाऱ्यांमार्फत सुरू असलेल्या ''अनधिकृत शाळेत'' काही अनुचित प्रकार घडल्यास किंवा विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास आरसीएफ व्यवस्थापन जबाबदार राहणार नसल्याचा उल्लेख पत्रात करण्यात आला होता.

आरसीएफ प्रशासनाच्या पत्रातील ''अनधिकृत शाळा'' या उल्लेखामुळे पालकांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, शिक्षणाधिकारी महारुद्र नाले यांनी आरसीएफ प्रशासनाचा हा दावा फेटाळून लावत स्पष्ट केले की, शिक्षण विभागाशिवाय कोणालाही शाळा अनधिकृत असल्याचे घोषित करण्याचा अधिकार नाही. तसेच आरसीएफ स्कूल ही पूर्णपणे मान्यताप्राप्त शाळा असून, ती अनधिकृत नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी शिक्षण विभागाची मध्यस्थी

आरसीएफ स्कूलच्या व्यवस्थापनावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षण विभागाने मध्यस्थीची भूमिका घेतली आहे. २०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी शाळा नियमित सुरू ठेवण्याचे तसेच नवीन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे सध्या शाळेचे शैक्षणिक कामकाज पूर्ववत सुरू आहे.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीने २०२४ पासून शाळा चालविण्यास असमर्थता दर्शविली आहे. सध्या दुसरी कोणतीही संस्था शाळा चालविण्यास पुढे आलेली नाही. डेक्कन एज्युकेशन सोसायटीला इमारत वापरण्याबाबत कोणताही अधिकार नाही. त्यामुळे संबंधित पत्र देण्यात आले आहे.

– महेश पाटील,मुख्य प्रशासकीय व्यवस्थापक, आरसीएफ कंपनी, थळ

महाडमध्ये भीषण अग्नितांडव

निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ गोदाम मालकांना माहिती दिली. परिसरातील नागरिकांनी आग विझवण्यासाठी धाव घेतली, मात्र गोदामात मोठ्या प्रमाणात माचिस, खाद्यतेल, तूप आणि अन्य ज्वलनशील मालाचा साठा असल्याने काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले.

या गोदामात सुभाष शेठ यांचा घाऊक व्यापार सुरू होता. खाद्यतेल, तूप, एव्हरेस्ट मसाले तसेच वायर कंपनीच्या एजन्सीचा माल येथे साठवला जात होता. गोदामाच्या वरच्या मजल्यावर सुभाष शेठ यांचा मुलगा सेऊल शेठ, त्यांची पत्नी आणि दोन मुले राहत होती. आग लागल्याचे लक्षात येताच चिंतन वैष्णव यांनी तत्परता दाखवत संपूर्ण कुटुंबाला सुरक्षित बाहेर काढले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

घटनेची माहिती मिळताच महाड नगरपालिका आणि एमआयडीसीचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. आगीची तीव्रता वाढत असल्याने लक्ष्मी ऑरगॅनिक, प्रिव्ही ऑरगॅनिक, बिर्ला ओपस या कंपन्यांच्या अग्निशमन यंत्रणांसह रोहा आणि माणगाव येथील अग्निशमन दलालाही पाचारण करण्यात आले. आग विझवण्यासाठी ५० हून अधिक फोम ड्रम आणि ४५ पाण्याच्या गाड्यांचा वापर करण्यात आला. सुमारे ५० जवानांनी सात तास शर्थीचे प्रयत्न करून अखेर आग नियंत्रणात आणली.

दरम्यान, आगीदरम्यान एलपीजी सिलेंडरचे स्फोट झाल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली. गोदामाची इमारत जुनी आणि लाकडी स्वरूपाची असल्याने काही वेळातच संपूर्ण बांधकाम कोसळले. त्यामुळे अग्निशमन दलाला आगीच्या केंद्रापर्यंत पोहोचण्यात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

१२ तासांनंतरही गोदाम धुमसतंच

मध्यरात्री लागलेल्या आगीवर सात तासांनी नियंत्रण मिळवण्यात आले असले तरी दुपारपर्यंत गोदामातून धूर निघत होता. तब्बल १२ तासांनंतरही गोदाम धुमसत असल्याने पुन्हा एकदा अग्निशमन दलाला घटनास्थळी पाचारण करावे लागले, अशी माहिती कुटुंबियांनी दिली.

अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे शेजारचे घर बचावले

ज्या ठिकाणी आग लागली त्यालगत तंबाखू व्यापारी भगवान शेठ यांचे दीडशे वर्षे जुने लाकडी घर आहे. आग भडकत असतानाही अग्निशमन दलाने वेळीच उपाययोजना करत आग शेजारच्या घरांपर्यंत पोहोचू दिली नाही. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

रायगडातून हजारो टन सुकटीची निर्यात

खवळलेला असल्याने जूनपासून दोन महिन्यांसाठी मासेमारी बंद राहणार आहे. त्यामुळे मासळीप्रेमींना ताजी मासळी मिळणे कठीण होणार असून, पावसाळ्यापूर्वी सुकी मासळी खरेदी करण्यावर भर दिला जात आहे. वाकटी, बोंबील यांसह सुका जवळा मोठ्या प्रमाणात विकत घेऊन त्याची साठवण केली जात आहे. मार्च महिन्यापासून सुका जवळ्याचा हंगाम सुरू झाला आहे. जाळ्यात मोठ्या प्रमाणात जवळा सापडल्याने मच्छिमारांना यंदा चांगला फायदा झाला आहे. पकडलेला जवळा सुकवून, स्वच्छ करून बाजारात विक्रीसाठी पाठवण्यात येत आहे. स्थानिक बाजारपेठेबरोबरच राज्यातील विविध जिल्हे आणि बाहेरील राज्यांमध्येही जवळ्याची मोठ्या प्रमाणात निर्यात करण्यात आली आहे.

गतवर्षी दहा किलो जवळ्यामागे ७३० ते ८०० रुपये दर मिळत होता. मात्र, यंदा दहा किलो जवळ्यासाठी दीड हजार ते दोन हजार रुपयांपर्यंत दर मिळाल्याची माहिती महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघाचे माजी अध्यक्ष विजय गिदी यांनी दिली. रायगड जिल्ह्यातील अलिबाग आणि मुरूड तालुक्यांतून मोठ्या प्रमाणात जवळ्याची निर्यात झाली आहे.

यंदा रायगडसह कोल्हापूर, सातारा, सांगली, नगर या जिल्ह्यांमध्ये तसेच कर्नाटक आणि गोवा राज्यात सुक्या जवळ्याची मागणी लक्षणीयरीत्या वाढली आहे. आतापर्यंत सुमारे तीन हजार टन जवळा विविध बाजारपेठांमध्ये पाठवण्यात आला असून, त्यामुळे मच्छिमारांना आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा झाल्याचे सांगितले जात आहे.

शेकडो हातांना रोजगार

ओला जवळा बोटीतून उतरवणे, तो सिमेंट काँक्रीटच्या खळ्यांमध्ये सुकण्यासाठी पसरवणे, त्यानंतर त्याची स्वच्छता करणे तसेच सुका झालेला जवळा भरून ठेवणे अशी विविध कामे गेल्या महिनाभरापासून सुरू आहेत. या कामांमुळे परिसरातील अनेक महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. दररोज ५०० ते ७०० रुपये मजुरीवर हे काम दिले जात आहे. काही ठिकाणी दहा ते पंधरा तर काही ठिकाणी पाच ते सात महिला या प्रक्रियेत कार्यरत आहेत. त्यामुळे दोन ते तीन महिन्यांच्या हंगामात शेकडो हातांना रोजगार मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

शेणाच्या खळ्यांची जागा सिमेंट काँक्रिटने घेतली

पूर्वी मार्च महिन्यात जवळा सुकवण्यासाठी शेण आणि माती वापरून पारंपरिक खळ्या तयार केल्या जात होत्या. जमीन सपाट करणे, शेण-माती आणणे आणि खळी तयार करण्यासाठी मोठा खर्च करावा लागत होता. मात्र, हा खर्च टाळण्यासाठी आता सिमेंट काँक्रीटच्या खळ्यांचा वापर वाढला आहे. त्यामुळे पारंपरिक शेणाच्या खळ्या आता कालबाह्य होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

मच्छिमारांना आर्थिक मदत करा

जून महिन्यापासून दोन महिन्यांसाठी मासेमारीवर बंदी लागू होणार आहे. या कालावधीत हजारो मासेमारी बोटी किनाऱ्यावरच उभ्या राहतील. त्यामुळे मच्छिमारांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. रोजगाराचे साधन बंद राहिल्याने आर्थिक अडचणी निर्माण होणार असल्याने सरकारने प्रत्येक मच्छिमार कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी १० ते २० हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघाचे माजी अध्यक्ष विजय गिदी यांनी केली आहे.

नावात बदल

जाहीर कळविण्यात येते की, ''सौरभ नाखवा'' आणि ''सौरभ जनार्दन नाखवा'' ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असून, सदर दोन्ही नावांनी ओळखली जाणारी व्यक्ती एकच आहे. यापुढे आवश्यक त्या सर्व व्यवहारांसाठी ''सौरभ जनार्दन नाखवा'' हे नाव ग्राह्य धरावे/नोंद घ्यावी.

Affidavit No.- 265204177126860043912O

नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर | शहरातून रोज हजारो टन कचरा जमा

लाडवलीच्या कचरा डेपोला आग





कचरा पेटवल्याची चर्चा

पावसाळा जवळ आला असताना लाडवली कचरा डेपोमध्ये साठलेल्या मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे वर्गीकरण होणे अशक्य असल्याने व या कचऱ्याचे दुर्गंधीयुक्त पाणी नदीत जाण्याची शक्यता असल्याने पावसाळ्यापूर्वीच हा कचरा पेटवून देण्याचे काम झाल्याची चर्चा या परिसरातील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे

। महाड । प्रतिनिधी ।

महाड नगर परिषदेच्या लाडवली येथील कचरा डम्पिंग ग्राऊंडला गुरुवारी (दि.२८) मे रोजी सकाळी सातच्या सुमारास आग लागली. आगीमुळे कचरा पूर्णपणे जळून नष्ट झाल्याने या परिसरातील गावांमध्ये धुरामुळे प्रदूषण झाले. मात्र, ही आग शॉर्ट सर्किटने लागल्याचे महाड नगर परिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांनी सांगितले. मात्र, कचरा डेपोतील कचऱ्याचे वर्गीकरण होत नसल्याने व मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग लागल्याने तसेच पावसाळा जवळ आल्याने या कचऱ्याचे करायचे काय यामुळे ही आग जाणीवपूर्वक लावली गेल्याचे या परिसरातील ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मात्र, या कचरा डेपो बाबत येत्या आठ दिवसात निर्णय न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक ग्रामस्थ इलियास ढोकले यांनी महाड नगर परिषदेच्या प्रशासनाला दिला आहे.

महाड नगर परिषदेचे व महाड औद्योगिकवसाहतीतीलअग्निशामक दलाने ही आग विझवण्याचे प्रयत्न केले. मात्र, ही या आगीचे कारण अद्याप गुलदस्त्यात असल्याचे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आगीमुळे कचरा पूर्णपणे जळून नष्ट झाल्याने या परिसरातील गावांमध्ये धुरामुळे प्रदूषण झाले आहे.

नगर परिषदेच्या लाडवली येथील कचरा डेपोमुळे या परिसरातील नागरिकांना प्रदूषणाचा त्रास होत असल्याने एप्रिल महिन्यामध्ये या परिसरातील नागरिकांनी नगरपालिकेवर धडक देऊन नगराध्यक्ष सुनील कविस्कर व मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांच्याकडे निवेदन देऊन डम्पिंग ग्राऊंड बंद करण्याची मागणी केली होती. महाड शहरातून गोळा होणारा रोजचा हजारो टन कचरा हा लाडवली येथील डम्पिंग ग्राऊंडवर नेला जातो. मात्र, या कचऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर लाडवली, गोडाळे देऊळकोंड व या परिसरातील २१ वाड्यांना मोठ्या प्रमाणावर या कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे या परिसरातील नागरिकांना श्वसनाचा व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याची तक्रार या परिसरातल्या ग्रामस्थांनी महाड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मांडली आहे.

हार्बर मार्गावर फास्ट लोकल होणार सुरू



। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल ते सीएसएमटी प्रवाशांसाठी हार्बर रेल्वे मार्गावर लवकरच फास्ट लोकल सेवा सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट (MUTP-4) अंतर्गत या प्रकल्पासाठी सल्लागार नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सध्या हार्बर लाईनवर मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी होत असून, त्यामुळे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. फास्ट लोकल सुरू झाल्यानंतर सीएसएमटी ते पनवेल दरम्यानचा प्रवास अधिक जलद होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे प्रवाशांचा वेळही वाचणार आहे.

या प्रकल्पांतर्गत नवीन रेल्वे मार्ग, आधुनिकसिग्नलयंत्रणा आणि अतिरिक्त सुविधा उभारण्यावर रेल्वे प्रशासन भर देत आहे. फास्ट हार्बर लोकलमुळे मुंबई आणि नवी मुंबई दरम्यानचा प्रवास अधिक सोयीस्कर आणि वेगवान होणार असून, मध्य रेल्वेवरील गर्दी कमी करण्यासही मदत होणार आहे. रेल्वे प्रशासनाच्या या पावलामुळे लाखो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

शेतकऱ्यांसाठी कृषी प्रदर्शनाचे आयोजन

रायगड : अलिबाग तालुक्यातील पांडवादेवी येथील पाटील ब्रदर्स हॉलमध्ये शेतकऱ्यांसाठी परिषद आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. हवामान बदल, कृषी, फलोत्पादन, सेंद्रिय सिंचन, मार्केटींग, प्रक्रीया, ऊर्जा, शितगृह गोदाम परिषदेचे आणि सिध्देश्वर ॲग्रोटेक प्रदर्शन घेतले जाणार आहे. शनिवारी (दि.३०) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती परिषदेचे मुख्य संयोजक व महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली. पणन विभागाचे संचालक शरद जरे, थळ येथील आरसीएफ कंपनीचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, राष्ट्रीय शेअर बाजारचे मुख्य अर्थतज्ञ तिर्थंकार पटनाईक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, एसक्यूएम इंडिया प्रा.लि.चे संचालक व हेड मार्केटींग दत्तात्रेय पेरे, रॉयल कॉलेज ऑफ सायन्स, कॉमर्स डोंबिवलीचे प्राचार्य डॉ. विवेककुमार पाटील, इंडियन ग्रीन हाऊसचे अध्यक्ष विश्वास जोगदंड, युनिव्हर्सल बायोकेमचे संचालक विश्वास सोंडकर, आदी मान्यवरांचे मार्गदर्शन राहणार आहे. यावेळी सेंद्रिय उत्पादने, कृषी औषधे, कृषी फलोत्पादनासाठी लागणारी साधने, अन्नधान्य साठवण प्रक्रीया यासाठी विविध कंपन्यांची उत्पादनांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. दुपारी एक ते रात्री आठ यावेळेत हे प्रदर्शन भरविले जाणार आहे. या प्रदर्शनात वनविकास महामंडळ मर्यादीत अंतर्गत वेगवेगळ्या झाडांची रोपे, बीपीसीएल व आरसीएफची कृषी फलोत्पादनासाठी असलेली उत्पादने, महिला बचत गटामार्फत पापड, लोणची, वेगवेगळ्या पध्दतीचा गुळाचा चहा, खाद्य पदार्थ, सुगंधीत मेणबत्ती, अगरबत्ती, साबण, कपडे, साड्या व खाद्य पदार्थांचे स्टॉल असणार आहेत. दरम्यान शेतकऱ्यांना सेंद्रिय खत, व बियाण्यांचे नमुने वाटप केले जाणार आहेत.

अश्लील वर्तन केल्याने गुन्हा दाखल

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

घरी चालत जात असलेल्या महिलेला धक्का देऊन तिच्यासोबत अश्लील वर्तन केल्याप्रकरणी कौशल राम चौधरी (रा. छोटा खांदा गाव) याच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २५ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला पोलिसांनी २७ मे रोजी अटक करण्यात आली. यातील फिर्यादी पीडित महिला या २५ मे रोजी धाकटा खांदा गावातील गणपती मंदिरासमोरील रस्त्यावरून घरी पायी चालत जात होत्या. यावेळी आरोपीने त्यांना धक्का मारला आणि त्यांच्यासोबत अश्लील वर्तन केले. त्यानंतर त्यांना शिवीगाळ करत दमदाटी केली. याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

ऐतिहासिक विहिरीवर भरावाचे संकट

। वावोशी । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील होराळे आणि आपटी ग्रामपंचायत हद्दीच्या सीमेलगत सध्या मोठ्या प्रमाणावर उत्खनन आणि मातीच्या भरावाचे काम सुरू आहे. या भरावामुळे परिसरातील नैसर्गिक जलप्रवाह धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे, या ठिकाणी असलेला पारंपरिक नैसर्गिक नाला आधीच भराव टाकून बंद करण्यात आल्याचे दिसून येत आहे. या नाल्यालगत काही अंतरावर असलेली प्राचीन चौकोनी आकाराची विहीर आता नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष बाब म्हणजे, या ऐतिहासिक ठेव्याकडे स्थानिक ग्रामस्थ किंवा संबंधित यंत्रणांचे अद्याप गांभीर्याने लक्ष गेले नसून या ठिकाणी उत्खनन, भराव आणि बंद करण्यात आलेला नैसर्गिक नाला यासोबतच प्राचीन स्थापत्यशैलीतील ही विहीर निदर्शनास आली आहे.



स्थानिकांच्या माहितीनुसार, ही विहीर अहिल्याबाई होळकर यांच्या कालखंडातील असल्याचे सांगितले जाते. विहिरीच्या बांधकामामध्ये वापरण्यात आलेले कोरीव दगडी चिरे, चौकोनी आकाराची रचना आणि पारंपरिक स्थापत्यशैली पाहता ही वास्तू ऐतिहासिक वारसा असल्याचे स्पष्ट जाणवत आहे. मात्र, अनेक वर्षांपासून दुर्लक्षित अवस्थेत पडून असलेल्या या विहिरीकडे प्रशासनाने कोणतेही संवर्धनात्मक पाऊल उचलले नसल्याची खंत व्यक्त होत आहे. सध्या सुरू असलेले भरावाचे काम विहिरीच्या अगदी काठापर्यंत पोहोचल्याचे दिसून येत आहे. पुरातत्व विभाग आणि महसूल प्रशासनाने तात्काळ या ठिकाणाची पाहणी करून संबंधित ऐतिहासिक वास्तूचे जतन व संवर्धन करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. आधीच प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही प्राचीन विहीर पडीक अवस्थेत पोहोचली आहे. अशातच आता सुरू असलेल्या उत्खनन आणि भरावामुळे हा ऐतिहासिक ठेवा कायमचा नष्ट होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

खांदा कॉलनीतून इसम बेपत्ता

। पनवेल । प्रतिनिधी ।

राहत्या घरातून मित्राला भेटून येतो असे सांगून एक इसम घराबाहेर पडला तो अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अशोक भेंडखळे (३६, रा. खांदा कॉलनी) उंची ५ फुट ३ इंच, रंग सावळा, शरीर बांधा मजबूत, चेहरा गोल, डोक्याचे केस समोरील बाजूस टक्कल पडलेले, मागील बाजूस काळे आहेत. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल फोन आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा के.बी. भोई यांच्याशी संपर्क साधावा. याबाबत अधिक तपास खांदेश्वर पोलीस करीत आहेत.

JNPA
जनेप प्राधिकरण JNPA
INDIA'S LARGEST CONTAINER PORT
37 YEARS

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण

भविष्यासाठी सज्ज पोर्ट

साजरे करीत आहे भारताच्या प्रगतीला चालना देणारे ३७ वे वर्ष



जगभरातील २०० हून अधिक प्रमुख बंदरांशी जोडलेले

भारताच्या प्रमुख बंदरांद्वारे हाताळल्या एकूण कंटेनर वाहतूकी पैकी ५४% पेक्षा जास्त वाहतूक हाताळणी

सीपीपीआय निर्देशांक २०२४ नुसार भारतात प्रथम आणि जागतिक स्तरावर २३ व्या क्रमांकावर

भारताचे पहिले १००% लँडलॉर्ड पोर्ट (Landlord Port)

१५+ मीटर खोल ड्राफ्टसह पाच कंटेनर टर्मिनल्स

तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' (Ease of Doing Business) वर लक्ष केंद्रित

निर्यातीला गती देणारे समर्पित विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) येथे कार्यरत

जेएनपीएने २०२५ मध्ये ६०% पेक्षा जास्त हरित नवीकरणीय ऊर्जा (Green Renewable Energy) वापर साध्य केला

भारताच्या एकूण सीमाशुल्क (Customs) महसुलात २१% योगदान

सोशल मीडिया हँडल्स: /JNPORT /JNPort /JNPAPort /JNPA - Jawaharlal Nehru Port Authority संपर्क माहिती, माहितीसाठी, जेएनपीए हेल्पलाईन नंबर. 1800 228 282 वर कॉल करा www.jnport.gov.in

आयोगाला मैदान मोकळे

मतदारयादीची विशेष तपासणी मोहीम उर्फ एसआयआर सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवली आहे. यामुळे निवडणूक आयोगाला दिलासा वगैरे बातम्या छापून आल्या आहेत. पण यात अनेक प्रकारचे विरोधाभास आहेत. मुळात मतदारांची तपासणी करायला कोणाची हरकत असण्याला कारणच नव्हते. उद्या बँकांना कर्ज देणे सर्वोच्च न्यायालयाने ठरवले कायदेशीर किंवा वैध अशाही बातम्या छापून येऊ शकतात. कर्ज देणे हे बँकांचे जितके मूलभूत काम आहे, तितकेच मतदारयाद्या तपासणे, त्यांच्यात बदल करणे, नावे काढून टाकणे किंवा नवीन नावे घालणे हे निवडणूक आयोगाचे मूलभूत काम आहे. मूळ मुद्दा ज्या रीतीने बिहारमध्ये ही प्रक्रिया रेटण्यात आली तिला होता. गेल्या वर्षी जूनमध्ये अचानक बिहारमध्ये ही मोहीम सुरु करण्यात आली. त्याची कोणतीही जाहीर घोषणा करण्यात आली नाही. इंडियन एक्स्प्रेसमध्ये आलेल्या एका बातमीमुळे अनेकांना ही प्रक्रिया सुरू झाल्याचे कळले. ती बातमी आल्यानंतर ही प्रक्रिया रुटीन प्रशासकीय बाब असल्याचे भासवण्याचा आधी प्रयत्न झाला. यापूर्वी अशाच मोहिमा कशा हाती घेतल्या गेल्या आहेत याचे दाखले दिले गेले. विशेष म्हणजे निवडणूक आयोगापेक्षाही भाजपचे प्रवक्ते अशी स्पष्टीकरणे देण्यात आघाडीवर होते. एकूणच हा संशयास्पद मामला होता व पुढे तो तसाच शाबीत झाला. बिहारमध्ये विधानसभा निवडणुकांना केवळ दोन अडीच महिने बाकी होते. अशा वेळी तपासणीच्या नावाखाली दणादण नावे वगळली गेली. २००३ ही कटऑफ डेट धरली गेली. त्यावेळच्या यादीत आपले नाव होते हे सिध्द करण्याची जबाबदारी मतदारांवर टाकली गेली. ज्यांची नावे नसतील त्यांच्या आईबापांची जन्मतारीख, त्याचा दाखला इत्यादी तपशील मागितला गेला. शिवाय हे सर्व काम ज्यांना कोणतेही प्रशिक्षण दिले गेलेले नाही अशा हंगामी तत्वावर सरकारातून उधार घेतलेल्या बीएलओ नामक कर्मचाऱ्यांवर टाकले गेले. अंतिमतः ६५ लाख मतदारांची नावे वगळली गेली. हे सर्व जण मयत झालेले आहेत किंवा गाव सोडून स्थलांतरीत झाले आहेत किंवा त्यांच्या पत्त्यावर सापडत नाहीत अशी कारणे त्यासाठी दिली गेली.

बंगालमधील गडबडींकडे दुर्लक्ष

विरोधकांचा आक्षेप या सर्व घाईगर्दीला व गडबडगुंडा करून प्रक्रिया रेटण्याला होता. प्रक्रिया सुरू झाल्यानंतर लगेच एका महिन्यातच तिला आक्षेप घेणारी याचिका दाखल करण्यात आली. त्यावेळी वैध मतदार असल्याचा पुरावा देण्यासाठी जी कागदपत्रे होती त्यात आधारकार्डाचा समावेश नव्हता. तो करण्याचा आदेश न्यायालयाने दिला. तरीही आयोगाने त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात टाळाटाळ केली. हा एकच नव्हे तर असे अनेक प्रकार त्या दरम्यान घडले. निवडणूक आयोग दांडगाई करून, अशास्त्रीय रीतीने ही प्रक्रिया पुढे रेटत आहे हे स्पष्ट दिसत होते. तरीही सर्वोच्च न्यायालयाने तिला स्थगिती दिली नाही. तब्बल सात महिने या याचिकेवर सुनावणी झाली. तिच्या दरम्यान न्यायालयाने आयोगाला धारेवर धरल्यासारखे केले. पण, मोहिमेच्या आड कोणी येत असेल तर आम्ही सहन करणार नाही असा इशाराही एका टप्प्यावर दिला. खरे तर याचिकेचे भवितव्य काय आहे आणि न्यायालय काय विचार करते आहे हे तेव्हाच स्पष्ट झाले होते. तरीही विशेष म्हणजे न्यायालयाने जानेवारीमध्ये आपला निर्णय राखून ठेवला. त्यानंतर पाच राज्यांच्या निवडणुका झाल्या. बंगालमध्ये या मोहिमेच्या नावाने कहर झाला. तिथे एकूण ९१ लाख मतदारांची नावे वगळली गेली. त्याची वेगळी सुनावणी चालू राहिली. पण मोहिम स्थगित झाली नाही. उलट त्या दरम्यान न्यायालयाने तेव्हाच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सरकारला दम भरणारी अनेक वक्तव्ये केली. त्यावरूनही न्यायालयाचा कल स्पष्ट झाला. बंगालमध्ये नावे व आडनावांची स्पेलिंग्ज आळीपाळीने वापरली जातात. पूर्वीचे बंडोपाध्याय किंवा चट्टोपाध्याय आता बॅनर्जी किंवा चॅटर्जी झाले आहेत. बंगालमध्ये सुमारे २७ टक्के मुस्लिम आहेत. त्यांच्या महंमद या अत्यंत लोकप्रिय नावाचे स्पेलिंग मनाला येईल तसे केले जात असते. इतकी वर्षे लोकांनी ते समजून घेतले. निवडणूक आयोगाने मात्र त्याबाबत शंका उपस्थित करून थेट त्यांना बेदखल करून टाकले. महाराष्ट्रात कुलकर्णी हे आडनाव अनेक प्रकारे लिहिले जाते. उद्या त्याच्या आधारे मतदारांना नोटिसा निघू लागल्या तर केवढा अनर्थ होईल. तोच प्रकार बंगालात झाला. तब्बल २७ लाख मतदारांना अशाच फुटकळ कारणांवरून मतदारयादीतून काढून टाकण्यात आले.

नागरिकत्वाचा प्रश्न

सर्वोच्च न्यायालयाने याची सुनावणी करण्यासाठी माजी न्यायमूर्तींची ट्रायब्यूनल्स नेमली. पण त्यांचे कामकाज बहुसंख्य ठिकाणी होऊच शकले नाही. परिणामी लाखो लोक मतदानापासून वंचित राहिले. हा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा सर्वोच्च न्यायमूर्तीबाई म्हणाल्या की, यावेळी नाही मिळाली संधी तर काय झाले, पुढच्या वेळी मतदान करा. गंमत म्हणजे याच सर्वोच्च न्यायालयाने बिहारच्या निवडणुकीच्या वेळी एकाही वैध मतदाराचा हक्क काढून घेतला जाणे खपवून घेतले जाणार नाही असे म्हटले होते. हा इशारा ना तिथे प्रत्यक्षात आला ना बंगालमध्ये. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा कालचा निर्णय अपेक्षित असाच होता. या निर्णयामुळे निवडणूक आयोगाला आता मतदार तपासणीच्या नावाखाली याद्या कशाही तयार करण्याची जणू सूट मिळाली आहे असे विरोधकांचे म्हणणे आहे. ते खोटे म्हणता येणार नाही. बेकायदा नागरिक व घुसखोर यांची नावे काढून टाकण्यासाठी ही मोहीम आवश्यक आहे असाही एक आयोगाचा युक्तिवाद होता व सर्वोच्च न्यायालयाला तो फारच आवडलेला दिसतो. पण बिहार किंवा बंगालमध्ये ज्या मतदारांची नावे वगळण्यात आली त्यांच्यामध्ये किती घुसखोर होते हे सरकारने जाहीर केलेले नाही. याच संदर्भात एखादा मतदार हा वैध नागरिक आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. पण हे फसवे विधान आहे. कारण याच निकालात असेही म्हटले आहे की, एखाद्याचे नागरिकत्व वैध नाही असे आयोगाला वाटले तर त्या आधारे त्याचे नाव मतदारयादीतून वगळले जाऊ शकते. म्हणजे, एखाद्याच्या नागरिकत्वावर संशय घेऊन मतदारयादीतून काढून टाकण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. अशा संशयामुळे ज्याचे नाव वगळले जाईल त्याला अपील करून दाद मागण्याचा अधिकार आहे अशी अत्यंत उदार वाटणारी सवलत न्यायालयाने दिली आहे. पण ती फसवी आहे. अपिलात जाण्याइतके पुरेसे पुरावे त्या नागरिकाकडे आहेत असे गृहित धरले तर तेच पुरावे निवडणूक आयोग का मान्य करणार नाही असा यातला कळीचा मुद्दा आहे. या एकाच मुद्द्यावरून यातला सर्व पक्षपातीपणा उघड व्हावा. ही मोहिम भाजपला फायदेशीर ठरेल अशा रीतीने मतदारयाद्यांची रचना करणे यासाठीच होती हे अनेक तपशीलांवरून योगेंद्र यादव यांच्यासारख्यांनी आजवर दाखवून दिले आहे. निवडणूक आयोग हा मोदी सरकारसाठी काम करतो हे त्यातून दिसले होतेच. सर्वोच्च न्यायालय या अन्यायावर व पक्षपातीपणावर प्रहार करील अशी अंधुकशी आशा होती. पण काल त्यावर पाणी पडले. आयोगाला आता पूर्ण मैदान मोकळे झाले आहे.

विचार

गरज चुकीच्या धोरणांविरोधातील युद्धाची!

सरकारने आणि समाजाने मिळून ताज्या युद्धजन्य परिस्थितीतून कोणते दीर्घकालीन धोरणात्मक धडे घ्यायचे, हे तपासत आर्थिक धोरणांमधील उणिवा ओळखायला हव्यात. या मुद्द्याचा विचार खरे तर, देशाच्या दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेच्या आणि परराष्ट्र संबंधांच्या संदर्भाने केला पाहिजे. परंतु नरेंद्र मोदी बारा महिने चोवीस तास निवडणुकीच्या प्रचारसभेतच भाषण करण्याच्या गिअरमध्ये असतात. ही अधिक चिंतेची बाब आहे.

अजित अभ्यंकर

जगभरात निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती ही केवळ सीमांवर लढली जाणारी लढाई नसते; तिचे परिणाम प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेवर, समाजावर आणि सामान्य नागरिकांच्या जीवनावर होत असतात. आजची वाढती महागाई हे त्याचेच उदाहरण आहे. त्यामुळे 'आपल्यावर या युद्धाचे परिणाम होणार नाहीत' असे आपण ठामपणे म्हणू शकत नाही. उलट, आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशासाठी ही परिस्थिती भविष्यात अधिक गंभीर ठरू शकते. मात्र प्रत्येक संकटात एक संधी दडलेली असते. मोठा आजार जसा माणसाला स्वतःच्या जीवनशैलीकडे नव्याने पहायला भाग पाडतो, तसेच हे युद्ध भारताला आपल्या आर्थिक धोरणांचा पुनर्विचार करण्याची संधी देत आहे. या मुद्द्याचा विचार खरे तर देशाच्या दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेच्या आणि परराष्ट्र संबंधांच्या संदर्भानेच केला पाहिजे. परंतु सरकारकडून तसे होताना दिसत नाही. कारण नरेंद्र मोदी १२ महिने २४ तास निवडणुकीच्या प्रचारसभेतच भाषण करण्याच्या गिअरमध्ये असतात. ते कधीच भारताचे पंतप्रधान म्हणून बोलत नाहीत. त्यामुळे बंगाल, तामिळनाडू, केरळच्या निवडणुकांच्या प्रचारात देशासमोर कोणतेही आर्थिक आव्हान नाही, असे सांगणारे मोदी निवडणुका संपल्यानंतर आर्थिक आणीबाणी असल्याप्रमाणे आवाहने करत आहेत. राजकीय व्यवस्थेला विश्वासात घेण्यापेक्षा विरोधी पक्षांवर मात करणे, त्यांना देशद्रोही ठरवणे हा मोदी-शहांचा एकमेव अग्रक्रम दिसतो. ही बाब आर्थिक स्थितीपेक्षादेखील चिंताजनक आहे.

मोदी सरकारची गेल्या दहा वर्षांमधील बहुतेक आर्थिक धोरणांची दिशा निश्चितपणे अयोग्य होती. पण तरीही आज निर्माण झालेले प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून भारताने स्वीकारलेल्या आर्थिक धोरणांचा आणि त्यामागील विचारसरणीचा परिणाम आहे. हे युद्ध मोदी सरकारला तसेच भारताला स्वतःच्या आर्थिक धोरणांमधील उणिवा ओळखण्याची संधी देत आहे. सरकारने आणि समाजानेही या संधीचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. तसेच समाजाने सरकारवर योग्य ती धोरणे राबवण्यासाठी दबाव आणला पाहिजे. या प्रक्रियेत सर्वात मोठा आणि चिंताजनक मुद्दा म्हणजे भारतीय रुपयाची घसरण. डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य सातत्याने कमी होत आहे. प्रत्येक डॉलरपोटी ९५-९६ रुपयांवर असलेली रुपयाची किंमत भविष्यात आणखी मोठ्या प्रमाणात घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. रुपयाची किंमत घसरण्यामागे प्रामुख्याने तीन कारणे आहेत-त्यातील सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे भारताचे क्रूड ऑईलवरील प्रचंड अवलंबित्व आणि क्रूडच्या वाढत्या किंमती. भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो. युद्धामुळे तेलाच्या किंमती वाढल्या की भारताला अधिक डॉलर मोजावे लागतात. पूर्वी भारताच्या आयात खर्चातील सुमारे २० टक्के हिस्सा क्रूड ऑईलवर खर्च होत होता; आता तो २५ ते ३० टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

ही अतिरिक्त डॉलरची गरज भागवण्यासाठी निर्यात वाढवावी लागेल. पण युद्धजन्य परिस्थितीमध्ये जागतिक व्यापार मंदावला आहे. ज्या देशांना भारत निर्यात करतो, तेच पश्चिमी देश आर्थिक संकटात सापडले तर त्यांच्या खरेदीक्षमतेवर परिणाम होतो. उद्योग बंद पडतात, मागणी कमी होते आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम होतो. अशा वेळी भविष्यात भारताची निर्यात वाढण्याऐवजी कमी होण्याची शक्यता अधिक आहे. परिणामी, परकीय चलनाचा तुटवडा निर्माण होण्याचा धोका वाढतोय. परदेशात राहणारे भारतीय हा भारतासाठी परकीय चलनाचा आणखी एक मोठा स्रोत आहेत. लाखो भारतीय विदेशात काम करतात आणि भारतातील कुटुंबियांना पैसे पाठवतात. परंतु युद्धामुळे पश्चिमी देशांमधील प्रकल्प, रिफायनरी बंद पडत आहेत, उद्योगांमध्ये मंदी येत आहे आणि रोजगाराच्या संधी कमी होत आहेत. त्यामुळे भविष्यात भारतात येणाऱ्या या परकीय चलनात घट होऊ शकते. याच वेळी भारतात येणारी परकीय गुंतवणूकही कमी होत असल्याचे दिसते. उलट, काही श्रीमंत भारतीयांनी परदेशात गुंतवणूक करण्यास आणि परदेशी नागरिकत्व स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. जहाज बुडण्याची चाहूल लागली की उंदीर आधी बाहेर पडतात, अशी उपमा अनेकदा दिली जाते. भारतातील धनिक उद्योजक हे जहाजावरचे उंदीर आहेत, आर्थिक अस्थिरतेच्या भीतीमुळे काही मोठे भांडवलदार आपला पैसा भारताबाहेर हलवत आहेत. यामुळे भारतातून डॉलर बाहेर जातो आणि परकीय चलनावरील दबाव अधिक वाढतो. सरकारसमोर ही केवळ आर्थिक नाही तर धोरणात्मक विश्वासार्हतेचीही समस्या आहे. या संपूर्ण परिस्थितीमध्ये सोन्याचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भारतात सोन्याला सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या विशेष स्थान आहे. पण हेच सोने भारतीय अर्थव्यवस्थेच्या गळ्याला लागलेला फास ठरत आहे.

भारतात वापरले जाणारे बहुतांश सोने आयात केले जाते. मागील वर्षी भारताने सुमारे ७१५ टन सोने आयात केले, तर एका दशकाची सरासरी ८०० टनांच्या आसपास आहे. केवळ दागिन्यांसाठीच नाही, तर मोठ्या प्रमाणात काळा पैसा साठवण्यासाठीही सोन्याचा वापर केला जातो, अशी टीका अनेक अर्थतज्ज्ञ करतात. सोन्याच्या बिस्किटांमध्ये आणि बारमध्ये पैसा लपवला जातो. काही ठिकाणी भ्रष्ट व्यवहारांमध्येही सोन्याचा वापर होतो, अशी चर्चा आहे. त्यामुळे सोन्याची मागणी सतत वाढत राहते. या संदर्भात सरकारच्या धोरणांमधील विसंगती अधिक ठळकपणे दिसते. एका बाजूला नागरिकांना सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केले जाते, तर दुसऱ्या बाजूला काही काळ सोन्यावरील आयात शुल्क कमी करून आयातीला चालना दिली जाते. सरकारने २०२३ मध्ये सोन्यावर १५ टक्के असलेला कर सहा टक्के एवढा खाली आणला. तेव्हा सोन्याची जास्त आयात व्हावी, असे उघड उद्दिष्ट होते. आता परिस्थिती गंभीर झाल्यावर बारा मे २०२६ रोजी शुल्क सहा टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवले गेले. २०१५ मध्ये सरकारने गोल्ड बाँड योजना आणली. लोकांनी प्रत्यक्ष सोने खरेदी करण्याऐवजी आर्थिक गुंतवणूक करावी हा त्यामागील उद्देश होता. पण नंतर सोन्याच्या किंमती वाढू लागताच सरकारची भूमिका बदलली.

खरे पाहता भारताने सोन्याच्या अतिरेकी आयातीवर कठोर नियंत्रण आणण्याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. सोन्याच्या आयातीवर बंदी आणण्याऐवजी सरकार अत्यंत कमकुवत धोरण अवलंबत आहे. अशा बदलत्या धोरणांमुळे सरकारची दीर्घकालीन आर्थिक दिशा स्पष्ट दिसत नाही. गेली अनेक दशके याबाबत सक्त उपाययोजना झालेल्या नाहीत. भारताच्या वाढत्या तेल आयातीमागे आणखी एक महत्त्वाचा सामाजिक आणि आर्थिक बदल कारणीभूत आहे. मध्यमवर्गीय माणसासाठी कार ही आता केवळ गरज नाही, तर प्रतिष्ठेचे प्रतीक बनली आहे. सरकारनेही रेल्वेचा विस्तार करण्याऐवजी वाहन उद्योगाला मोठे प्रोत्साहन दिले. महामार्ग, एक्सप्रेस वे आणि रोड नेटवर्क मोठ्या प्रमाणात विकसित करण्यात आले. परंतु इंधनाच्या दृष्टीने सर्वात किफायतशीर आणि स्वस्त वाहतूक व्यवस्था मानल्या जाणाऱ्या रेल्वेसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले. कमी खर्चात मोठ्या प्रमाणात प्रवासी आणि माल वाहून नेण्याची क्षमता रेल्वेकडे आहे. तरीही खासगी वाहनांना अधिक प्रोत्साहन मिळाल्याने तेलाची मागणी झपाट्याने वाढली. मुळातच मर्यादित असणाऱ्या रेल्वेमार्गांवरच 'वंदे भारत'सारख्या वेगवान आणि आकर्षक गाड्या सुरू झाल्या, पण सामान्यांसाठी आवश्यक असलेली व्यापक रेल्वे क्षमता आणि मालवाहतूक व्यवस्था तितक्या प्रभावीपणे मजबूत झाली नाही. भारताला क्रूड ऑईलवरील अवलंबित्व कमी करायचे असेल तर रेल्वे आणि सार्वजनिक वाहतूक सक्षम करणे अपरिहार्य आहे. अन्यथा, तेलाच्या वाढत्या किंमतींचा फटका बसत राहील. पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती हा ही लोकांच्या संतापाचा विषय बनला आहे.

मोदी सरकार सत्तेत आले तेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑईलची किंमत सुमारे १०८ डॉलर प्रति बॅरल होती. त्यानंतर अनेक वर्षे ती ६० ते ७० डॉलरपर्यंत खाली राहिली. तरीसुद्धा भारतातील पेट्रोल-डिझेलचे दर फारसे कमी झालेले दिसले नाहीत. उलट, आंतरराष्ट्रीय बाजारात तेल स्वस्त असतानाही सरकारने त्यावरील कर वाढवले. गेली किमान पाच वर्षे भारतात पेट्रोल शंभर रुपयांच्या पुढे होते. म्हणजेच केवळ आंतरराष्ट्रीय बाजार नव्हे, तर सरकारची कररचनादेखील महागाईसाठी मोठ्या प्रमाणात जबाबदार ठरते. अप्रत्यक्ष करांमुळे सर्वसामान्य माणसावर अतिरिक्त आर्थिक भार पडतो. खरा प्रश्न असा आहे की सरकारने महसूल कुठून आणायचा? त्याचे उत्तर म्हणजे कररचनेत बदल. महागाई कमी करण्याचा हा एक उपायच.

अप्रत्यक्ष करांवर जास्त अवलंबून राहण्याऐवजी प्रत्यक्ष करांचे प्रमाण वाढवण्याची गरज आहे. कॉर्पोरेट प्रॉफिट टॅक्स, इन्कम टॅक्स आणि उच्च उत्पन्न गटावरील करवसुली अधिक प्रभावीपणे केली पाहिजे. कारण अप्रत्यक्ष करांचा सर्वाधिक फटका गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना बसतो. पेट्रोल, डिझेल, सेवा आणि वस्तूंवरील वाढते कर अखेरीस महागाई वाढवतात. आज भारतासमोरील संकट केवळ युद्धामुळे निर्माण झालेले नाही; तो अनेक वर्षांच्या धोरणात्मक विसंगतींचा परिणाम आहे. देशातील श्रीमंत लोक करसवलतींसाठी परदेशी नागरिकत्व स्वीकारत असतील, भांडवल विदेशात नेत असतील आणि देशातील उत्पादनक्षम गुंतवणूक कमी होत असेल, तर हा सरकारच्या धोरणात्मक अपयशाचाही विषय आहे. ताज्या युद्धाने भारताला एक कठोर वास्तव दाखवले आहे. आयात, तेल, सोने आणि परकीय भांडवल यांवर अवलंबून राहून दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य निर्माण होऊ शकत नाही. भारताला स्वावलंबी, उत्पादनक्षम आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवायचे असेल, तर आता कठोर पण दूरदृष्टीचे निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

चर्चा आजची

शिक्षणाची अग्निपरीक्षा

सुयोग आंग्रे

अलीकडेच, वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परीक्षेचा नीट युजी चा पेपर फुटल्याची माहिती मिळताच सरकारने तो रद्द करून पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. या परीक्षेला बसलेल्या २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची घोर निराशा होणे स्वाभाविक आहे. त्यांनी आधीच दिलेल्या परीक्षेची पुन्हा तयारी करण्यास भाग पाडले. स्पर्धा परीक्षा दिल्यानंतर विद्यार्थी तणावमुक्त निकालाची प्रतीक्षा करतात. यावेळी त्याची प्रतीक्षा तर लांबलीच, शिवाय त्याला पुन्हा परीक्षेची तयारीही करावी लागली. या सर्व बाबींकडे नवलकर नजरेने पाहण्यापेक्षा गांभीर्याने पहिले पाहिजे कारण शिक्षण व्यवस्था आता पोखरली गेली असून कोणत्याही क्षेत्रातील शैक्षणिक पदवी विकत घेतली जात असल्याचे हे जिवंत उदाहरण आपल्या समोर आले आहे. यापूर्वी शिक्षणाचा बाजार मांडल्याचे सर्वदूर माहिती होते, परंतु प्रत्यक्ष पुराव्यांअभावी बोलणे अवघड होते आता. पुरावे सापडलेतरीसरकर बरोबर समाजमाध्यमांचा अबोला कायम आहे. कोणत्याही विद्यार्थ्याने ज्या उत्साहाने परीक्षा दिली आहे, त्याच उत्साहाने परीक्षा देणे कठीण आहे. नीट पेपर लीक प्रकरणामुळे, परीक्षा आयोजित करणारी संस्था, नॅशनल टेस्टिंग एजन्सी ला कठोर टीकेला सामोरे जावे लागले कारण त्यांच्या सतर्कतेच्या अभावामुळेनीटचे पेपर लीक झाले होते. यानंतरही विद्यार्थ्यांच्या हिताशी तडजोड होऊ नये, यासाठी संपूर्ण परीक्षाच रद्द करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला हे चांगलेच झाले. हे पेपर फुटीचे प्रकरण उघडकीस आणले नसते किंवा दुर्लक्ष केले असते तर लाखो विद्यार्थ्यांवर अन्याय झाला असता.या सर्व प्रकरणात आपला कायदा काय सांगतो त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. दिवसाआड या पेपर फुटीप्रकरणीताब्यात घेतले जात आहे. ताब्यात घेणाऱ्यांचे चेहरे आणि ओळखीपाहिल्या तर ज्यांचा शिक्षणाशी काही संबंध नाही आणि जे वरिष्ठ पातळीवर पोहोचले आहेत अशा ठगांचा समावेश पाहायला मिळतो. या प्रकरणात पेपर तयार करणाऱ्या शिक्षकांसोबतच काही कोचिंग सेंटर्सही गोत्यात आहेत. एनईईटी पेपर लीकची चौकशी करणाऱ्या सीबीआयला असे आढळून आले आहे की या परीक्षेचे पेपर काही कोचिंग ऑपरेटर्सपर्यंत पोहोचले आणि नंतर त्यांनी ते देशाच्या अनेक भागात वितरित केले आणि पैसे कमवले. शिक्षण आणि परीक्षा या दोन्ही गोष्टी कोचिंग माफियांनी आपल्या ताब्यात घेतल्याचे दिसून येत आहे. याआधीही कोचिंग माफियांनी अनेक स्पर्धा परीक्षांचे पेपर लीक केले आहेत. अलीकडेच,नीट पेपर लीक प्रकरणात, शिक्षण मंत्रालयाच्या संसदीय समितीने शिक्षण सचिव, एनटीए प्रमुख आणि महासंचालकांसह शिक्षण मंत्रालयाच्या उच्च अधिकाऱ्यांना बोलावले. यावेळीनीट रद्द करण्याच्या मुद्द्याला राजकीय रंग देण्याचाही प्रयत्न करण्यात आला. हे चालणार नाही. एनटीए परीक्षेत तडजोड होणार नाही, अशी व्यवस्था भविष्यात संसदीय समितीने केली पाहिजे. एनटीएची व्यवस्था सुधारण्यासाठी शिक्षण मंत्रालयाने अनेक पावले उचलली असली तरी त्यांची गती मंदावली होती. या सर्व प्रकरणामध्ये निशाणी डाव्या हाताचा अंगठा या मराठी चित्रपटाची आठवण होते. गावाला साक्षर करण्यासाठी त्या चित्रपटात रंगवलेले कथानक पायाखालची वाळू सरकावणारे आणि विनोदी आभासाचे होते. त्याचबरोबर शिक्षणाच्या आयचा घो हा सिनेमा देखील याच धर्तीवर बनवण्यात आला होता. नीट २०२४ मधील अनियमितता उघडकीस आल्यानंतर, एनटीएच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राधाकृष्णन समितीच्या सर्व सूचनांची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. आता त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. परीक्षा देणाऱ्या इतर संस्थांनीही या समितीच्या शिफारशींचा विचार केला तर बरे होईल, कारण आपल्या देशात स्पर्धापरीक्षांच्या पेपरफुटीची नोंद अत्यंत लाजिरवाणी झाली आहे. अंतिम विकसित देशांमध्ये परीक्षा पेपर लीक का नाही? हा आजार फक्त भारतातच रुजल्याचे कारण काय? हा संशोधनाचा भाग आहे. कारण व्यवस्था भ्रष्टाचाराने पोखरलेली आहे. एनटीएमध्ये सुधारणा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राधाकृष्णन समितीने अनियमितता टाळण्यासाठी प्रश्नपत्रिका प्रत्यक्ष केंद्रांवर नेण्याची प्रक्रिया रद्द करण्याची शिफारस केली होती. त्याऐवजी संगणकावर आधारित परीक्षा घेण्यात यावी आणि परीक्षा सुरू होण्यापूर्वी प्रश्नपत्रिका डिजिटल पद्धतीने परीक्षा केंद्रांवर पाठवाव्यात. या समितीनेनीट दोन टप्प्यात घेण्याचे सुचवले होते. पहिला टप्पा म्हणजे स्क्रीनिंग टेस्ट आणि दुसरा टप्पा म्हणजे मुख्य परीक्षा. एनटीए आउटसोर्सिंग आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अधिक अवलंबून असल्याचे या समितीला आढळून आले होते. हे पाहता एनटीएमध्ये कायमस्वरूपी तज्ज्ञांची नियुक्ती करण्याची शिफारस केली होती. या शिफारशींनुसार परीक्षा घेतल्यास पेपरफुटी आणि विशेषत: कोचिंग माफियांना परीक्षेत खीळ घालण्याची संधी मिळणार नाही. एआयच्या आजच्या युगात अशी व्यवस्था सहज करता येते की प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र प्रश्नपत्रिका मिळते आणि डमी उमेदवारांना परीक्षेला बसू दिले जात नाही. आज भारतातील लाखो कुटुंबांना त्यांच्या मुलांनी डॉक्टर आणि अभियंता व्हावे अशी इच्छा असल्याने या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. याचा फायदा कोचिंग सेंटर्स घेत आहेत. आज प्रत्येक शहरात कोचिंग सेंटर्स उघडली आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना आठवीनंतरच कोचिंगमध्ये प्रवेश घेण्यासाठी आकर्षित करण्यास सुरुवात केली आहे. प्रत्येक स्तरावर वाढत चाललेली कोचिंग संस्कृती हा शिक्षण व्यवस्थेवरील गंभीर प्रश्न आहे.

लोकसंसद

नद्याजोड प्रकल्प राबवावा



सद्या सातत्याने होणारा हवामानातील बदल, अवेळी पडणारा पाऊस यामुळे काही ठिकाणी जास्त तर कुठे कमी पाऊस पडतो त्यामूळे गंभीर परिस्थिती निर्माण होवून अनेकांना फटका बसतो त्यावर मात करायची असेल तर नदी जोड प्रकल्प.' संपुर्ण देशांमध्ये राबवून जलसंपत्तीच्या अधिक प्रभावी आणि सुयोग्य वापरासाठी हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. मराठवाडा, विदर्भ आणि दुष्काळ यासह राज्यातील पाणीटंचाई, सिंचनाची गरज, आणि जलस्रोतांचा अपुरा वापर लक्षात घेता, विविध नद्या एकमेकांशी जोडण महत्वाचे आहे. यामुळे विविध जिल्ह्यांमध्ये पाणीपुरवठा, सिंचन सुविधा आणि जलस्रोतांच्या संरक्षणाला प्रोत्साहन मिळू शकते.विदर्भ, मराठवाडा भागांमध्ये पाणीटंचाई ही एक मोठी समस्या आहे पाणीटंचाईमुळे कृषी उत्पादनावर साहजिकच वाईट परिणाम होत असतो तसेच, नागरी क्षेत्रांमध्येही पाण्याचा प्रचंड तुटवडा जाणवतो. पाण्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना व शेतीला मोठ्या प्रमाणावर संकटांचा सामना करावा लागतो. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी 'नदी जोड प्रकल्प' एक महत्त्वपूर्ण उपाय ठरू शकतो.नदी जोड प्रकल्प म्हणजे जास्त पाणी उपलब्ध असलेल्या अथवा पूरग्रस्त खोऱ्यातील पाणी टंचाईग्रस्त किंवा दुष्काळी खोऱ्यात वळवणे नदीजोड प्रकल्पातून मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे ! **– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

नावाजलेले संगीतकार स्नेहल भाटकर

स्नेहल भाटकर ऊर्फ वासुदेव गंगाराम भाटकर हे मराठी चित्रपट, मराठी नाटके, हिंदी चित्रपटांतील नावाजलेले संगीतकार होते. स्नेहल भाटकरांचे वडील मुंबईत होते. १७ जुलै १९१९ ला स्नेहल भाटकरांचा जन्म झाला. जन्मानंतर अठराव्या महिन्यातच स्नेहलजींच्या वडिलांचे निधन झाले. आईला गोड गळ्याचे वरदान होते. त्या दादरलाच शाळेत संगीताच्या शिक्षिका म्हणून नोकरीला लागल्या. विशेष म्हणजे या शाळेत संगीताचे आणखी एक शिक्षक होते. ते म्हणजे संत तुकाराम चित्रपटात तुकारामांची भूमिका केलेले विष्णुपंत पागनीस. घरीदारी सुरांच्या संगतीत भाटकर वाढले. भाटकरांचे चित्रपट क्षेत्रातले नाव जरी स्नेहल असले तरी प्रत्यक्षात त्यांचे नाव होते वासुदेव गंगाराम भाटकर. दादरच्या श्रीकृष्ण संगीत विद्यालयात त्यांनी रितसर संगीत शिक्षण घेतले. त्या वेळी मुंबईत संगीत भजनाचे फड जोरात रंगायचे. सार्वजनिक सत्यनारायण असो वा गणेशोत्सव भजन व्हायला हवेच. हे भाटकर हळूहळू 'बुवा' झाले. 'भजनीबुवा' म्हणून परिसरात परिचित झाले. हार्मोनियमवर लिलया फिरणारा हात बघून त्या वेळची प्रसिद्ध संगीत कंपनी हिज मास्टर्स व्हाईस मएचएमव्हीफ या कंपनीत ४० रुपये पगारावर बुवा नोकरीला लागले. एचएमव्ही कंपनी संगीताच्या ध्वनिमुद्रित काढत असे. श्रीकृष्ण संगीत विद्यालयात त्यांनी गाण्याचे धडे गिरवले. 'एचएमव्ही' या कॅसेट कंपनीमधील प्रवेशामुळे भाटकरबुवांच्या कारकिर्दीला खऱ्या अर्थाने वळण मिळाले. मधुबाला, गीता बाली, नूतन, तनुजा या नायिकांच्या पहिल्या चित्रपटांना त्यांनीच संगीत दिले होते. तसेच कमळाबाई मंगळूरकर, कमला कोटणीस, शोभना समर्थ, बेगम पारा, लीला चिटणीस, शुभा खोटे या नायिकांनी चित्रपट नि

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२९ मे

१)श्री.शशिकांत सोपान पोरे
मु.श्रीबाग-३, अलिबाग
२९-०५-१९४९

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

कै.श्रीमती.मालती मदन वैद्य, प्रथम स्मृतिदिन, कांदिवली मुंबई



उरण येथे श्री पुरुषोत्तम याग संपन्न

उरण : अधिक ज्येष्ठ (पुरोषोत्तम मास) निमित्त गुरुवारी (दि.२८) लक्ष्मी नारायण मंदिर येथे ब्राम्हण सभा उरण यांच्या वतीने श्री पुरुषोत्तम यागाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी (दि.२७) रोजी लक्ष्मी नारायण मंदिरातील गणेश, लक्ष्मी नारायण मुर्तिवर अथर्व शीर्षसह, पुरुष सूक्त व श्री सूक्त अभिषेकरूपी पठण उरण ब्राम्हण वृंदाच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमासाठी रायगड जिल्हाअध्यक्ष शरद म्हसकर, त्यांचे सहकारी गिरीश पाटणकर आदी उपस्थित होते. यावेळी ब्राम्हण सभा अध्यक्ष उरण विराम उपाध्ये, उपाध्यक्ष प्रभाकर दाते, खजिनदार हेमंत धामणकर, सचिव वैभव राईलकर, विश्वस्त संजय दाते, धनंजय उपाध्ये, नरेंद्र उपाध्ये, नंदकुमार उपाध्ये, सचिन उपाध्ये, अथर्व उपाध्ये, मोहन त्याडी तसेच सर्व महिला मंडळ, ब्राम्हण सभा सदस्य आदींचे सहकार्य लाभले.

'कागदी' स्वच्छतेचा कारभार

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण मोहिमेत दरवर्षी अव्वल मानांकन पटकावण्यासाठी धडपडणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या कामगिरीवर आता स्थानिक नागरिकांमधूनच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. शहरात ठिकठिकाणी लावण्यात आलेले स्वच्छतेचे माहिती फलक आणि प्रत्यक्ष परिस्थिती यात मोठी तफावत असून, पालिका प्रशासन करदात्या नागरिकांची आणि केंद्रीय तपासणी समितीची दिशाभूल करत असल्याचा आरोप सजग नागरिक मंच, नवी मुंबई या संस्थेने केला आहे.



● फलक चमचमले, प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रश्नांकीतच?

शहरातील मुख्य चौक आणि अंतर्गत रस्त्यांवर पालिकेने 'या रस्त्याची साफसफाई दिवसातून दोन वेळा करण्यात येते' असे फलक लावले आहेत. परंतु, प्रत्यक्षात या रस्त्यांची दोनदा साफसफाई केली जात नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. केवळ स्वच्छ सर्वेक्षण टीमकडून जास्त गुण मिळवणे आणि कंत्राटदारांना दोन वेळच्या कामाची देयके मंजूर करून आर्थिक गैरव्यवहार करणे, हाच यामागील मुख्य हेतू असल्याचा संशय करदाते नागरिक व्यक्त करत आहेत.

'या कारंज्यासाठी प्रक्रियायुक्त सांडपाण्याचा वापर करण्यात येतो' असे फलक संपूर्ण नवी मुंबईत विविध ठिकाणी अनेक वर्षांपूर्वी दिमाखात लावण्यात आले आहेत. मात्र, वास्तव पाहता शहरातील बहुतांश भागापर्यंत, ज्या ठिकाणी फलक लावलेले आहेत, त्या चौकांपर्यंत अद्याप प्रक्रियायुक्त पाण्याची कोणतीही पाईपलाईन पोहोचलेली नाही असे दिसून येते.

"प्रशासनाने या दोन्ही उपक्रमांबाबत शहरवासीयांच्या मनात असलेल्या शंकांचे तात्काळ निरसन करावे आणि अधिकृत खुलासा करावा, ही मागणी आहे.
-संजय सोनवणे, सदस्य, सजग नागरिक मंच, नवी मुंबई"

अलीकडे शहरात झालेल्या चौकांच्या सिमेंटिकरणादरम्यान मध्यभागापर्यंत पाईप टाकण्याची सुविधाच ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे या कारंज्यांमध्ये नक्की कोणते पाणी वापरले जाते आणि प्रक्रियायुक्त पाण्याच्या नावाखाली केवळ इको-फ्रेंडली असल्याचा आव आणला जात आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

स्वच्छतागृहांचा मेकओव्हर

वर्षभर शहरातील सार्वजनिक व सामूहिक स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष करणाऱ्या पालिका प्रशासनाला स्वच्छ सर्वेक्षण समितीच्या दौऱ्याची चाहूल लागताच अचानक जाग येते, असाही आरोप मंचाने केला आहे. समिती येणार असल्याच्या पार्श्वभूमीवर अचानक विशिष्ट अधिकाऱ्यांची नियुक्ती करून शहरातील सर्व स्वच्छतागृहांची तपासणी केली जाते. एरवी दुर्गंधीयुक्त असणाऱ्या स्वच्छतागृहांवर तातडीने कंत्राटदारांची माहिती, पर्यवेक्षकांचे संपर्क क्रमांक लावले जातात. रातोरात हॅन्डवॉश, सॅनिटायझर आणि दाराबाहेर हिरव्या रंगाच्या मॅट्स (चटया) टाकून चकाचक देखावा निर्माण केला जातो. हा प्रकार म्हणजे प्रशासनाचा निव्वळ ढोंगीपणा असून, समितीची दिशाभूल करण्याचा अधिकृत प्रयत्न नाही का, असा थेट प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दोन सोनसाखळी चोरट्यांना अटक

ठाणे : कल्याणजवळील आंबिवली येथील इराणी वस्तीत कल्याण खडकपाडा आणि नवी मुंबई पोलिसांच्या पथकाने मध्यरात्री कॉम्बिंग ऑपरेशन राबवत दोन इराणी सराईत सोनसाखळी चोरट्यांना अटक केली. मुसा अनु सय्यद आणि काबुली नौशाद सय्यद या चोरट्यांची नावे आहेत. या दोघांविरोधात नवी मुंबईसह अनेक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. नवी मुंबई येथे घडलेल्या चेन स्नॅचिंगच्या गुन्ह्यात मुसा अनु सय्यद, काबुली नौशाद सय्यद हे दोघे पसार होते. नवी मुंबई पोलिसांचे पथक या चोरट्यांच्या मागावर होते. हे दोघे कल्याण जवळील आंबिवली येथील इराणी वस्तीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आंबिवली येथील इराणी वस्ती ही सोनसाखळी चोरट्यांचे आश्रयस्थान म्हणून कुप्रसिद्ध आहे. या वस्तीतून आजमितीला अनेक सराईत इराणी चोरट्यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अनेकदा अटक करायला गेलेल्या पोलिसांवर या इराणी जमावाने हल्ला देखील केल्याच्या घटना याआधी घडल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी आधी ॲक्शन प्लॅन तयार केला आणि दोघांनाही बेड्या ठोकल्या.

डंपरमधून डिझेल चोरणारी टोळी गजाआड

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

संगमेश्वर तालुक्यातील बामणोली स्टॉपजवळ उभ्या असलेल्या डंपरमधून चोरून डिझेल काढणाऱ्या एका आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश करण्यात देवरुख पोलिसांना मोठे यश आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी सतर्कता दाखवत चार आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून चोरीचे डिझेल जप्त करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना बामणोली स्टॉप येथे बुधवारी (दि.२७) मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास घडली. या भागातील राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला ३ डंपर उभे होते. मध्यरात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन काही इसम या डंपरच्या डिझेल टाकीतून चोरून डिझेल कॅनमध्ये भरत होते. हा संशयास्पद प्रकार फिर्यादी संदीप विश्राम रावणंग आणि त्यांच्या मित्राने पाहिला. त्यांनी तात्काळ देवरुख पोलीस ठाण्याशी संपर्क साधून पोलिसांना याची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेतले.

शंकर धेनु राठोड (वय ४७ वर्ष, रा. सातारा), शिवाजी बबन नेटके (वय ३५ वर्ष, रा. संगमेश्वर, रत्नागिरी), रोहीत हनुमंत कांबळे (वय १९ वर्ष, रा. संगमेश्वर, रत्नागिरी) आणि लखन हनुमंत कांबळे (वय २१ वर्ष, रा. संगमेश्वर, रत्नागिरी) अशी याप्रकरणात अटक केलेल्या चार संशयित आरोपींची नावे आहेत.

तीन डंपरच्या टाक्यांमधून आरोपींनी सुमारे १९ हजार सहाशे रुपये किमतीचे एकूण २०० लिटर डिझेल कॅनमध्ये काढून चोरण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, स्थानिक नागरिक आणि पोलिसांच्या तत्परतेमुळे हा मोठा प्रयत्न फसला. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत.

भांडवलदारांच्या फायद्यासाठी मुंबईचा सौदा?

| मुंबई | प्रतिनिधी |

● आदित्य ठाकरेंचा सरकारवर आरोप

मुंबईतील मोकळ्या जागा, मैदाने आणि रक्तपेढ्यांच्या खासगीकरणाच्या प्रस्तावांवरून शिवसेना नेते, युवा सेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सरकार सर्वसामान्यांच्या हिताला डावलून धनाढ्यांच्या फायद्यासाठी निर्णय घेत असल्याचा आरोप केला. शिवसेनेने मुंबई जपली आणि जोपासली; मात्र हे सरकार मुंबई विकण्याच्या तयारीत आहे, असा घणाघात त्यांनी केला.

सरकार सत्तेत आल्यानंतर मुंबईतील महत्त्वाच्या जागांबाबत अनेक वादग्रस्त प्रस्ताव पुढे आणण्यात आले. बांद्रा येथील मैदान प्रदर्शन केंद्रासाठी वापरण्याचा प्रस्ताव होता, तर मलबार हिल परिसरातील मैदान एका व्यावसायिकाला देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच 'वर्षा' बंगल्यालगतच्या भूखंडाबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

यामधील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे मुंबईतील रक्तपेढ्यांच्या खासगीकरणाचा प्रस्ताव असल्याचे आदित्य ठाकरे यांनी सांगितले. हे सर्व प्रस्ताव ११०० हून अधिक कोटी रुपयांच्या व्यवहारातून काही जणांच्या फायद्यासाठी पुढे आणले जात होते, असा गंभीर आरोप त्यांनी केला. मुंबईतील सार्वजनिक जागा आणि आरोग्यसेवा खासगीकरणाच्या माध्यमातून काही मोजक्या लोकांच्या हातात देण्याचा डाव असल्याचा आरोप करत आदित्य ठाकरेंनी सरकारवर तीव्र टीका केली.

मुरुड-जंजिरा नगरपरिषद हद्दीत घरगणना अंतिम टप्प्यात



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड-जंजिरा नगर परिषद हद्दीत भारत सरकारच्या जनगणना २०२७ अभियानांतर्गत घरगणनेचे काम दि.१६ मेपासून सुरू करण्यात आले असून दि.१४ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. हे काम सध्या अंतिम टप्प्यात पोहोचले असून नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन नगर परिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

मुरुड-जंजिरा नगर परिषदेमार्फत मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली घरगणनेचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या मोहिमेसाठी जनगणना विभागामार्फत विशेष नियोजन करण्यात आले असून शहरातील प्रत्येक घर, कुटुंब व इमारतींची माहिती संकलित केली जात आहे.

या कामासाठी अनिकेत भोसले व जनगणना लिपीक सुदेश माळी यांच्या समन्वयातून एकूण २० प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पर्यवेक्षणासाठी आशितोष पाटील, सतेज निमकर आणि राजेश भोईर, जयकृष्ण भिसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून सर्व कामकाजावर नियमित देखरेख ठेवण्यात येत आहे. घरगणनेदरम्यान प्रत्येक घरातील सदस्य संख्या, घराची स्थिती, उपलब्ध मूलभूत सुविधा, इमारतींचा प्रकार, पिण्याचे पाणी, स्वच्छता यासह विविध बाबींची माहिती संकलित केली जात आहे. ही माहिती भविष्यातील शासकीय योजना, नागरी सुविधा, विकास आराखडे तसेच विविध कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

नगर परिषद प्रशासनाच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, प्रगणक व पर्यवेक्षक घरभेटी दरम्यान भेट देत असताना त्यांना अचूक व आवश्यक माहिती द्यावी तसेच जनगणना प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी पूर्ण सहकार्य करावे. जनगणना ही राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून त्यामध्ये नागरिकांचा सहभाग आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

एकल प्लास्टिकविरोधात कारवाई

| पालघर | प्रतिनिधी |

एकल प्लास्टिकविरोधात वसई-विरार शहर महानगरपालिकेने मोठी कारवाई केली आहे. नालासोपारा पश्चिम परिसरात टाकलेल्या धाडीत तब्बल ३२०० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले असून संबंधितांवर दंडात्मक कारवाईही करण्यात आली आहे.

शासनाच्या निर्देशानुसार एकल वापर प्लास्टिक बंदी प्रभावीपणे राबवण्यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून विशेष मोहीम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत बुधवारी (दि.२७) प्रभाग समिती 'ई' अंतर्गत नालासोपारा पश्चिम येथील श्रीप्रस्था तिसरा रस्ता परिसरात कारवाई करण्यात आली. महापालिकेच्या पथकाने परिसरातील एका गोडाऊनवर धाड टाकून तपासणी केली. या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आलेले एकल वापर प्लास्टिक आढळून आले. तपासणीदरम्यान एकूण ३२०० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. याप्रकरणी संबंधितांवर ५ हजार रुपयांचा दंडही आकारण्यात आला. प्लास्टिक बंदीचे नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे. या कारवाईवेळी घनकचरा विभागाच्या उपायुक्त अर्चना दिवे, प्रभारी सहाय्यक आयुक्त जितेंद्र नाईक, स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता मार्शल तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.



शिव प्रतिष्ठानतर्फे समाजोपयोगी उपक्रम

| उरण | प्रतिनिधी |

शिव प्रतिष्ठान यांच्या वतीने शिव प्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजित पाटील व मनीष कटेकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. लक्ष्मी चरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी, मेडिकवर हॉस्पिटल खारघर यांच्या वतीने फ्री हेल्थ चेकअप कॅम्प तसेच १० वी १२ वीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ, स्वच्छता दुतांचा सत्कार असे अनेक उपक्रम राबविण्यात आले. या राबविलेल्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आयोजकांनी चांगल्या उपक्रमाचे आयोजन व उत्तम नियोजन केले होते, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

खर्चात बचत करण्यावरही विशेष भर देणार | परिवहन मंत्री सरनाईक यांची माहिती

एसटी विभागांच्या नफ्यासाठी 'पालक अधिकारी'

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सातत्याने तोट्यात चालणाऱ्या विभागांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि नफ्यात आणण्यासाठी व्यापक उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तोट्यातील प्रत्येक विभागासाठी प्रादेशिक व्यवस्थापक दर्जाच्या अथवा त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांची 'पालक अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळाच्या मुंबई सेंट्रल येथील मुख्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर खर्च नियंत्रण, इंधन बचत, महसूल गळती रोखणे आणि प्रशासकीय शिस्त यांचा एकत्रित विचार करून ही कार्यपद्धती राबविण्यात येणार आहे. यासाठी संबंधित पालक अधिकाऱ्यांवर विभागाच्या आर्थिक प्रगतीची थेट जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे.

यानुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संबंधित विभागाची आढावा बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत मागील महिन्याच्या उत्पन्न-खर्चाचा सखोल आढावा घेऊन चालू महिन्यासाठी ठोस नियोजन करण्यात येणार आहे. तसेच आगारनिहाय उत्पन्नाचे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात येणार आहेत.



एसटीचे उत्पन्न वाढविण्यासोबतच खर्चात बचत करण्यावरही विशेष भर देण्यात येणार आहे. विशेषतः डिझेल बचतीसाठी प्रत्येक आगाराला जबाबदारी निश्चित करण्यात येणार असून, सातत्याने डिझेल बचत करणाऱ्या आगारांना प्रोत्साहनपर बक्षीस योजना जाहीर करण्यात येणार आहे.

महसूल गळती रोखण्यासाठी सुरक्षा व दक्षता विभागालाही अधिक सक्रिय करण्यात येणार आहे. उत्पन्न बुडविणाऱ्या अथवा तिकिट व्यवहारात अनियमितता करणाऱ्या वाहकांची स्वतंत्र यादी तयार करून त्यांच्यावर सातत्याने लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रवाशांचा महसूल हा एसटीचा कणा असून त्यामध्ये कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

अतिकालीन भत्त्याच्या संदर्भातही कठोर आर्थिक शिस्त लागू करण्यात येणार असून, वित्त विभागाने निश्चित केलेल्या निकषांनुसारच अतिरिक्त काम व भत्त्यांना मंजुरी दिली जाणार आहे. अनावश्यक आर्थिक भार टाळण्यासाठी सर्व विभागांना दक्षता बाळगण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

एसटीच्या मालमत्तांमधून अधिकाधिक महसूल मिळविण्यासाठी प्रत्येक बसस्थानकावरील व्यावसायिक आस्थापनांची तपासणी करण्यात येणार आहे.

निवडक




तळा पोलिसांचे रूट मार्च

तळा : बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर तळा पोलिसांकडून शहरात रूट मार्च काढण्यात आला होता. बकरी ईद सणामध्ये शहरात नागरिकांकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यात यावी, यासाठी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या आदेशानुसार हा रूट मार्च काढण्यात आला. शहरातील बळीचा नाका, नगरपंचायत नाका, वरचा मोहल्ला, मुळे नाका, मेठ मोहल्ला, आसावरी नाका आदी ठिकाणी हा रूट मार्च काढण्यात आला. यामध्ये तळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज घाटकर एक पीएसआय, दहा अंमलदार व दोन होमगार्ड यांसह माणगाव आरसिपी प्लाटूनचे एक अधिकारी व तीस जवान उपस्थित होते. यावेळी तळा शहरवासीयांनी बकरी ईद सण शांततेत व जातीय सलोखा राखून साजरा करावा तसेच सण साजरा करीत असताना कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही व सणाला गालबोट लागणार नाही याची दक्षता घेऊन पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे. तसेच कोणीही अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन तळा पोलीस निरीक्षक पंकज घाटकर यांनी नागरिकांना केले.

सृष्टीची मुंबई पोलीस दलात निवड

खांब : रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र तळवली या गावची सुकन्या सृष्टी नथुराम मांगुळकर हिची मुंबई पोलीस निवड झाली आहे. सृष्टी मांगुळकर ही अभ्यासाबरोबरच खेळ क्रीडा प्रकारात अतिशय निपुण व चपळ असल्याने तिला आतापर्यंत मोठ्या प्रमाणात पारितोषिके मिळाली आहेत. शालेय जीवनातील क्रीडा प्रकारातील सहभाग व अनुभवाचा फायदा तिला पोलीस भरती प्रक्रियेत झाला असल्याचे सांगण्यात आले आहे. तर सृष्टीनेही पोलीस होण्याचे स्वप्न शालेय जीवनापासूनच पाहिले होते व त्या दृष्टीने तिने देवा करिअर अकॅडमी भांडूप मुंबई या अकॅडमीमधून पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण घेऊन व सातत्याने प्रयत्नांती पराकाष्ठा करून आपल्या स्वप्नाची पूर्तता केली आहे. सृष्टीच्या या मुंबई पोलीस दलातील निवडीबद्दल ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तरूण मंडळ तळवली यांच्यासह समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.



अणुस्कुरा घाटात दुचाकीचा अपघात

रत्नागिरी : अणुस्कुरा घाटात बुधवारी (दि.२७) सायंकाळी पाच ते साडेपाचच्या सुमारास भीषण दुचाकी अपघात झाला. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. निलेश विलास पाटील असे मृताचे नाव असून अपघातग्रस्त तिघेही बांबवडे येथील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. अपघातानंतर मात्र आपत्कालीन आरोग्य व्यवस्थेचा ढिसाळ कारभार उघड झाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने रुग्णवाहिकेसाठी संपर्क साधला; मात्र तब्बल एक ते दीड तास उलटूनही शासकीय रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचली नाही. रुग्णवाहिकेत डिझेल नसल्याचे तसेच डॉक्टर उपलब्ध नसल्याचे कारण प्रशासनाकडून देण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, गंभीर जखमींना वेळेत उपचार मिळण्यात अडथळे निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. रुग्णवाहिका न आल्याने स्थानिकांनी स्वतः पुढाकार घेत जखमींना इतर वाहनांतून उपचारासाठी हलवण्याची व्यवस्था केली. या घटनेनंतर आपत्कालीन सेवांमधील निष्काळजीपणाबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच दुर्गम घाट भागात तातडीची आरोग्य सेवा सक्षम करण्याची आवश्यकता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

एकाचा जागीच मृत्यू, दोघे गंभीर जखमी

कल्याणी तुपे बनली मुंबई पोलीस

नेरळ : कर्जत तालुक्यातील देवपाडा गावातील कल्याणी तानाजी तुपे हिने प्रचंड मेहनतीच्या जोरावर यशाचे शिखर गाठले आहे. तिची पहिल्याच प्रयत्नात मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. तिचे सर्वत्र कौतूक होत असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सर्वसामान्य कुटूंबात वाढलेल्या कल्याणीने मिळविले यश हे तुपे परिवाराची मान अभिमानाने उंचावणारी ठरली आहे. पोलीस होण्यासाठी तिने जिद्द कायम ठेवली आणि पोलीस भरतीसाठी लागणारी शारीरिक तयारीही तिने तितक्याच चिकाटीने केली. पहाटे उठून धावणे, व्यायाम करणे आणि नंतर अभ्यास. अखेर तिच्या मेहनतीचे चीज झाले असून ती मुंबई पोलीस बनली आहे. बुधवारी रात्री कल्याणीचे देवपाडा गावात फटाके आणि गुलाल उधळून ग्रामस्थांच्या वतीने स्वागत केले. त्यानंतर ग्रामस्थांसह नातेवाईकांनी भेटून शुभेच्छा दिल्या. '२०२४ मध्ये कर्जत येथील प्रहार पोलीस अकॅडमीत प्रवेश घेल्यानंतर अकॅडमीचे संचालक, आणि माझे पोलीस मामा अंकुश काळी यांचे मोलाचे मार्गदर्शन मला मिळाले. आई वडिलांच्या कष्टाची जाणीव मनात ठेवून परिश्रम घेतले आणि पहिल्याच प्रयत्नांत मला यश मिळाले', अशा भावना कल्याणी तुपे हिने व्यक्त केल्या.



श्रीजा पाटीलची सुवर्णभरारी



पाली /बेणसे : नेपाळमधील काठमांडू येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय डान्स स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२६ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना पाली-सुधागडच्या श्रीजा संदेश पाटील हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि मानाचे सुवर्णपदक आपल्या नावावर केले. या जागतिक स्तरावरील दैदिप्यमान यशाबद्दल श्रीजाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. नुकतेच पाली-सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार यांच्या हस्ते तिचे विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले. काठमांडू येथील राष्ट्रिय नाचघर, जमाल येथे रविवारी (दि.२४) ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा पार पडली. साऊथ एशियन फेडरेशन फॉर ऑल स्पोर्ट्स आणि वर्ल्ड अमेच्युअर स्पोर्ट्स कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत विविध देशांतील कसलेल्या नृत्यांगनांनी सहभाग घेतला होता. या कडक स्पर्धेत श्रीजाने आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या नृत्याविष्काराने आणि उत्कृष्ट सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकली व आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर तिरंगा अभिमानाने फडकवला. श्रीजा पाटील हिच्या या ऐतिहासिक यशाची दखल घेत पाली-सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार यांनी तिची विशेष भेट घेतली. श्रीजा ही मूळची अलिबाग वरसोली येथील असून पालीत वास्तव्यास आहे. श्रीजाच्या या सुवर्ण कामगिरीमुळे तिच्यावर सर्व स्थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

निवडक

संचिताने केले वडिलांचे स्वप्न पुर्ण

सुतारवाडी : आपटवणे येथील संचिता ढिसे हिची मुंबई पोलीस दलात निवड झाल्यामुळे संपूर्ण सुधागड तालुक्यातून तिचे अभिनंदन होत आहे. शालेय जीवनाती अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून परिचित आहे. संचिता इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत असतानाच तिच्या वडिलांचा मृत्यू झाला. वडिलांच्या निधनानंतर ही मोठ्या चिकाटीने उच्च गुणांनी दहावी पास झाली. एवढेच नाही तर दहावीनंतर बीएससी ही उच्च गुणांनी उत्तीर्ण झाली. आणि आपल्या वडिलांचे जे स्वप्न होते ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू लागली. पोलीस दलात जायचे म्हणजे मोठी कसरत असते. तिला सतत दोन वेळा अपयश आले; मात्र, तिने जिद्द सोडली नाही. ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील अकॅडमीत प्रवेश मिळवून केदार यांच्या संघर्ष अकॅडमीमध्ये प्रवेश केल्यानंतर रात्रंदिवस अभ्यास करून व मैदानात खूपच मेहनत घेतली. अखेर या सर्व गोष्टींना तिला यश आले आणि तिची मुंबई पोलीस दलात निवड झाली.



नामदेव म्हात्रे यांचे निधन

पेण : पेण तालुक्यातील वडखळ गावचे सुप्रसिद्ध कीर्तनकार, प्रवचनकार तथा श्रीमंत संगीत भागवत कथाकार नामदेव म्हात्रे यांच्या निधनाने वारकरी संप्रदायावर शोककळा पसरली आहे. आपल्या आयुष्यभर हरिनामाचा प्रचार, समाजप्रबोधन आणि धार्मिक कार्यासाठी झटणारे हे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेल्याने वडखळसह संपूर्ण रायगड जिल्हा हळहळ व्यक्त करत आहे. नामदेव म्हात्रे यांनी केवळ कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून अध्यात्माची पताका फडकवली नाही, तर सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले. ग्रामपंचायत वडखळ येथे तब्बल ३३ वर्षे सदस्य आणि ५ वर्षे उपसरपंच म्हणून लोकसेवा बजावताना त्यांनी गावाच्या विकासासाठी अविरत प्रयत्न केले. जयकिसान विद्यालय उभारणीसाठी त्यांनी मोलाचे सहकार्य केले, तसेच श्री मारुती मंदिर उभारणीतही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले. तसेच, अखिल भारतीय वारकरी मंडळ पेण तालुका अध्यक्ष, महाराष्ट्र वारकरी सेवा मंडळ रायगड जिल्हाध्यक्ष, तसेच अखिल भारतीय वारकरी सांप्रदाय महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी सदस्य अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या.



चंद्रकांत कामथे यांचे निधन

नागोठणे : आंगरआळी येथील रहिवासी चंद्रकांत लक्ष्मण कामथे (७८) यांचे बुधवारी (दि.२७) त्यांच्या राहत्या घरात निधन झाले. अलिबाग येथील जिल्हा न्यायालयातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे मुख्य बचाव अधिवक्ता ॲड. शेखर कामथे यांचे ते वडील होत. चंद्रकांत कामथे हे धाटाव औद्योगिक वसाहतीमधील सुदर्शन केमिकल्स या कंपनीतून सेवानिवृत्त झाले होते. कंपनीतील युनियन कमिटीमध्ये त्यांनी त्यांच्या विभागातून कामगारांचे प्रतिनिधित्व केले होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कामथे यांच्या पार्थिवावर अंबा घाटावरील वैकुठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी नागोठणे विभागातील विविध क्षेत्रातील मान्यवर, वकील वर्ग, कामथे परिवारातील सगेसोयरे, आप्तेष्ट व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. चंद्रकांत कामथे यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगा, तीन विवाहित मुली, सुन, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवार दि.५ जून रोजी उद्धर-सुधागड येथे, तर उत्तरकार्य रविवार दि.७ जून रोजी आंगरआळी-नागोठणे येथे त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे कामथे कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे.



अध्यक्षपदी नंदकुमार म्हात्रे यांची निवड

नागोठणे : रोहा तालुक्यातील सानेगाव येथील श्री दिनाभाई मोरे शिक्षण मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षपदी यशवंतखार येथील नंदकुमार म्हात्रे यांची सलग पाचव्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. संस्थेची सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा साने गुरुजी विद्यानिकेतन, सानेगाव यशवंतखार येथे २६ मे रोजी संपन्न झाली. त्यावेळी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या सभेला संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री दिनाभाई मोरे शिक्षण मंडळाची कार्यकारिणी दर पाच वर्षांनी बदलण्यात येते. यावर्षी मंडळाच्या नवीन कार्यकारिणीमध्ये सुडकोळी येथील बाळू पाटील यांची उपाध्यक्षपदी, यशवंतखार येथील मोहन ठाकूर यांची खजिनदारपदी, सानेगाव येथील मनोहर मोरे यांची सचिवपदी तर ॲड. विवेक मोरे यांची सल्लागारपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल अध्यक्ष नंदकुमार म्हात्रे व इतर सर्व पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- jai santoshi maa CNG Alibag wadgav 1) Fillerman 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812
- JOB VACANCY अलिबागमध्ये कामाला कार ड्रायव्हर हवा आहे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२
- अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ दूकानगाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- उसर-अलिबाग येथील गेल/एच.पी. कंपनी जवळ वेलवली बस स्टॉप नजिक नवीन इमारत (एकूण ११ सूसज्ज फ्लॅट) पार्कींग व्यवस्थेसह भाडे तत्वावर देण्याची आहे. कृपया इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा. मोबा. नं. ८४५४८६२७६७
- तातडीची भरती, अलिबाग रेस्टॉरंट/प्रॉपर्टी/एरिया मॅनेजर हेड शेफ, हाऊसकीपिंग, किचन हेल्पर मोफत राहण्याची व जेवणाची सोय TMS पेरोल अंतर्गत नोकरी. संपर्क: ८९७६७०९२१८ / ८६९१०८७३०२
- घरकामासाठी कायमस्वरूपी राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹१४,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम, तसेच जेवणाची व्यवस्था करण्यात येईल. इच्छुकांनी संपर्क साधावा. ७८७५८६६५५५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

निकृष्ट कामांमुळे कालव्याला भेगा

- निधीचा अपव्यय झाल्याचा आरोप
- बळीराजा फाऊंडेशन आक्रमक

। चणेरा । प्रतिनिधी ।

आंबेवाडी ते निवी परिसरातील कालवा दुरुस्ती कामांमध्ये मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपयांचा निधी वाया गेल्याची चर्चा आता सर्वत्र रंगू लागली आहे. अवघ्या दोन वर्षांत कालव्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी दिला आहे.



सुमारे आठ ते दहा वर्षांपूर्वी कोलाड पाटबंधारे विभागाच्या उजवा व डावा तीर कालव्यांवरील लायनिंग मास काँक्रीटीकरण कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप झाला होता. त्यावेळी राजकीय दबावाखाली निकृष्ट कामे करून काही ठेकेदार, अधिकारी व संबंधित मंडळींनी आर्थिक लाभ घेतल्याची चर्चा रंगली होती. आता त्याच पद्धतीने कालवा दुरुस्तीच्या कामांमध्येही निकृष्ट दर्जा समोर येत असल्याने जुन्या सिंचन घोटाळ्याच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत.

बळीराजा फाऊंडेशनच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या पाणी आंदोलनानंतर रखडलेली कालवा दुरुस्तीची कामे सुरू झाली होती. शासनाकडून यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. मात्र, अनेक एस्केप, सायफन आणि लायनिंग काँक्रीटची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याचे आता स्पष्टपणे दिसू लागले आहे. विशेष म्हणजे पाले खुर्द गावाजवळ करण्यात आलेले लायनिंग काँक्रीटीकरण अवघ्या दुसऱ्याच वर्षी उखडू लागल्याचे समोर आले आहे. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या असून कालव्यातून पाणी गळती वाढली आहे. परिणामी शेतकऱ्यांचे नुकसान होत असून पाणी व्यवस्थापनावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

> कालवा दुरुस्तीच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च झाले आहे. परंतु, प्रत्यक्षात कामांची गुणवत्ता अत्यंत खालावलेली आहे. अनेक ठिकाणी कालवा अजूनही गळती अवस्थेत आहे. या सर्व कामांची आणि बिलांची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे. दोषी अधिकारी आणि ठेकेदारांना काळ्या यादीत टाकावे.
> – विठ्ठल मोरे, अध्यक्ष, बळीराजा फाऊंडेशन

> शासनाच्या निधीचा उघडपणे अपव्यय झाला आहे. अधिकाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव आहे. पाणी सोडण्याचे योग्य नियोजन नाही. शेतकऱ्यांना त्याचा फटका बसत आहे.
> –ॲड. दीपक भगत, सचिव, बळीराजा फाऊंडेशन

पाले खुर्द परिसरातील काम एका बाहेरील ठेकेदाराने केल्याची माहिती समोर आली असून, त्याच ठेकेदाराला पुन्हा कामे देण्यात येत असल्याने संशय अधिकच बळावला आहे. ''कामे उखडत असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. वरिष्ठांच्या देखरेखीखालीच निधीचा अपव्यय झाला आहे,'' असा आरोप स्थानिक शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

खासगी जमिनीतून अनधिकृत उत्खनन

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

साईनगर येथील स्वतःच्या मालकीच्या जमिनीतून अनधिकृतपणे माती उत्खनन करून विक्रीसाठी नेण्यात येत असल्याचा आरोप येथील आदीवासी बांधवांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

वाशिवली गावातील संबंधित व्यक्ती कोणताही अधिकृत माती उत्खनन परवाना नसताना आदिवासी कुटुंबाला दमदाटी करून त्यांच्या मालकीच्या जमिनीमधून मातीचे उत्खनन करत असल्याचा आरोप आदिवासी बांधवांनी केला आहे. तसेच, उत्खनन केलेली माती विक्रीसाठी नेली जात असल्याचाही दावा करण्यात आला आहे. मंगेश वाघ यांनी तक्रारीत नमूद केले आहे की, ''आम्ही आदिवासी असल्याने आमच्याशी कोणतीही चर्चा न करता आमच्याच जमिनीमध्ये हस्तक्षेप करण्यात येत आहे. संबंधित व्यक्तीने त्यांच्या जमिनीचा खासगी सर्व्हे करून घेतला असून, त्या सर्व्हेबाबत आम्हाला कोणतीही पूर्वसूचना देण्यात आलेली नाही. याशिवाय संबंधित खासगी सर्व्हे करून निश्चित करण्यात आलेल्या हद्दींवरही त्यांनी आक्षेप घेतला आहे. दरम्यान, तलाटी शुभम शेगोकर यांनी तात्काळ स्थळ पाहणी करून संबंधित अहवाल खालापूर तहसिल कार्यालयास पाठविला आहे.

आदिवासी कुटुंबाकडून न्यायाची मागणी



दीक्षांत समारंभाचे आयोजन

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटीच्या दीक्षांत समारंभाचे आयोजन शुक्रवारी (दि.२९) करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्यासह प्रो.डॉ. शेखर मांडे आणि अजिताब शर्मा (आयएएस) हे देखील उपस्थित राहणार आहेत. यावेळी १ हजार २६८ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. तसेच, ३४ जणांना पीएचडी प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांना ३७ सुवर्णपदक देऊन गौरविण्यात येणार आहे.

महिलांसाठी लोकलची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून कर्जत या उपनगरीय करिता सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी दोन महिला विशेष लोकल सोडण्यात यावी, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे महिला बचत गट संसाधन व्यक्ती आणि उमेदच्या कर्जत तालुका अध्यक्षा रेखा हिरेमठ यांच्याकडून करण्यात आली आहे.

महिला बचत गटांच्या कार्यकर्त्या आणि राज्यसतरावरील उमेद या संघटनेच्या कर्जत तालुका अध्यक्षा रेखा हिरेमठ यांच्याकडून रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांची प्रमुख मागणी पुढे केली आहे. शेलू येथील रहिवाशी असलेल्या रेखा हिरेमठ आणि शेलू ग्रामपंचायत माजी सरपंच सुनीता मसणे यांनी खासदार श्रीरंग बारणे यांची भेट घेऊन महिला स्पेशल लोकलची मागणी केली. सकाळी नोकरीसाठी मुंबईकडे जाणाऱ्या महिलांना प्रवास करणे कठीण होऊन बसले आहे. त्याचवेळी संध्याकाळी घरी परत येतांना आणखी कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागत असते. महिला विशेष गाडी मुंबई सीएसएमटीवरून कल्याणपर्यंत चालवली जाते. ही विशेष महिला लोकल कर्जतपर्यंत चालवण्यात यावी आणि सकाळच्या वेळी दोन आणि संध्याकाळच्या वेळी दोन अशा विशेष लोकल चालवण्यात याव्यात, अशी मागणी रेखा हिरेमठ यांनी केली आहे.

एकसल रस्त्याचे काँक्रीटीकरण

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत-कल्याण राज्यमार्गावरून आंबिवली गावाकडे आणि पुढे एकसल गावाकडे जाणारा रस्ता काँक्रीटीकरण केला जात आहे. या रस्त्याच्या कामाचा अंतिम टप्पा सुरू आहे. याआधी आंबिवली गावाकडे जाणारा रस्ता अरुंद होता. हा रस्ता रुंद व्हावा आणि या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात यावे, अशी मागणी राजिप सदस्य व स्थानिकांकडून करण्यात आली होती. २०२५ मध्ये या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली होती. सुरुवातीला रस्त्याचे जूने डांबरी पट्टे काढून त्यावर जेएसबी खडी टाकून मजबूत करण्यात आला. त्यानंतर आता रस्त्यावर काँक्रीटीकरणाचा थर टाकण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. एकसल येथून हा रस्ता अंतिम टप्प्यात आणला जात आहे. सध्या आंबिवली रेल्वे फाटक ते राज्यमार्ग रस्त्याच्या भागात या रस्त्यावर काँक्रीटीकरण केले जात आहे. या रस्त्यामुळे गेली अनेक वर्षे खड्डेमय असलेला रस्ता काँक्रीटचा बनला आहे.



संत निरंकारी संप्रदाय मिशन कार्यक्रम

। वाघ्रण । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातीय वाघ्रण येथे संत निरंकारी संप्रदायाचा केंद्रीय कार्यक्रम रविवारी (दि.२४) संपन्न झाला. यावेळी शेकडो अनुयायी उपस्थित होते. या कार्यक्रमाला संप्रदाय महात्मा रत्नागिरी-खेड येथील महात्मा मिलींद कासार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, विविध केंद्राचे अनुयायी देखील उपस्थित होते. २३ मे १९२९ रोजी संत निरंकारी मिशनची स्थापना सदगुरू बुटा सिंह यांनी केली. त्याला ९७ वर्ष पूर्ण झाल्याचे मत वाघ्रण ग्रामस्थ मंडळाचे पंच सदस्य दिपक पाटील यांनी विषद केले.

पोलीस मित्र संघटनेच्या उपोषणाला यश

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील शासकीय कार्यालयातील सर्व्हर व्यवस्थित चालत नसल्यामुळे नागरिकांना सर्व प्रकारचे दाखले वेळेत मिळत नव्हते. या गंभीर समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पोलीस मित्र संघटनेचे रमेश कदम यांनी साखळी उपोषण सुरु केले होते. अखेर त्यांच्या उपोषणाला यश आले.

तालुक्यातील हजारो विद्यार्थी व नागरिकांना सर्वर व्यवस्थित चालत नसल्यामुळे सर्व प्रकारचे दाखले वेळेत मिळत नाहीत. त्यामुळे शासनाने आणि प्रशासनाने सर्व प्रकारचे दाखले ऑफलाईन देण्याची व्यवस्था करावी. उत्पन्न दाखले दाखल केलेल्या पावतीवर सर्व विद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन ते दाखल करण्यास २ महिन्यांचा कालावधी द्यावा. या मागण्यांसाठी दि.२२ मेपासून कर्जत प्रशासकीय भवनाबाहेर साखळी उपोषण सुरू करण्यात आले होते. त्यानंतर सोमवार दि.२५ मेपासून तहसील कार्यालयाने आपल्या सेतू कार्यालयातून सर्व शासकीय दाखले देण्यास सुरुवात केली. मंगळवारी (दि.२६) कर्जत गटविकास अधिकारी सुशांत पाटील, गट शिक्षण अधिकारी अनंत खैरे यांनी उपोषण स्थळी भेट दिली. यावेळी शिक्षण विभागातील सर्व मागण्या मान्य करीत लेखी निवेदने दिल्याने हे साखळी उपोषण स्थगित करण्यात आले आहे.



ईट प्ले रीड अभियानाचा जागर

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

निरोगी आहार, खेळाचा आनंद आणि वाचनाची ओढ या त्रिसूत्रीद्वारे मुलांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या ईट प्ले रीड या सामाजिक संस्थेमार्फत गोविंदराव निकम न्यू इंग्लिश स्कूल येथे जनजागृती अभियान राबविण्यात आले. अपर्णा शहा यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दैनंदिन जीवनात सकस आहार, शारीरिक व्यायाम आणि वाचन संस्कृतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी संस्थेच्या राजदूतांनी शाळेला भेट दिली.

श्रीवर्धन बस स्थानकाचा कारभार ढासळला

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

कोकणातील महत्त्वाचे पर्यटन स्थळ असलेल्या श्रीवर्धन बस स्थानकाचा कारभार सध्या कमालीचा ढासळला आहे. श्रीवर्धन आगारातून सुटणाऱ्या लांब पल्ल्याच्या बसगाड्या वारंवार रस्त्यातच बंद पडणे, गाड्या सुटण्याच्या वेळेत होणारी प्रचंड अनियमितता आणि बसेसची वेळेवर न होणारी देखभाल यांमुळे प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या गंभीर समस्यांमुळे प्रवाशांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, भविष्यात एखादा मोठा अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक पवित्रा घेत प्रवाशांच्या हक्कासाठी थेट प्रशासनाला जाब विचारला आहे.



मनसेच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने बुधवारी (दि.२७) श्रीवर्धन बस स्थानकाचे व्यवस्थापक मेहबूब मणेर यांची भेट घेऊन त्यांना स्थानिकवलांबपल्ल्याच्याप्रवाशांच्या तक्रारींचा पाढा वाचून दाखवला. या शिष्टमंडळाचे नेतृत्व मनसेचे श्रीवर्धन तालुकाध्यक्ष मृदास तोंडलेकर आणि माजी तालुकाध्यक्ष राजेश लोहार यांनी केले. या भेटीदरम्यान मनसे पदाधिकाऱ्यांनी बस स्थानकातील ढिसाळ नियोजनावर कडक शब्दांत ताशेरे ओढले. ''श्रीवर्धनमधून मुंबई, पुणे, ठाणे, नालासोपारा यांसारख्या लांब पल्ल्याच्या मार्गांवर अनेक गाड्या धावतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या गाड्यांची योग्य देखभाल न केल्यामुळे त्या मध्येच बंद पडत आहेत. भर उन्हाळ्यात लहान मुले, महिला आणि वृद्ध प्रवाशांना रस्त्यात ताटकळत राहावे लागत आहे. तसेच, वेळेवर गाड्या न सुटल्यामुळे नोकरदार आणि विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे,'' याकडे शिष्टमंडळाने प्रशासनाचे लक्ष वेधले.

नामदेव जाधव यांचे निधन

। वाघ्रण । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चरी गावचे आदर्श शिक्षकआणि सामाजिक कार्यकर्ते नामदेव बाळाराम जाधव (७५) यांचे गुरूवारी (दि.२१) निधन झाले. नामदेव जाधव यांनी रोहा, सुधागड, अलीबाग व उरण येथे प्राथमिक शिक्षक म्हणून सेवा दिली. तर, बोकडवीरा उरण येथे निवृत्त झाले होते. त्यांचे दहावे ३१ मे रोजी, तर बारावे दि.२ जून रोजी राहत्या घरी होणार आहेत.



महाडच्या लेकींचे वर्दीचे स्वप्न पुर्ण | अस्मिता, सेजलची मुंबई पोलिसांत निवड

दुर्गम भागातील संघर्षाला खाकीचे कोंदण

। महाड । प्रतिनिधी ।

दुर्गम भागातील भौगोलिक आणि आर्थिक परिस्थितीची सर्व कुंपणे ओलांडून महाड तालुक्यातील दोन लेकींनी थेट मुंबई पोलीस दलाला गवसणी घातली आहे. भेलोशी गावातील अगदी सामान्य कुटुंबातील अस्मिता रेवाळे आणि सेजल यादव या दोन तरुणींनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, भेलोशी गावासह संपूर्ण पंचक्रोशीतून मुंबई पोलीस दलात भरती होणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या असून, त्यांच्या या यशामुळे तालुक्याची मान अभिमानाने उंचावली आहे.





भेलोशी हे महाड तालुक्यातील अत्यंत डोंगराळ आणि दुर्गम भागात वसलेले गाव आहे. अशा भागात राहून अस्मिता रेवाळे आणि सेजल यादव या दोघींनी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गावातच पूर्ण केले. घरची परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी खाकी वर्दीचे स्वप्न उराशी बाळगले होते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी मुंबई गाठली आणि तिथे राहून दिवस-रात्र मेहनत घेतली. राजू बैकर यांची सुकन्या आणि सिद्धेश रेवाळे यांची पत्नी अस्मिता, तसेच सुनिल यादव यांची कन्या सेजल यांनी मुंबईच्या वेगवान वातावरणात स्वतःला सिद्ध केले. पहाटेचा खडतर मैदानी सराव आणि रात्रीचा लेखी परीक्षेचा अभ्यास असा कठीण दिनक्रम पाळत त्यांनी हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या कुटुंबीयांचाही मोठा वाटा आहे. या दोन रणरागिणींच्या उत्तुंग कामगिरीमुळे भेलोशी गावाला एक नवी ओळख मिळाली असून, संपूर्ण महाड तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील मुलींसाठी अस्मिता आणि सेजल यांचे हे यश अत्यंत प्रेरणादायी ठरणारे आहे.

> लहानपणी पाहिलेले स्वप्न आज पूर्ण होत आहे, यामध्ये माझ्यासह कुटुंबातील सदस्यांनी मला मोलाची साथ दिली. भविष्यात या स्पर्धेत येणाऱ्या प्रत्येकाला मी नक्कीच मार्गदर्शन करेन.
> – सेजल यादव, नवनियुक्त पोलीस शिपाई

> मी पहिल्यापासून जिद्दीने या स्पर्धेत उभी होते. यामध्ये माझे वडील, आई, पती आणि कुटुंबाने माझ्यावर पूर्ण विश्वास दर्शवला. २०२३ मध्ये दिलेल्या परीक्षेत अपयश आले होते; परंतु, त्यानंतर अधिक जिद्द आणि चिकाटीने आज मुंबई पोलीस भरतीमध्ये यशस्वी झाले. भविष्यात आपल्या भागातील युवक आणि युवतींनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत उतरावे.
> – अस्मिता रेवाळे-बैकर, नवनियुक्त पोलीस शिपाई

मेंढपाळ रोजगार उरकून निघाले गावाकडे



| धाटाव। प्रतिनिधी ।

गेले ७ ते ८ महिने आपल्या शेळ्या-मेंढ्यांच्या कळपांसह शेकडो किलोमीटरची पायपीट करणारे राज्यातील मेंढपाळ आता आपापल्या मूळ गावाकडे परतू लागले आहेत. उन्हाळ्याचा कडक उधळत असलेला कडाका आणि आगामी मान्सूनच्या पावसाची लागलेली चाहूल या पार्श्वभूमीवर, राज्यातील विविध भागांत गेलेले मेंढपाळ आता आपला हंगामी रोजगार उरकून घराकडे निघाले आहेत. यामुळे सध्या महामार्ग आणि ग्रामीण रस्त्यांवर मेंढ्यांचे कळप आणि त्यांच्या पाठीवर संसाराचे गाठोडे घेतलेले मेंढपाळ पाहायला मिळत आहेत.


दरवर्षी दसरा-दिवाळीच्या सुमारास ग्रामीण भागातील, विशेषतः दुष्काळी भागातील मेंढपाळ चाऱ्याच्या आणि पाण्याच्या शोधात स्थलांतर करतात. सातारा, सांगली, सोलापूर, अहमदनगर आणि मराठवाड्याच्या काही भागांतून हे मेंढपाळ कोकण,विदर्भ आणि खान्देशाच्या दिशेने कूच करतात. यंदाही हजारो मेंढपाळांनी आपल्या कुटुंबासह आणि शेकडो मेंढ्यांसह स्थलांतर केले होते. विदर्भ आणि खान्देशातील कापणी झालेल्या शेतांमध्ये मेंढ्या बसवून,त्यांच्या विष्ठेपासून जमिनीला खत मिळवून देणे हा या मेंढपाळांचा मुख्य रोजगार असतो. या बदल्यात त्यांना शेतकरी धान्य किंवा रोख रक्कम देतात. मात्र, आता मे महिना संपत आला असून शेतातील कामे पूर्ण झाली आहेत. शेतकरी आता आगामी खरिपाच्या पेरणीसाठी शेतीची मशागत करू लागले आहेत. त्यामुळे मेंढ्यांसाठी आता शेतशिवारात जागा उरलेली नाही.पावसाची चाहूल आणि घराची ओढ लागली आहे. पाऊस सुरू झाला की, उघड्यावर संसार थाटणे अशक्य होते.

मेंढ्यांनाही ओल्या चाऱ्यामुळे आजार होण्याची भीती असते. त्यामुळे रोहयो किंवा इतर कामांपेक्षा आम्हाला आमच्या गावाची माती जवळ करावी लागते, असे आज रोहा कोलाड रस्त्यावर धाटाव नजीक रस्त्यावरून जात असताना साताऱ्या जिल्यातील खंडाळा तालुक्यात कराडवाडी गावच्या तात्याबा मारुती सोडनवर या ज्येष्ठ मेंढपाळाने सांगितले.

मृग नक्षत्र जवळ येत असल्याने आणि हवामान खात्याने यंदा वेळेवर पावसाचा अंदाज वर्तवल्यामुळे मेंढपाळांनी लगबग सुरू केली आहे. कारण मुसळधार पावसात मेंढ्यांचे लहान कोकरू दगावण्याची भीती असते, तसेच त्यांचा स्वतःचा संसारही उघड्यावर येतो. आपल्या गावाकडे परतण्याचा हा प्रवास सोपा नसतो. सध्या कडक उन्हाळा असल्याने मुक्या प्राण्यांना आणि लहान मुलांना घेऊन मैलोनमैल चालणे अत्यंत त्रासदायक ठरत आहे.

रस्त्यावरील वाढती वाहतूक,पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि काही ठिकाणी होणारे चोऱ्यांचे प्रकार यांमुळे मेंढपाळ रात्रीच्या वेळी जास्त प्रवास करणे पसंत करत आहेत. अनेक ठिकाणी विहिरी आटल्यामुळे मेंढ्यांना पाणी पाजण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. महामार्गावरून जाताना वाहनांच्या वेगामुळे अपघाताचा धोका सतत निर्माण होतो.

रात्रीच्या वेळी जंगली प्राण्यांपासून किंवा चोरांपासून कळपाचे रक्षण करण्यासाठी मेंढपाळांना जागून रात्र काढावी लागत आहे.गावाकडे रोजगाराची नवी चिंता गावी पोहोचल्यानंतर या मेंढपाळांना पुन्हा एकदा स्थानिक पातळीवर रोजगाराचा शोध घ्यावा लागणार आहे.



फ्लेमिंगोच्या दर्शनसाठी पर्यटकांची गर्दी

| उरण । प्रतिनिधी ।

नवी मुंबईतील एनआरआय तलावातील फ्लेमिंगोंच्या मनमोहक थव्यांचे दर्शन घेण्यासाठी सध्या शेकडो पक्षीप्रेमी आणि पर्यटकांची अरुंद किनाऱ्यावर प्रचंड गर्दी होत आहे. यामुळे या एकमेव अधिवासावर कमालीचा ताण येत असून, हा ताण कमी करण्यासाठी आणि शहरातील पक्षीनिरीक्षणाच्या संधी वाढवण्यासाठी शेजारील डीपीएस आणि टीएस चाणक्य वेटलँड्सचे तातडीने पुनरुज्जीवन करण्यात यावे, अशी आग्रही मागणी पर्यावरणवाद्यांनी केली आहे. शेजारच्या शहरांमधूनही मोठ्या संख्येने पर्यटक येत असल्याने सध्या एनआरआय तलाव क्षेत्र हे एक अनधिकृत पर्यावरण पर्यटन केंद्र म्हणून उदयास आले आहे, असे नॅटकनेक्ट फाऊंडेशनने सांगितले. स्थलांतरित पक्षी आणि निसर्गप्रेमी या दोघांच्याही हितासाठी तिन्ही पाणथळ जागा पुनर्जीवित करावेत, असे आवाहन संस्थेने राज्य सरकारला केले आहे. डीपीएस आणि टीएस चाणक्य वेटलँड्समध्ये पाणी साचून राहिल्याने आणि निळ्या-हिरव्या शेवाळाची अतिवृद्धी झाल्याने तेथील पाणी विषारी बनले आहे. परिणामी, भरतीच्या वेळी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यातून बाहेर पडणाऱ्या फ्लेमिंगोंसाठी आता एनआरआय तलावाचा काही भागच प्रमुख आश्रयस्थान बनला आहे.

जागतिक महत्त्वाच्या रामसर स्थळाचा दर्जा असलेल्या या अभयारण्यात हिवाळा आणि उन्हाळ्यात स्थलांतरित फ्लेमिंगो मोठ्या संख्येने येतात आणि पावसाळा सुरू होण्यापूर्वी कच्छच्या दिशेने परततात. लेसर फ्लेमिंगो प्रामुख्याने उथळ खाऱ्या आणि अल्कलाइन पाण्यातील सूक्ष्म अन्नस्रोतांवर जगतात. ते निळे-हिरवे शेवाळ, डायटॉम्स, प्लँक्टन आणि सूक्ष्म क्रस्टेशियन्स आपल्या विशेष चोचीद्वारे गाळून खातात. या शेवाळातील कॅरोटेनॉइड रंगद्रव्यांमुळेच फ्लेमिंगो पक्षांना त्यांचा आकर्षक गुलाबी रंग प्राप्त होतो. एनआरआय वेटलँडच्या मर्यादित भागावर पक्ष्यांचे अवलंबित्व वाढल्याने तेथील सूक्ष्म अन्नस्रोतांवर अतिरिक्त ताण निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पक्ष्यांसाठी पर्यायी खाद्यस्थळे उपलब्ध करून देणे गरजेचे असून डीपीएस आणि टीएस चाणक्य वेटलँड्सचे पुनरुज्जीवन अत्यावश्यक बनले आहे, असे ज्योती नाडकर्णी यांनी सांगितले आहे.

रानमेव्यातून महिलांना मिळतोय रोजगार

| पनवेल । प्रतिनिधी ।

रानातील काळी मैना म्हणून ओळखली जाणारी काळीभोर, गोड करवंदे सध्या पनवेलमधील बाजारपेठांमध्ये दाखल झाली असून, ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. यंदा मात्र करवंदांचा हंगाम उशिराने सुरू झाल्याचे दिसून येत आहे. नेहमीप्रमाणे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात बाजारात दिसणारी करवंदे यंदा एप्रिल महिना संपल्यानंतर, मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच बाजारात आली आहेत.

करवंदे विक्री करणाऱ्या महिलांच्या मते, यंदा हवामानातील बदलामुळे उत्पादनावर परिणाम झाला आहे, असे विक्रेत्यांनी सांगितले की, पावसाचे लांबलेले आगमन, थंडीचे वाढलेले प्रमाण आणि अवकाळी पावसामुळे करवंदांच्या झाडांना योग्य वेळी फुलोरा आला नाही. परिणामी



फलधारणा उशिरा झाली आणि उत्पन्नात घट झाली आहे. करवंदे विकणाऱ्या महिलांसाठी हा व्यवसाय केवळ पूरक नव्हे, तर मुख्य उदरनिर्वाहाचे साधन आहे. पळसाच्या पानात सजवून विकली जाणारी करवंदे ग्राहकांचे विशेष आकर्षण ठरतात. मात्र, या मागे महिलांची प्रचंड मेहनत दडलेली आहे. रणरणत्या उन्हात डोंगर-दऱ्यांत, जंगलात जाऊन काटेरी झुडपांतून करवंदे शोधावी लागतात. अनेकदा काट्यांचे फटके सहन करत, तासन्तास कष्ट करून त्या टोपलीभर करवंदे गोळा करतात.

ग्राहकांची पसंती

सध्या पनवेलच्या बाजारात करवंदांसोबत, आंबे इतर रानमेवा आणि विविध रानभाज्याही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. रानमेवा दिवसेंदिवस दुर्मिळ होत चालल्याने त्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे गल्ली-बोळ, नाके आणि बाजारपेठांमध्ये या वस्तू खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एकंदरीत, निसर्गाच्या बदलत्या चक्राचा परिणाम रानमेव्यावर होत असला तरी, त्यातून महिलांना मिळणारा रोजगार आणि ग्राहकांकडून मिळणारी पसंती ही बाब महत्त्वाची ठरत आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि माझ्या अशिलांनी मौजे चौल, ता.अलिबाग, जि.रायगड येथील श्री.प्रवीण रघुनाथ राऊत व इतर रा.चौल यांच्या खुद्द व सामाईक मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे चौल, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २३५९/२ क्षेत्र ०-४४-०० हे. आर, आकार रु.२२.४० पैसे पैकी ०-३३-६० हे.आर. आकार रु.१७.१० पैसे या बागायत मिळकतीपैकी क्षेत्र ०-०५-४० हे. आर.

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे तावे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- २८/०५/२०२६

सही/-
ॲड. ऋग्वेद अविनाश ठाकूर.
रा.५/३, आत्माराम नगर,
अलिबाग- रायगड
मोबा.नं.९८५००९०१०३

जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे.-वढाव बुद्रुक, ता.अलिबाग जि.रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग : ९१ क्षेत्र ०.४४.४० (हे.आर.), पो.ख ०.०५.५० (हे.आर.), एकूण क्षेत्र ०.४९.९० (हे.आर.), आकार १०.८१ (रु.पैसे) ही भातशेती मिळकत विद्यमान मालक श्री.नारायण राघो खंडाळकर रा.वढाव, ता.अलिबाग, जि.रायगड यांजकडुन जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांनी विकत घेण्याबाबत वाटाघाट केलेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांचे मुदतीत रजिस्टर पोस्टाने सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :-२२/०५/२०२६.

(ॲड. परेश एम.घरत)
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी.स्टँड जवळ, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१
मो.९८५०४८१२३४

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-ममदापूर ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल सुप्रिम एंटरप्रायजेस यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मालकाचे नांव	सर्व्हे नं	प्लॉट नंबर	क्षेत्र चौ.मी.	आकार रू. पै.
अब्दुल कय्युम रशिद चौलकर	१५०	२	३१८.१२ चौ.मी.	३१.८०
	१५०	३	४७१.७० चौ.मी.	४७.२०
	१५०	४	५२३.६४ चौ.मी.	५२.४०

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून एकविस (२१) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांचे सुचनेनुसार मी खाली नमूद केलेल्या शेती मिळकतीचे (सदर मिळकत) विद्यमान मालक श्री.परमेश्वर गजानन गट्टे यांचा मालकी हक्क हितसंबंध निर्वेध असल्याबाबत तपास/खात्री करणेची प्रक्रीया चालु केली आहे. माझे अशिलांनी विद्यमान मालकांकडुन सदर मिळकत खरेदी घेण्याचा करार केला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील शेती मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नं. हिस्सा नं	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू.पै.
२३८/४	००-०१-८०	०.५९
व त्यातील ग्रामपंचायत थळ घर क्र.२३७, क्षेत्र ३७.१७ चौ.मी.		

वर नमूद मिळकतीमध्ये कुठल्याही व्यक्ती/व्यक्तींचा, कंपनीचा, मर्यादित दायीत्व भागिदारी संस्था, भागिदारी संस्था, वित्तीय महामंडळ, बिगर बॅकींग वित्तीय महामंडळ, पतसंस्था इत्यादी कोणाचाही हिस्सा, दावा, हरकत, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, परस्पर सामंजस्याचा करार करार, हुकुमनामा, वारसाहक्क, अदलाबदल दस्त, हक्कसोड पत्र, कौटुंबिक व्यवस्था, बोजा, ठरवलेल्या दस्तांमार्फत ताबा कब्जा दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्यावर कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २८/०५/२०२६

ॲड. तन्मय रविंद्र ओक
'गुरूकृपा',
अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.
अलिबाग, जि. रायगड.

जाहीर सूचना

आमच्या अशिलांच्या निर्देशांतर्गत आम्ही मोजमापित २१.९२ आर (२१९२चौ. मी.) वा जवळपास क्षेत्रफळाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. १९८३/२००९/२२०२/४ (७/१२ उताऱ्यानुसार), गाव नागाव, तालुका अलिबाग, नोंदणीकरण उपिजल्हा अलिबाग, जिल्हा रायगड या विवरणाच्या जागेसंदर्भात श्री. मायकेल जे. फर्नांडीस व श्रीमती रुक्मी फर्नांडीस यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत. कोणाही व्यक्तीचा वा व्यक्तींचा सदर जागा वा तिच्या हिश्श्यासंदर्भात कोणताही दावा असल्यास त्यांनी आपले दावे लिखित स्वरूपात त्यांच्या पुष्ट्यर्थ कागदोपत्री पुराव्यासमवेत अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत पाठवावेत अन्यथा दावे, काही असल्यास, ते अधित्यागित सम जले जातील.

दिनांक : २९.०५.२०२६

जय हिरानंदानी
भागीदार
राजन हिरानंदानी ॲन्डअसोसिएट्स,
वकील
५०४ ए/बी, नीलकंठ ९८, मरीन ड्राइव्ह,
मुंबई - ४०० ००२.

जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे मालकी ताबे कब्जातील असल्याची ग्वाही विद्यमान मालकाने दिल्यावरून त्यांचे कडून आमचे खरेदीदाराने खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. आणि तश्या आशयाची बोलणी त्यांचा व आमच्या खरेदीदाराच्या दरम्यान झाली आहे. सदरची खाली वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजविरहित असल्याचा भरवसा आमचा अशिलांना विद्यमान मालक **श्री. दिनानाथ दयानंद म्हात्रे** यांनी दिला आहे. सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणतीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी खालील पत्यावर त्यांची हरकत लेखी नोंदवावी. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

गाव	गट न	क्षेत्र		आकार
वैजाळी तालुका :- अलिबाग	५८	क्षेत्र पो. खराबा एकूण	०.२९.५० हेक्टर आर ०.०६.८० हेक्टर आर ०.३६.३० हेक्टर आर	६.६२
हाशिवरे. तालुका:- अलिबाग	१५/१ /क	क्षेत्र पो. खराबा एकूण	०.२७.२० हेक्टर आर ०.०२.३० हेक्टर आर ०.२९.५० हेक्टर आर	३.८१

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचीही वहिवाट दान, गहाण, बक्षीस, लिस, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदि कोणत्याही प्रकारे कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्याची हरकत योग्य त्या कागदोपत्री, पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्यावर सही करणार यांच्याकडे कळवावे, तशी कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बिनजोखीम आहे, असे समजून आमचे खरेदीदार सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली कोणतीही हरकत आमचे खरेदीदाराचे बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेनी नोंद घ्यावी.

दिनांक - २९/०५/२०२६

(खरेदीदाराचे वकील)
सही /-
डॉ. ॲड. निहा ए. राऊत
लव्बैक, इस्माईल अली, अलिबाग,जिल्हा :- रायगड- ४०२२०१
संपर्क :- ८३७८९६४३३३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल सीमा राजकुमार पाटील रा. रुम नं.३०२, तुषार विला, प्लॉट नं.९/११, रोड नं.११, सेक्टर १९, न्यू पनवेल, पनवेल, रायगड ४१०२०६. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन :- मौजे - आंबिवली बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नं	हिस्सा नं.	क्षेत्र			आकार	
		हे..	आर.	पॉ	रुपये	पैसे
३४	१	१	७	१	०	१२

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालीका
शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. निलेश दामु मुंढे
दिनांक :- २९/०५/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे बोरगाव, ता.कर्जत, जि.रायगड

भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.पॉ	आकरणी रू.पै.
४/४	एकूण क्षेत्र ६-५७-०० हे.आर,	३.६४

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :- २९/०५/२०२६

ॲड. रोहित रो.मानकवळे
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे गट नं. २५५, क्षेत्र ० हे. ४२.२० आर आकार ३ रुपये ५० पैसे ही मिळकत या नोटीसीचा विषय आहे. यापुढे त्या मिळकतीस 'सदर मिळकत' असे संबोधण्यात आले आहे.

सदर मिळकत ही प्रगती प्रभाकर राऊत व वैभव प्रभाकर राऊत यांच्या सामायिक मालकीची आहे. ती त्यांनी आमचे अशिल श्री. जितेंद्र दत्तात्रेय म्हात्रे, रा.आगरसुरे, ता.अलिबाग यांस कायम मालकी हक्काने विकत देण्याबाबत त्यांच्या लाभात साठेकरार स्वाक्षरीत करुन त्यांचेकडून भरीव रक्कम अंशदान म्हणून स्विकारलेली आहे.

साठेकरारामध्ये ठरलेल्या अटी व शर्तींप्रमाणे खरेदी व्यवहार पुर्ण करण्यास आमचे अशिल सदैव तयार होते व आहेत.

मात्र आमच्या अशिलांबरोबर साठेकरार झालेला असताना देखील तो डावलून प्रगती प्रभाकर राऊत व वैभव प्रभाकर राऊत हे अन्य त्रयस्थ इसमांबरोबर सदर मिळकतीचा विक्री व्यवहार करीत आहेत व आमचे अशिलांबरोबर व्यवहारच ठरलेला नाही, अशी बतावणी करीत आहेत. वस्तूस्थिती अशी आहे की, आमचे अशिलांबरोबर झालेला साठेकरार आजही कायदेशीररित्या अस्तित्वात आहे. त्यामुळे प्रगती प्रभाकर राऊत व वैभव प्रभाकर राऊत यांस सदर मिळकतीबाबत अन्य कुणाही इसमाबरोबर विक्री व्यवहार ठरविणेचा अधिकार नव्हता व नाही. सदर मिळकतीचे अन्य इच्छूक खरेदीदारांनी त्यांचे वकील श्री.परेश एम.घरत यांचेमार्फत ता.२०/५/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीस आमचे अशिलांनी हरकत कळविलेली आहे. तसेच त्यानंतर ता. २४/५/२०२६ रोजी त्यांनी पुन्हा प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीस देखीन आमचे आशिलांची हरकत असून रितसर लेखी हरकत परेश एम.घरत यांस स्वतंत्रपणे कळविली जात आहे.

तरी प्रगती प्रभाकर राऊत व वैभव प्रभाकर राऊत यांचेबरोबर सदर मिळकतीविषयी कुणीही विक्री व्यवहार करू नये.

मात्र पुर्वसुचना देवून देखिल कुणीही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशिल संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करतील, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २९/५/२०२६

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील.
अे/१,२, तळमजना,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे असे सूचित करण्यात येते की, वर नमूद केलेल्या जमिनी आणि बांधकाम याबाबत अलिबाग येथील दिवाणी कोर्टामध्ये स्पेशल मुकदमा ४८/२०२६ या क्रमांकाचा दावा प्रलंबित आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे सदर मिळकतींबाबत जमीन मालक यांच्याबरोबर खरेदी-विक्री, दान, गहाण, बक्षीस, अदलाबदल, रस्त्याचा हक्क देणे यासारखा कोणत्याही प्रकारचा व्यवहार कोणी करण्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे.

तारीख : २८/०५/२०२६

सही/-
ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे
शांतादुर्गा कोऑप. डॉसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग रायगड.
मोबाईल: ९२७०९६२९२९

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मे.दुय्यम निबंधक अलिबाग यांचे हद्दीतील, रायगड जिल्हा परिषदेच्या हद्दीतील, पंचायत समिती अलिबागच्या हद्दीतील, मौजे तळबंद येथील जमिन यांसी,

१)मिळकतीचे वर्णन:-

भुमापन क्र. व उपविभागा	क्षेत्र हे.आर	आकार रु.पैसे	गाव
४/४	०-५५-२० पो.ख ०-०३-०० एकुण ०-५८-२०	८.३१	तळबंद ता.अलिबाग, जि.रायगड

सदर मिळकतीपैकी श्री.भालचंद्र रघुनाथ पाटील यांचे मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील एकुण ०-३३-४० हे.आर. इतकी जमिन मिळकत आहे. सदरील जमिनीपैकी ०-०५-३१ हे.आर इतके क्षेत्र त्यांनी आमचे अशिलांस विकण्याचे ठरवले आहे. सदरची जमिन निर्वेध व निजोखमी असल्याबद्दल श्री. भालचंद्र रघुनाथ पाटील यांनी आमचे अशिलांना भरवसा दिला आहे.

तरी सदर जमिनीवर कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध, बोजा गहाण, दान, बक्षिस, लीज, वहिवाट, वारसा, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तीने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर सर्व संबंधित कागदपत्र घेवुन येवून आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची जमिन पुर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे असे समजून अथवा कोणाचा हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मग मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

कळावे.

सही/-
अशिलांतर्फे वकील
ॲड. शैलेश ज्ञानेश्वर मोकल
ब्लॉक नं.६, पहिला मजला, बी विंग,
शिवम् को.ऑप. हौ.सो. ब्राम्हणआळी,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी, गाव पोयनाड येथील खालील वर्णनाची मिळकत प्रविण गिरीधर टेमकर, उमेश गिरीधर टेमकर, अजय गिरीधर टेमकर, प्रिती प्रदीप टेमकर, अनिकेत उर्फ निकेत प्र

करंजा बंदराच्या मासळी निर्यातीत वाढ

। चिरनेर । प्रतिनिधी ।

पावसाळी बंदीमुळे करंजा बंदरातील मासळी निर्यात बाजार ही बंद झाला आहे. या करंजा मच्छिमार बंदरातून २०२५ मध्ये ३० ते ३५ हजार मेट्रिक टन इतक्या मासळीची निर्यात झाली असून ही राज्यातील निर्यातीच्या १० टक्के निर्यात आहे. यावर्षी अनेक कारणांमुळे मासळीची आवक कमी असली तरीही निर्यातीत मात्र वाढ झाली असल्याची माहीती मासळी निर्यातदारांनी दिली आहे.

करंजा बंदर हे देशातील सर्वात मोठे मासळी निर्यातीचे हब बनू पहात आहे. यात अरबी समुद्रातून पकडलेल्या रिबन फिश, कटल, माकोल, नळ, कुपा, बांगडा आदी प्रकारच्या मासळीची निर्यात युरोप, थायलंड, व्हिएतनाम, हाँगकाँग, सिंगापूर, मिडल ईस्ट आधी भागात पोहचली आहे.



नव्याने निर्माण झालेल्या करंजा मच्छिमार बंदरातून बंदरातून ६०० कोटींपेक्षा अधिकची निर्यात केली जात आहे. यावर्षी बंदरातून ३० ते ३५ मेट्रिक टन मासळीची निर्यात करण्यात आली असल्याची माहिती निर्यातदारांनी दिली आहे.

ही मासळी अमेरिका, चीन थायलंड तसेच आशिया वन युरोप खंडातील अनेक देशात निर्यात करण्यात आली आहे. तर दुसरीकडे मासळी बंदर आणि त्यावर आधारित विविध प्रकल्पांमुळे करंजा परिसरात विविध प्रकारच्या छोट्या-मोठ्या लघु उद्योगात वाढ झाली आहे. त्यामुळे बंदरातील ४५० मासेमारी बोटी,त्यावर आधारित २ हजार कुटुंबाना लाभ होणार आहे. त्याचप्रमाणे या बंदरामुळे येथील स्थानिक बेरोजगारांना रोजगारही उपलब्ध होऊ लागला आहे. मुंबईच्या ससून बंदराला पर्याय म्हणून उरणच्या करंजा येथे नवे बंदर उभारण्यात आले आहे. त्यामुळे येथील मच्छिमारांना लाभ झाला आहे. त्याच बरोबरीने स्थानकांच्याही व्यवसायात भर पडली आहे.

प्रामुख्याने कोळी आगरी बांधवांचीच सर्वाधिक वस्ती आहे.यामुळे मासेमारी व्यवसाय करणे ओघाने आलेच. मोठ्या प्रमाणावर पारंपारिक पध्दतीने व्यवसाय करणाऱ्या मच्छिमारांमुळे राज्यातील सात सागरी जिल्ह्यातील सर्वात मोठे मच्छिमार करंजा गाव म्हणून ओळखले जाते.राज्यातील सर्वाधिक सुमारे ४५० मच्छिमार बोटी याच करंजा गावात मासमारी करतात. राज्यातील सर्वात मोठी मच्छिमार सहकारी संस्थांही करंजातच आहे. वार्षिक सुमारे १०० कोटींची उलाढाल असलेल्या या मच्छिमार संस्थेच्या माध्यमातून

> करंजा मच्छिमार बंदरावर २०२५ च्या मासळी हंगामात ३० ते ३५ मेट्रिक टन मासळी उतरविण्यात आली असून ही राज्यात उतरवण्यात आलेल्या एकूण मासळीच्या १० टक्के आहे. तर करंजा बंदरातून होणाऱ्या निर्यातीत ही वाढ झाली आहे.
> – गणेश नाखवा
> करंजा निर्यातदार

डिझेलपुरवठा केला जात आहे. मच्छिमारांसाठी लागणारे साहित्य किफायतशीर दरात उपलब्ध करून देण्यासाठी दुकानही सुरू आहेत.

मच्छिमारांच्या शेकडो बोटी मासळी उतरविणे, विक्रीसाठी मुंबईतील एकमेव ससुनडॉक बंदराच्या आश्रयाला जात होते. त्यामुळे ससुनडॉक बंदरावरील वाढता ताण लक्षात घेऊनच करंजा येथेच उपयुक्त जागेत सुमारे ३०० कोटी खर्चाचे एक हजार मच्छिमार बोटी क्षमतेचे अद्यावत करंजा मच्छिमार बंदर उभारण्यात आले आहे. याआधीच मच्छिमारांसाठी आवश्यक लागणारे साहित्य पुरविण्यासाठी जाळी, रंग, सामान पुरवठा करणारे हार्डवेअर,२०-२५ वर्कशॉप्स, जाळींची दुकाने आहेत. करंजा येथुन काही वर्कशॉप्समध्ये तयार करण्यात येणारे मच्छिमार बोटींसाठी लागणारे पंखे, टनट्युब, सॉफ्ट आदी यांत्रिक साहित्याला थेट विदेशातून मोठी मागणी आहे, असे यांत्रिक साहित्य विदेशात पाठवले जाते. १ जून पासून मासेमारी हंगाम दोन महिन्यांसाठी बंद होणार असून सद्या ९० टक्के मासेमारी बोटींनी करंजा बंदरात नांगर टाकला असल्याची माहीती करंजा संस्थेचे माजी उपाध्यक्ष रमेश नाखवा यांनी दिली आहे.

निवडक

आचारसंहितेमुळे लोकशाही दिन रद्द

रायगड : शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रकान्वये प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. दरम्यान, मुख्य निवडणूक अधिकारी, कार्यालयाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. हा निवडणूक कालावधी २५ मे २०२६ ते २५ जून २०२६ असा असून, संबंधित मतदारसंघात दि. २५ मे २०२६ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. यामुळे शासन परिपत्रकातील मुद्दा क्र.५.७ मधील तरतुदीनुसार सोमवार, १ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन रद्द करण्यात आला आहे. याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

पनवेल शहर जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी श्रुती म्हात्रे

उरण : काँग्रेस पक्षाचा तळागाळात प्रचार व प्रसार व्हावा, उत्तमपणे संघटनात्मक बांधणी व्हावी, समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा या अनुषंगाने काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय समितीने विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यात महाराष्ट्रात पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदी काँग्रेसच्या कट्टर एकनिष्ठ व प्रामाणिक कार्यकर्त्या असलेल्या व गोर गरीब जनतेच्या न्याय हक्कासाठी नेहमी झटणाऱ्या श्रुती शाम म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे.काँग्रेस पक्षाच्या एकनिष्ठ कट्टर प्रामाणिक कार्यकर्त्या म्हणून श्रुती म्हात्रे यांची ओळख आहे. शिवाय प्रसिद्ध महिला सामाजिक कार्यकर्त्या व कामगार नेत्या म्हणूनही त्या सर्वांना सुपरिचित आहेत. श्रुती म्हात्रे यांना त्यांचे वडिल कामगार नेते, काँग्रेसचे जेष्ठ नेते स्व. शाम म्हात्रे यांच्याकडून राजकारणाचा वारसा मिळाला. वडिलांचा विचार कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून श्रुती म्हात्रे सुरवातीपासूनच कार्यरत आहेत. श्रुती म्हात्रे यांनी आजपर्यंत हजारो कामगारांना, गोर गरीब जनतेला न्याय दिला आहे. काँग्रेस पक्षाचा तळागाळात प्रचार व प्रसार केला आहे. काँग्रेस पक्षाची उत्तम संघटनात्मक बांधणी केली आहे. सध्या श्रुती म्हात्रे या कोकण श्रमिक संघाच्या अध्यक्षा, शाम म्हात्रे फॉउंडेशनच्या अध्यक्षा, एकता कॅटलीस्ट संघटनेचे अध्यक्षा, आगरी शिक्षण संस्थेचे सहसचिव, आगरी शिक्षण संस्था शाळा समितीचे अध्यक्षा, हिंद मजदूर सभा महाराष्ट्र कौन्सिलचे सदस्य असे अनेक पदे भुषवित आहेत. अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या त्या पार पाडत आहेत. त्यांच्या या सर्वच कार्याची दखल घेत त्यांच्यावर काँग्रेस पक्षाने विश्वास दाखवत पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदी निवड केली आहे.



अपघातग्रस्त शिक्षकांना आर्थिक मदत देण्याची मागणी

खरोशी : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ शाखा खालापूर यांच्यावतीने जनगणना अधिकारी तथा तहसीलदार खालापूर यांना जनगणना कर्तव्यावरील अपघात ग्रस्त महिला शिक्षिका यांना आर्थिक मदत आणि शिक्षकांच्या अडीअडचणी बाबत निवेदन सादर करण्यात आले. प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दिपक पालकर, धनाजी थिटे कार्याध्यक्ष मारुती दासरे केंद्र प्रतिनिधी राजू दुर्गे हे उपस्थित होते. सदर निवेदनात श्रीमती दिपाली कांबळे आणि सौ आशाताई पवार यांना जनगणनेचे कर्तव्य बजावत असताना प्रवासात अपघात झाला असल्याने अपघातग्रस्त कर्मचाऱ्याला आर्थिक मदत मिळावी याकरता मागणी करण्यात आली. यामध्ये तहसीलदार यांनी सकारात्मक विचार करून आपली मागणी रास्त असून गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत रीतसर प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना केली आहे.तसेच आर्थिक कारणास्तव काही शिक्षक व अंगणवाडी सेविका अद्यावत अँड्रॉइड मोबाईल उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे काम सुरू झालेले नाही त्यांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करून निर्णय घ्यावा अशी मागणी केली.

कामोठेत अतिक्रमणांवर विशेष कारवाई

पनवेल : पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क कामोठे अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार अतिक्रमण विभागाच्या वतीने नुकतीच विविध ठिकाणी अनधिकृत फेरीवाले, हातगाड्या तसेच जाहिरात टेम्पो यांच्यावर विशेष कारवाई करण्यात आली.कामोठे विभागातील मानसरोवर रोड, खांदेश्वर रेल्वे स्टेशन रोड, गणपती मंदिर परिसर, सेक्टर १८ नीलकंठ स्वीट परिसर, क्सिस बँक समोरील परिसर, मोठा खांदा हायवे जवळील सेक्टर २२ तसेच कजरी समोरील फुटपाथ परिसरात ही कारवाई करण्यात आली. सदर कारवाई मा. सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रुपाली माने यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या कारवाईदरम्यान फुटपाथ व सार्वजनिक रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांच्या हातगाड्या, टेम्पो तसेच विविध साहित्य जप्त करण्यात आले. नीलकंठ चौक येथून आईस्क्रीम व केएफसीची हातगाडी जप्त करण्यात आली. ही गाडी तसेच १ हातगाडी व १ अनधिकृत जाहिरात टेम्पो जप्त करून सुवर्णदुर्ग कार्यालय, कामोठे येथे जमा करण्यात आले.

माणगाव तालुक्यात बकरी ईद उत्साहात साजरी

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यात गुरुवारी ईद - उल - अजहा म्हणजेच बकरी ईद सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. बकरी ईदची सामुदायिक नमाज अदा केल्यावर मुस्लिम बांधवानी एकमेकांना गळाभेट आलिंगन देत बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच हिंदू बांधवांनीही मुस्लिम बांधवांची घरोघरी भेट घेऊन तसेच दूरध्वनीवरून बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. या बकरी ईदनिमित्त तालुक्यात सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

माणगाव तालुक्यातील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला, बाजारपेठ मोहल्ला, नाणोरे, लोणशी मोर्बा, निजामपूर, दहिवली, दहिवली कोंड, तारणा, वडवली, साई, मांजरवणे, गोरेगाव, टेमपाले, लाखपाले, वणी, पुरार, हारकोळ आदी मुस्लिम वस्ती मोठी असलेल्या या सर्व गावांतून बकरी ईद उत्साहात साजरी करण्यात आली.

जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील जाम मशिदीत हजारो मुस्लिम बांधवांनी गुरुवारी सकाळी बकरी ईदची सामुदायिक नमाज अदा केली. यावेळी मौलाना हाजीमिया जामदार यांनी कुराणाचे वाचन करून उपस्थित मुस्लिम बांधवाना बकरी ईदचे महत्व सांगितले. या बकरी ईदनिमित्त अनेक मुस्लिम बांधवांनी अल्लाहच्या नावाने बोकडाच्या कुर्बानी दिल्या. राजिपचे माजी सभापती ॲड.राजीव साबळे, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, संगीता बक्कम, उपनगराध्यक्ष रिया उभारे, नितीन बामगुडे, सुधीर पवार, बाबुराव निंबाळकर, डॉ.अजय मेहता, माजी उपनगराध्यक्ष राजेश मेहता, रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, नगरसेवक दिनेश रातवडकर, पाणीपुरवठा सभापती अजित तारलेकर, माजी नगरसेवक सिराज परदेशी, अकबर परदेशी, चॅरीझेन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, किशोर झेमसे, राकेश पडवळ, उद्योजक अरुण क्षिरसागर, शंकर शिंदे , सामाजिक कार्यकर्ते संजय आण्णा साबळे, रवींद्र भिकु मोरे, निलेश थोरे, नितीन दसवते, प्रसाद धारिया, भालचंद्र खाडे, प्रवीण बागवे, जेष्ठ पत्रकार अरुण पवार, राकेश जाधव, एकता ग्रामीण क्रिकेट असोसिएशन माणगाव संस्थापक राहुल दसवते, सचिन गोरेगावकर, मंगेश पाटील, रामदास पवार, नयन दसवते, माणगाव पतसंस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, कार्यकर्ते यांनी नमाज झाल्यावर मशीद ठिकाणी व घरोघरी जाऊन मुस्लिम बांधवांची भेट घेऊन त्यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच अनेक हिंदू बांधवानी प्रत्यक्षात भेटून व दूरध्वनीवरून मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या.

बकरी ईदनिमित्त पोलीस बंदोबस्त



। पनवेल । प्रतिनिधी ।

बकरी ईद सण शांततेत आणि उत्साहात पार पडावा तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पनवेल शहरातील मुस्लिम नाका परिसरात पोलिसांकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. परिसरात पोलीस अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने तैनात करण्यात आले होते.

सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी यासाठी पोलिस प्रशासन सतर्क होते. यावेळी डीसीपी यांनी स्वतः मुस्लिम नाका परिसराला भेट देत बंदोबस्ताची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

नागरिकांनीही पोलीस प्रशासनाला सहकार्य करीत बकरी ईद सण शांतता आणि आनंदात साजरा केला.

म्हसळ्यात बकरी ईद उत्साहात



। म्हसळा। प्रतिनिधी ।

मुस्लिम बांधवांचा पवित्र सण बकरी ईद म्हसळा तालुक्यात सर्वत्र आनंदी आणि उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली.

सर्व मुस्लिम बांधव म्हसळा बाजारपेठेतील मुख्य मशिदीत एकत्र येऊन ईदगाह येथे ईदची नमाज अदा करून एकमेकांच्या गळेभेट करून ईदचा आनंद साजरा केला जातो. कुटुंबातील व्यक्तीच्या नावाने बकरी ईद निमित्त बोकडाची कुर्बानी देण्याची प्रथा म्हणजेच प्रत्येकजण कुर्बानी देणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी जमजतो. तीन दिवस हा कुर्बानी देण्याचा कार्यक्रम सुरु असतो, या कुर्बानीच्या माध्यमातून आपापसात जवळीक साधली जाते.ईदचा पहिला दिवस मुख्य दिवस तर दुसरा दिवस बाशी ईद आणि तिसरा दिवस खुशी ईद म्हणून साजरा केला जातो.

रोह्यात बकरी ईद उत्साहात साजरी

। रोहा। प्रतिनिधी।

इस्लाम धर्मात शेवटचा महिना म्हणजे जुल हिज्जा होय. या महिन्यात जगभरातील करोडो मुस्लिम समाज बांधव व भगिनी सौदी अरेबिया येथील मक्का मदिना या पवित्र भूमीत हज यात्रे साठी रवाना होतात.महिन्याच्या नव्या दिवशी येथील अराफात मैदानातील विधी पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी जगभरात बकरी ईद साजरी करण्याची प्रथा आहे.या अनुषंगाने रोहे तालुक्यासहित संपूर्ण रायगड जिल्ह्यातील मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद मोठ्या उत्साहात,शांततेत आणि पारंपारिक पद्धतीने साजरी केली.

बुधवारी एकदिवसीय उपवास



यंदा सौदी अरेबिया येथील मक्का मदिना येथे हजसाठी देशभरातून दीड लाखहून अधिक भाविक गेले आहे. मागील दोन महिन्यापासून इराण विरूद्ध अमेरिका या दोन देशांमध्ये युद्ध पेटला आहे.या युद्धामुळे विमान सेवा काही काळ खंडित करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने विमानसेवा सुरळीत ठेवल्याने हज यात्रेकडू यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

केल्यानंतर गुरुवारी पहाटे ईदची सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर मौलवी यांनी खूतबा पठण केल्यानंतर संपूर्ण भारतदेशात शांतता नांदावी. तसेच बंधूभाव व एकोपा कायम राहावे यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

ईदच्या पार्श्वभूमीवर सणाला गालबोट लागू नये म्हणून सर्वत्र मशिदी बाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आले होते. ईदच्या अनुषंगाने पोलिस प्रशासना कडून काही नियम लागू करण्यात आले होते. न्हावे, सूडकोली, खैरे खुर्द, चांडगाव, कोलाड, नागोठणे आदी ठिकाणी असलेल्या मशिदीत सामूहिक नमाज अदा करून ईद साजरी करण्यात आली.

सुपेगाव-फणसाड रस्ता खड्ड्यात

। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।

पावसाळा अगदी तोंडावर आला तरी मुरुड-सुपेगाव-रोहा मार्गावरील महत्त्वाच्या सुपेगाव-फणसाड रस्त्याची दुरावस्था कायम आहे. मुरुड - साळाव या रस्त्यावर तब्बल ३२ मोऱ्यांचे काम सुरू आहे. जागोजागी खड्डे खणून ठेवले आहेत.

या सुपेगाव रस्त्यावर सुमारे दोन ते तीन किलोमीटर लांबीचा मार्ग खड्डेमय अवस्थेत असून त्याचे दुरुस्ती व डांबरीकरणाचे काम अजूनही सुरू झालेले नाही.



या रस्त्याची तातडीने दुरुस्ती न झाल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. संबंधित बांधकाम विभाग आणि ठेकेदार यांच्या निष्काळजीपणामुळेच ही परिस्थिती निर्माण झाली आहे का, असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पावसाळ्यात परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता असल्याने तातडीने लक्ष घालून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

सुधागडच्या शुभ्रा शिंदेची इस्रोच्या शैक्षणिक सहलीसाठी निवड

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

गुरूकुल एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर या संस्थेच्या वतीने इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंत मराठी, सेमी इंग्लिश, इंग्लिश व उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी २०११ पासून स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात येत आहे.

२५ जानेवारी रोजी झालेल्या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील ३६१७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या राज्यस्तरीय स्पर्धेतून ६२ विद्यार्थ्यांमधून रायगड जिल्ह्यातील शुभ्रा सुधीर शिंदे (फणसवाडी) ७ वी ग. बा. वडेर हायस्कूल पाली सुधागड, सार्थक सुहास माने इयत्ता ७ वी सीकेटी इंग्लिश मीडियम स्कूल न्यू पनवेल, विनीत विनोद कापसे इयत्ता ८ वी,द. ग. तटकरे उच्च माध्यमिक विद्यालय कोलाड, साई योगेश म्हात्रे इयत्ता ७ वी रजिप पिंगोंडे रोहा, या चार विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादीतून ४ जून २०२६ च्या इस्रोच्या शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

मुख्याध्यापक सुरेश जंगम सन्मानाने सेवानिवृत्त

खांब : श्री.रा.ग.पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब या विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश जंगम सन्मानाने सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा यथोचित सन्मान करण्यासाठी संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे, दिलिप पोतनीस, अविनाश म्हात्रे, धोंडू कचरे, शंकरराव म्हसकर, धनाजी लोखंडे, बाळाराम धामणसे, नंदकुमार कापसे, गजानन भोईर, सुभाष माटल, बाबूराव बामणे, नरेंद्र जाधव, मुख्याध्यापक दिपक जगताप, बळीराम चव्हाण, विनय मारगे आदी उपस्थित होते.

बाटल्यांतील पाण्याने फुटली नवी पालवी | पत्रकार अरुण पवार यांचा पर्यावरणपूरक उपक्रम

वणव्यात होरपळलेल्या रोपांना मिळाले नवजीवन

। माणगाव । सलीम शेख।

माणगाव शहरातील मोर्बा रोड परिसरात सामाजिक संघटना आणि वनविभागाच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात दुतर्फा वृक्षलागवड करण्यात आली होती. भविष्यात हा परिसर हिरवागार व्हावा, प्रदूषण कमी व्हावे आणि पुढील पिढ्यांना शुद्ध पर्यावरण मिळावे, या उदात्त हेतूने लावलेली ही कोवळी रोपे काही अज्ञात समाजकंटकांनी लावलेल्या वणव्यात होरपळून गेली.

आगीच्या तीव्र झळांमुळे अनेक रोपांची पाने, फांद्या आणि नाजूक पालवी पूर्णपणे जळून खाक झाली होती. काही रोपे अक्षरशः मरणासन्न अवस्थेत उभी होती. उन्हाच्या तीव्र झळा, पाण्याचा अभाव आणि आगीचा तडाखा यामुळे ही हिरवी स्वप्ने संपुष्टात येणार की काय, अशी भीती निर्माण झाली होती. ही विदारक परिस्थिती पाहून पत्रकार अरुण पवार यांचे मन हेलावून गेले. ही झाडे बोलू शकत नाहीत, पण त्यांनाही जगायचे आहे, या भावनेतून त्यांनी या कोवळ्या रोपांना वाचवण्याचा निर्धार केला. परिसरात पाण्याची कोणतीही सोय नसतानाही त्यांनी हार मानली नाही. मोर्बा रोडवरून दररोज मोठ्या संख्येने पर्यटक



आणि वाहनचालक प्रवास करतात.

अनेक जण अर्धवट पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या रस्त्याकडेला फेकून देतात. इतरांसाठी तो फक्त कचरा होता; पण अरुण पवार यांनी त्यातच जीवन शोधले. त्यांनी परिसरातील फेकून दिलेल्या बाटल्या गोळा केल्या आणि त्यामधील उरलेले पाणी या तहानलेल्या रोपांच्या मुळाशी घालण्यास सुरुवात केली.

कचऱ्यात फेकलेल्या त्या काही थेंब पाण्याने आता चमत्कार घडवायला सुरुवात केली आहे. जळून गेलेल्या रोपांना पुन्हा नवी पालवी फुटू लागली आहे. मृतप्राय वाटणाऱ्या झाडांमध्ये पुन्हा जीवन संचारत आहे. या रोपांच्या वाढत्या हिरवाईतून पर्यावरण वाचवण्याची आशा पुन्हा जागी होत आहे. या उपक्रमातून इच्छाशक्ती असेल तर टाकाऊ वस्तूंमधूनही जीवन फुलवता येतेफक्त हा प्रेरणादायी संदेश समाजासमोर आला आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत अशाच पद्धतीने फेकून दिलेल्या बाटल्यांतील पाण्याचा वापर करून या झाडांचे संवर्धन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे अरुण पवार यांनी सांगितले. विशेष म्हणजे, यापूर्वीही त्यांनी मोर्बा रोडवरील झाडांच्या रोपांना काठ्या बांधून संरक्षण दिले होते. वादळाम ुळे निपचित पडलेल्या झाडांना टेकू देऊन पुन्हा उभे करण्याचे कामही त्यांनी गुरू माऊली संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने केले होते. आज एका पत्रकाराने केवळ बातम्या मांडण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण संवर्धनाचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. त्यांच्या या संवेदनशील आणि नि:स्वार्थ उपक्रमामुळे अनेक नागरिक प्रेरित होत असून, प्रत्येकाने एक झाड जगवले तर भविष्यातील पिढ्यांना हिरवेगार जीवन मिळेल, असा संदेश या कार्यातून दिला जात आहे.

यशवंत शिंदे यांचे निधन

। पाली/बेणसे। प्रतिनिधी ।

बौद्धजन पंचायत समितीचे माजी अध्यक्ष, बौद्ध समाज युवा संघ रायगडचे ज्येष्ठ मार्गदर्शक,बहुजन समाजाचे ज्येष्ठ नेते आणि बुद्ध, कबीर, छत्रपती शिवाजी महाराज, म हात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारधारेचे सच्चे पाईक यशवंत हिरु शिंदे यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी (दि.२६) रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले.



त्यांच्या निधनाने आंबेडकरी व बहुजन चळवळीवर शोककळा पसरली असून समाजाचा एक लढवय्या, अभ्यासू आणि लोकाभिमुख नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्या पच्छात चार मुले, सुना, नातवंडे, व मोठा परिवार आहे.

त्यांच्या निधनामुळे बहुजन, आंबेडकरी आणि सामाजिक चळवळीचे मोठे व अपूरणीय नुकसान झाले असून समाजमन हळहळले आहे. रायगड सह राज्यातील विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते, नागरिक आणि मान्यवरांकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दिवंगत यशवंत शिंदे यांचे जलदान विधी व शोकसभा रविवारी (दि. ७) डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृह सिद्धार्थ नगर रोहा येथे ठीक ११ वाजता होणार असल्याची माहिती शिंदे कुटुंबियांनी दिली.



राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक उन्नतीचे मार्ग खुले होतील. कलेतून धनार्जन वाढवण आहे. अनुकूलतेचा लाभ उठवावा.
- **वृषभ** : सरकारी कामं मनासारखी होतील. नोकरीत अधिकार वाढतील. नव्या कामांना गती प्राप्त होईल.
- **मिथुन** : योजलेल्या कामांना विलंब होईल. महत्त्वाचे निर्णय पूर्ण विचाराने घ्यावे. संघर्षातून प्रगती होईल.
- **कर्क** : आर्थिक प्रगती होत जाईल. नव्या कामांना गती प्राप्त होईल. महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत.
- **सिंह** : परिश्रमाने यश मिळत जाईल. अडचणीतून मार्ग निघणार आहे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका.
- **कन्या** : सुसंधी लाभणार आहेत. कार्यक्षेत्रात लगेच नवीन बदल करू नका. अचानक धनलाभ होईल.
- **तूळ** : योजलेली कामं मनासारखी होतील. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. अपेक्षित घटना घडतील.
- **वृश्चिक** : नव्या संधींचं स्वागत करावं. आत्मविश्वास वाढवणारा कालावधी आहे. अपेक्षित प्रगती होईल.
- **धनु** : अपेक्षित प्रगतीसाठी अधिक प्रयत्न करावे. नव्या कामांना गती प्राप्त होईल. सुसंधींचा लाभ घ्यावा.
- **मकर** : सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. प्रगतीचा कालावधी आहे. हाती घेतलेली कामं मनाजोगी होतील.
- **कुंभ** : प्रतिकूलता कमी होईल. नव्या कामांना गती प्राप्त होईल. महत्त्वाच्या घटनांनी दिलासा मिळेल.
- **मीन** : नव्या कामांना गती प्राप्त होईल. समाधानी रहावं. सरकारी कामं मनासारखी होणार आहेत.

२९ मे — दिनविशेष

१९९० : बोरिस येल्त्सिन रशियाच्या अध्यक्षपदी.
२०१३ : पारंपरिक सरकारी शिक्षणाला पर्याय ठरणाऱ्या खासगी विद्यापीठांचा मार्ग मोकळा.
२०१७ : जम्मू-काश्मीरमधील फुटीरतावाद्यांशी चर्चा करण्यास तयार नसल्याची भूमिका केंद्र सरकारने न्यायालयात स्पष्ट केली.
२०१८ : मिझोरामचे राज्यपाल म्हणून केरळचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष कुम्मानम राजशेखरन यांनी शपथ घेतली.

आरोग्यमंत्र — आवाजातील बदलांवरुन...

शरीरयंत्रणेतील काही बिघाड अनारोग्याचे निदर्शक असतात. शरीराला एखाद्या व्याधीने ग्रासल्यास लगेचच अथवा काही काळाने शारीरिक लक्षणं दिसू लागतात. मात्र काही लक्षणं दिसत नसली तरी अनेक आजार सुप्तावस्थेतच राहतात हेदेखील आपण समजून घ्यायला हवं. अशाप्रकारे एकीकडे आपण गाफील असतो तर दुसरीकडे शरीर व्याधीग्रस्त होत असतं. ही स्थिती टाळण्यासाठी संशोधक विविध आजारांचं वेळेत निदान करणाऱ्या पद्धती शोधून काढण्यात व्यग्र असलेले पहायला मिळतात. याचाच एक भाग म्हणून अमेरिकेतील संशोधकांच्या एका गटाने आवाजाच्या सहाय्याने मेंदूतील विकारांचं निदान करणारं उपकरण शोधून काढलं आहे. मेंदूतील काही विकार क्रॉनिक अवस्थेत पोहचल्यानंतरच समोर येतात. त्यामुळे रुग्णाला उपचार घेण्याची संधीच मिळत नाही. मात्र या उपकरणाच्या सहाय्याने आजार प्राथमिक अवस्थेतच समजतात आणि उपचारांती रुग्ण बरा होण्याची शक्यता वाढते. सध्या हे उपकरण चाचणी प्रक्रियेतून जात आहे. व्हॉईस ॲनॅलिसीस करणारं हे मशीन तज्ज्ञ आणि रुग्ण यांच्यामधील संवादाचा अभ्यास करतं. त्यासाठी मशीनमध्ये लर्निंग सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला आहे. या नव्या संवादाची आधीच्या डेटाबेसशी पडताळणी केली जाते. रुग्णाचा इमोशनल इंटेलिजन्सही लक्षात घेतला जातो. ही माहिती सर्व्हिस प्रोव्हायडरमध्ये संकलित केली जाते आणि त्यावरुन अनुमान काढलं जातं. 'केनरी स्पीच' असं या उपकरणाचं नाव आहे.



सफर देशांची — आगळा वेगळा पेरु!

पेरु हा दक्षिण अमेरिकेतला तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश आहे. पेरुमध्ये डोंगर, वाळवंटी प्रदेश, घनदाट जंगलं आणि समुद्रकिनारेही आहेत. 'लिमा' ही पेरुची राजधानी. या देशातले बरेच लोक पॅसिफिक महासागराच्या किनारी रहातात. राजधानी लिमासुद्धा पॅसिफिक महासागराच्या किनारी वसली आहे. इक्वाडोर, चिली, कोलंबिया, ब्राझील आणि बोलिव्हिया हे पाच देश पेरुचे शेजारी आहेत. पेरुच्या पश्चिम किनारपट्टीलगत रुंद असा २५०० किलोमीटर लांब वाळवंटी पट्टा आहे. या प्रदेशाने देशाचा फक्त १० टक्के भूभाग व्यापला असला तरी देशाची अर्धी लोकसंख्या याच भागात रहाते. पेरुचा अर्ध्यापेक्षा अधिक भाग ॲमेझॉनच्या जंगलांनी व्यापला आहे. या ठिकाणी अनेक प्रजातींची झाडं, प्राणी, पक्षी पहायला मिळतात. या प्रदेशांमध्ये बऱ्याच आदिवासी जमातीही रहातात. यातल्या अनेक जमातींचा बाहेरच्या जगाशी संबंधही आलेला नाही. या देशात अँडिज पर्वतरांगा आहेत. या पर्वतांच्या शिखरांवरचा बर्फ पर्यटकांना आकर्षित करतो. ट्रेकिंग आणि हायकिंगचा अनोखा अनुभव इथे घेता येतो. पेरुमधल्या एक किलोमीटरच्या जंगलपट्ट्यातच ६००० प्रजातींची झाडं पहायला मिळतात.

स्टाईल स्टेटमेंट — ऑफिस फॅशनचे बदलते ट्रेंड्स

ऑफिसमधल्या पोशाखाचा ठराविक बाज असतो. कॉर्पोरेटमधल्या महिला वेस्टर्न फॉर्मल्सवर भर देतात. कुर्ता लेगिंग, सलवार कमीज असे कपडेही कॅरी केले जातात. ऑफिसमध्ये स्टाईलसोबतच नेटकेपणाही लागतो. भडक रंगाचे, चित्रविचित्र प्रिंट्सचे कपडे घालता येत नाहीत. मात्र आपलं वेगळेपण जपण्यासाठी तुम्ही काही प्रयोग नक्कीच करू शकता. बॉलिवूडमधल्या अभिनेत्रींकडून कार्यालयीन पेहरावासाठी काही टिप्स घेता येतील.

❋ करिना कपूरने मध्यंतरी मिडी ड्रेस घातला होता. खाकी आणि हिरव्या रंगाचा हा ड्रेस साधा असला तरी स्टायलिश दिसत होता. त्यावर तिने साधासा पोनीटेल बांधला होता. कानात हुपला रिंग्ज घातल्या होत्या. न्यूड रंगाच्या हिल्सही कॅरी केल्या होत्या. अशा हिल्सऐवजी तुम्ही स्नीकर्स किंवा न्यूट्रल रंगाची फ्लॅट पादत्राणं घालू शकता.

❋ तुमच्याकडचं डेनिम जॅकेट कधीही वापरता येईल. आलिया भट्टने पांढऱ्या स्लीव्हलेस ड्रेसवर क्रॉप्ड डेनिम जॅकेट घातलं होतं. तुम्हीही स्लीव्हलेस ड्रेस किंवा कुर्त्यावर ते कॅरी करू शकता. **(क्रमशः)**

पंचांग

शुक्रवार, २९ मे २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ शु. १३, चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : स्वाती, योग : परिघ,
सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.०९

फॉरवर्ड्स

नहीं छोड़ी कमी क़िसी भीं रिश्ते क़ो निभानें में...

आने वाले क़ो रास्ता भी दिया औऱ जानें वाले क़ो रब क़ा वास्ता भी दिया...!

फॅशन पॅशन

उन्हाळ्यातल्या दुपारी मित्रमंडळींसोबत ब्रंचला जाताना आपला फॅशन सेंस जपायला हवा. तुमच्या ब्रंच सेशनसाठी या फॅशन टिप्स...

❋ कूल लूक मिळवायचा असेल तर ट्रेंडी टी शर्टवर एखादा ब्लेझर घाला. खूप उकडत असेल तर ब्लेझर काढूनही ठेवता येईल. एसीमध्ये ब्लेझर घाला.

❋ या दिवसात शॉर्टसपेक्षा फॅन्सी किंवा आरामदायी दुसरं काहीच नसतं. उन्हाळ्यात गारव्याची अनुभूती घ्यायची असेल तर पेस्टल शेड्सच्या शॉर्टस ट्राय करा. कॅमॉफ्लेज रंगही चालून जातील. **(क्रमशः)**

करिअरवाटा — क्षेपणास्त्र निर्मितीतील संधी

सध्या लष्कराच्या अत्याधुनिकीकरणावर तसंच शस्त्रसज्जतेवर दिला जात असलेला भर सर्वसामान्यांच्या नजरेतूनही सुटण्यासारखा नाही. भारतीय लष्कराला लागणारी शस्त्रास्त्रं तयार करण्याचं काम संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) या संस्थेतर्फे केलं जातं. या संघटनेतर्फे अनेक प्रकारची क्षेपणास्त्रंही विकसित केली जातात. शिवाय सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून काही प्रगत देशांच्या सहकार्यानं भारतातच विविध अत्याधुनिक क्षेपणास्त्रांच्या निर्मितीवर भर दिला जात आहे. क्षेपणास्त्रांची निर्मिती आणि चाचणी या क्षेत्रात मेकॅनिकल आणि एरॉनॉटिकल इंजिनिअरिंगसारखा अभ्यासक्रम पूर्ण करुन बाहेर पडलेल्या पदवीधरांना उत्तम वेतनाच्या नोकऱ्या प्राप्त होऊ शकतात. या प्रयोगशाळांमध्ये विविध प्रकारच्या चाचण्या घेतल्या जातात. त्यात उत्तीर्ण झाल्याखेरीज क्षेपणास्त्रं लष्करात वापरली जात नाहीत. त्यामुळे क्षेपणास्त्र तयार करण्याची कच्ची सामुग्री मिळवण्यापासून तयार झाल्यानंतरच्या प्रत्येक पायरीवर परीक्षेला उतरलीच पाहिजेत असा कटाक्ष असतो. याकामी अनेक प्रकारचे तज्ज्ञ गुंतलेले असतात. त्यामुळेच इथे मोठ्या संधी तुमची वाट पहात आहेत हे जाणून घ्या.



खेचाखेची — सोनेखरेदी बंद

आज आत्ता भाजी घ्यायला गेलो होतो. भाजीवाला भाजी अगदी काटेकोर वजन करून देत होता.

मी म्हटलं, काय हो, सोनारासारखं भाजी तोलताय?

.
.
.

भाजीवाला म्हणाला, सोनारच आहे मी!

वेगळं काही

मध्यंतरी सिंगापूरमध्ये आशिया खंडातली पहिली ग्रीन रूफटॉप असणारी बस सुरू झाली. 'गार्डन ऑन द मूव्ह' या अभियानाअंतर्गत ही बससेवा सुरू करण्यात आली आहे. या बसच्या टपावर दोन ग्रीन पॅनल बसवण्यात आले आहेत. त्यात मातीऐवजी कार्बन फायबरचा वापर करण्यात आला आहे. यामुळे या पॅनलचं वजन फक्त ४० किलो भरतं. या झाडांना जास्त पाणी द्यावं लागत नाही. वर्षातून दोन किंवा तीन वेळा देखरेखीची गरज भासते. ग्रीनरूफ बसेसमध्ये एसी लावावा लागत नाही. यामुळे २० टक्के इंधनाची बचत होते. बसच्या टपावर आणि आत सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. यामुळे बसच्या आतलं आणि बाहेरचं तापमान मोजता येतं.

संगोपन — मदत करा, ढवळाढवळ नको

कारकिर्दीची वाट ठरवताना मुलांबरोबर पालकांचाही चांगलाच गोंधळ उडताना दिसतो. या पार्श्वभूमीवर मुलांच्या करीअर निवडीत पालकांची काय भूमिका असावी याविषयी काही मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.

❋ कारकिर्दीचा कोणता पर्याय निवडावा याबद्दल मुलांच्या मनात संदिग्धता असते. तरुण वय असल्याने व्यावसायिक आव्हानांशी भिडणं त्यांना आकर्षित करू शकतं. पण व्यवसाय आणि नोकरीमधील मूलभूत बदल त्यांना समजावून सांगावा. याशिवाय दोहोंमधील फायदे आणि तोट्यांची जाणीव करून द्यावी. ❋ तरुण वयात मुलांना करीअरचे सगळेच मार्ग योग्य वाटतात. पण खरा कल कुठे आहे हे शोधायला त्यांना मदत करावी. ❋ स्वत:ची अपूर्ण स्वप्नं मुलांकडून पूर्ण करून घेण्याचा हट्ट कधी करू नये. अनेक पालक विशिष्ट पदावर जाण्याची स्वत:ची अपूर्ण इच्छा मुलांकडून पूर्ण होईल अशी अपेक्षा बाळगतात. त्यामुळे त्यांच्यावर भावनिक ताण येतो. अशा वेळी केवळ पालकांना खुश करण्यासाठी मुलं करीअरचा वेगळा मार्ग निवडतात. पण यावेळी अपयशाचा मोठा धोका असतो. ❋ मुलांना जगभरातील करीअरच्या संधींची माहिती द्यावी.



सुडोकू १०९

८	३	१		४		७		
७			५		८			२
	५						१	
		२			३		९	
६	१		४	८	७		५	३
	८		९			४		
	२						३	
१			३		२			७
		७		९		५	२	१

टीप -

❋ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


❋ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

❋ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १०८ चे उत्तर

७	५	१	९	८	६	३	४	२
८	३	२	५	१	४	९	७	६
४	६	९	२	३	७	५	१	८
६	२	४	७	९	१	८	५	३
५	८	३	६	४	२	१	९	७
१	९	७	८	५	३	२	६	४
२	१	६	३	७	९	४	८	५
९	७	८	४	२	५	६	३	१
३	४	५	१	६	८	७	२	९

शब्दकोडे क्रमांक १०९



आडवे शब्द :-

१) पूगीफल
३) वर्षाव
५) नियमित यात्रा करणारा
७) धनादेश
९) फणसातील खाद्य .
१०)गंध
११) गावठी
१३) वात,वायू
१४) कौतुक
१५) एकटा,शेणपाण्याचे शिंपण
१६) देवीच्या वणाने कुरुप झालेला चेहरा
१९) गवंड्याकडचा मोठा हातोडा
२०)आनंद
२१) शक्यता असलेले
२३) कबरस्तान,एक वाद्य
२४) भांडण
२७) भीती
२८) सूत्रे रचणारा ऋषी
३१) मरूत,पवन
३२) नरमच्या विरुद्ध
३४) केस
३५) मन तृप्त होईल इतके
३८) पूजा साहित्याचे ताट
३९) सेवक
४०) ओटा,चबुतरा
४१) वंदनाचा एक शब्द
४२) व्यायामशाळा
४५) अजगर
४६) बागवान
४९) वितरण
५०) ज्याला वतन मिळाले आहे असा
५३) आशीर्वाद देणारी देवी
५४) कसब, पटुत्व
५६) रानरेडा
५७) मृत्तिका
५८) वात्रट,खट्याळ
६०) खोडण्याचे साधन
६१) योग्य, उचित,बरोबर
६३) पांढरा रंग
६४) बाजेला विणण्याची सुती पट्टी

उभे शब्द :-

१) स्वयंपाक उत्तम करणारी
२) पारद
३) महिना झाड
४) परमेश्वर
५) काळ्या तोंडाचे माकड
६) चंद्राकृती गोड पदार्थ
७) तोंडावळा
८) केव्हा (ग्रा.)
१०) उसाचे पीक
११) मोठी बैलगाडी
१२) राखण करणारा
१४) गर्द लाल रंग
१५) हजरजबाबीपणा
१७) लाजरा❋❋❋ ; बुजणारा
१८) जादूटोणा
२२) नवरदेव
२५) मध्यस्थ
२६) कावळा
२९) आखलेला बेत
३०) लोकांचा जमाव
३३) अस्थिर,हलणारे
३४) हिंदीत केव्हा
३५) चार आठवड्याचा काळ
३६) धान्याचा ढीग
३७) जुगार
३८) अंधार
४०) अंबट ढेकर
४१) श्री विष्णूचा सातवा अवतार
४३) भास्कराचार्यांचा गणिती ग्रंथ
४४) घराणे
४५) कहाणीतील गाव
४७) चानी
४८) साडेसाती
५१) हवालदार
५२) न्यायालयातील खटला
५५) सामान साठविण्याची जागा
५७) शिक्षक
५९) दात
६१) पोपट
६२) सणांचा मराठी महिना
६३) श्रीमंत
६५) उत्तराधिकारी
६७) पिवळ्या फळांचे एक कालवण अधिक श्रेष्ठ,वरचढ
६९) लढाई,खेळाडूंच्या दोन गटातील चुरशीची स्पर्धा
७०) बर्फ
७१) गळ्यामागचा अवयव
७२) दाह,जाळ
७३) आठवण
७४) चांदणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागच्या शब्दकोड्याचे उत्तर

बा	ळ	गं	गा	ध	र	टि	ळ	क	■	भा	क	■	ज	व	स
ळ	■	गा	■	रा	स	■	■	च	ल	न	व	ल	न	■	मे
बो	ळ	व	ण	■	भ	र	भ	रा	ट	■	डी	■	री	■	ट
ध	■	न	■	प	री	क्ष	क	■	का	या	■	पा	त	क	■
■	द	■	त	ण	त	ण	■	प	व	न	पु	त्र	■	र	सा
अ	स	ह	म	ती	■	क	च	र	णे	■	र	■	को	प	रा
ज	रा	■	कू	■	वा	र्ता	■	दे	■	म	स्का	मा	र	णे	■
ब	■	अ	प	हा	र	■	ना	श	क	■	र	■	फ	■	हो
ला	य	क	■	ट	ण	क	■	ग	र	ज	■	को	ड	गा	■
■	■	स्मा	र	क	■	स	का	म	■	बा	ज	री	■	य	क्ष
ज	प	त	प	■	पं	क	■	न	बा	ब	■	व	च	न	■
न	त	■	का	ट	क	स	र	■	■	दा	टी	■	र	■	पा
मा	न	व	■	र	ज	■	सो	प	स्का	र	■	वा	च	नी	य
न	■	स	रा	फ	■	वा	ई	ट	■	■	बा	स	री	■	ल
स	द	न	■	ल	वा	द	■	की	र	वा	ल	■	त	रू	■
■	र्या	■	वा	■	चा	क	री	■	वा	स	क	ट	■	प	ल्ला

निवडक

वैभवला मुंबई इंडियन्सची ऑफर

नवी दिल्ली : इंडियन प्रीमिअर लीगचे १९ वे पर्व जगभरात लक्षात राहिल ते १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या फटकेबाजीने राजस्थान रॉयल्सच्या या सलामीवीराने १५ सामन्यांत २४२.८५ च्या स्ट्राईक रेटने सर्वाधिक ६८० धावा चोपल्या आहेत. सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या एलिमिनेटर सामन्यात तर त्याच्या वादळाने गोलंदाजांचा पालापाचोळा केला. त्याचा प्रत्येक फटका हा डोळ्यांचे पारणे फेडणारा होता आणि त्याने युनिव्हर्स बॉस ख्रिस गेल याचा वर्ल्ड रेकॉर्डही काल मोडला.वैभव सूर्यवंशीला आयपीएलमध्ये मोठी डिमांड आली आहे आणि जर तो लिलावात दाखल झाला, तर त्याच्यासाठी हवी ती किंमत मोजण्यास फ्रँचायझी तयार आहेत. अशात मुंबई इंडियन्सने युवा फलंदाजाला ३० कोटींची ऑफर दिल्याचे वृत्त समोर आले आहे.मुंबई इंडियन्सच्या मालकीण नीता अंबानी यांनी वैभव सूर्यवंशीला मुंबई इंडियन्सकडून खेळण्यासाठी ३० कोटी रुपयांची ऑफर दिली आहे.त्यांनी त्याला अँटिलियामध्ये एक फ्लॅट आणि मालदीवमध्ये एक खाजगी बेट देण्याचीही ऑफर दिली आहे.वैभवने मुंबई इंडियन्समध्ये यावे यासाठी, त्याच्या पालकांना एक ब्लँक चेक देखील देऊ करण्यात आला आहे.

सुवर्णपदक विजेते रणधीर यांचे निधन

नवी दिल्ली : आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला नेमबाजीतील पहिले सुवर्णपदक मिळवून देणारे नेमबाज रणधीर सिंग यांचे बुधवारी निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते आणि दीर्घकाळापासून वयोमानानुसार आजारांशी झुंज देत होते.माजी नेमबाज रणधीर यांनी नुकतेच प्रकृतीच्या कारणास्तव ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशियाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यांची २०२४ मध्ये ४ वर्षांच्या कार्यकाळासाठी निवड झाली होती.रणधीर यांनी १९७८ च्या बँकॉक आशियाई क्रीडा स्पर्धेतील ट्रॅप शूटिंग प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते. त्यांनी ५ ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा आणि एका राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांना १९७९ मध्ये अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.रणधीर त्यांच्या मागे पत्नी विनीता आणि ३ मुली (महिमा, सुनैना आणि राजेश्वरी) सोडून गेले आहेत. त्यांची मुलगी राजेश्वरी आंतरराष्ट्रीय स्तरावर ट्रॅप शूटिंग करते. राजेश्वरीने २०२२ च्या आशियाई खेळांमध्ये रौप्य पदक जिंकले होते.



आशियाई स्पर्धांचे यजमानपद भारताकडे

नागपूर : भारताला पुढील वर्षी होणाऱ्या आशियाई रिले आणि २०२८ मध्ये होणाऱ्या आशियाई इनडोअर स्पर्धेचे यजमानपद बहाल करण्यात आले आहे. हाँगकाँग येथे झालेल्या आशियाई ॲथलेटिक्स संघटनेच्या बैठकीत या दोन स्पर्धांचे यजमानपद भारताला देण्यात आले.रिले स्पर्धा चंडीगड तर इनडोअर स्पर्धा भुवनेश्वर येथे होणार असल्याची माहिती भारतीय ॲथलेटिक्स महासंघाचे अध्यक्ष बहादूरसिंग सग्गू यांनी दिली. या दोन स्पर्धांमुळे भारतातील ॲथलेटिक्सला आणखी चालना मिळेल, असा विश्वास सग्गू यांनी व्यक्त केला.या दोन स्पर्धांच्या निमित्ताने आशियातील दिग्गज ॲथलीटची कामगिरी पाहण्याची संधी भारतीय क्रीडाप्रेमींना मिळणार आहे. आशियाई इनडोअर ॲथलेटिक्स स्पर्धेचे यजमानपद भुवनेश्वरला मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करून ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरन माझी म्हणाले, यामुळे ओडिशा व देशातील क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन मिळेल.त्याचप्रमाणे भुवनेश्वर येथेच २०२८ मध्ये होणाऱ्या जागतिक इनडोअर स्पर्धेच्या आयोजनासाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध होईल.



गोलंदाज रँडॉल्फ डॅनिएल यांचे निधन

पुणे : महाराष्ट्राचे माजी रणजीपटू वेगवान गोलंदाज रँडॉल्फ डॅनिएल (वय ६२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे.मूळचे दौंडचे रहिवासी असलेल्या रँडॉल्फ डॅनिएल यांनी १९८२ ते १९९८ दरम्यान १६ प्रथम श्रेणी सामन्यांत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. वेगवान गोलंदाज म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीत एकूण ३५ गडी बाद केले होते.यात ६० धावांत ६ विकेट ही त्यांची सर्वोत्तम कामगिरी ठरली होती. कोल्हापूर येथे वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या तीन दिवसीय सामन्यात त्यांनी पश्चिम विभागाचे प्रतिनिधित्व केले होते. एका प्रतिभावान खेळाडूला महाराष्ट्र मुकला आहे.त्यांची कारकीर्द अल्पशी असली, तरी त्यांनी आपल्या गोलंदाजीचा प्रभाव पाडला होता, अशा शब्दांत महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.



रेयांश व्यंकटचा विजयी षटकार

मुंबई : रेयांश व्यंकट याने अव्वल मानांकित श्रेयांश सोमय्या याचा पराभव करून अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर स्पर्धेच्या चौथ्या सत्रात सहाव्या फेरीनंतर एकेरी आघाडी मिळवली. त्याने सर्वाधिक ६ गुणांसह स्पर्धेत दबदबा राखला आहे.मुंबई चेस सेंटरच्या वतीने पेडर रोड येथील रशियन हाउसमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत रेयांशने शानदार खेळाचे प्रदर्शन केले. काळ्या मोहऱ्यांसह खेळताना रेयांशने सुरुवातीपासूनच सामन्यावर नियंत्रण राखले. सुरुवातीला काहीसा सावध पवित्रा घेतल्यानंतर रेयांशने आक्रमक चाली रचत श्रेयांशला दबावात आणले. त्याने आपल्या राजासह प्याद्यांच्या जोरावर श्रेयांशवर सतत दबाव कायम ठेवला. अखेर, रेयांशने लढतीवर पूर्ण नियंत्रण मिळवल्यानंतर सलग सहावाविजय नोंदवला आणि अव्वल स्थान पटकावले. दुसऱ्या पटावर जान्हवी सोनेजी हिने दमदार फॉर्ममध्ये असलेल्या ध्रुव मुठे याचा पराभव करून ५.५ गुणांसह संयुक्त दुसरे स्थान गाठले. स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत जान्हवीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. अव्वल मानांकित शार्दूल कदम आदित्य याने अहान कटारुका विरुद्ध विजय मिळवत पुनरागमनाची मालिका कायम राखली. गौरंग भंडारी याने महत्त्वाच्या लढतीत विहान रवी राव याला बरोबरीत रोखले.

नेमबाजी विश्वकरंडक स्पर्धा

म्युनिचमध्ये फडकला तिरंगा

- मनू भाकर, राही सरनोबत अपयशी
- ईशा सिंगचे विश्वविक्रमासह सुवर्णपदक

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताच्या ईशा सिंगने म्युनिच येथे सुरू असलेल्या नेमबाजी विश्वकरंडकात ऐतिहासिक कामगिरी केली. तिने महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात विश्वविक्रमासह सुवर्णपदकाची कमाई केली. ईशा सिंगने अंतिम फेरीमध्ये ४३ गुणांची कमाई करताना नेत्रदीपक कामगिरी केली. भारताचे या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतील हे पहिले पदक होय.

ईशा सिंग हिने अंतिम फेरीमध्ये उल्लेखनीय खेळ केला. त्यामुळे तिच्या या सुवर्णपदकाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त आहे. जर्मनीच्या माजी विश्वविजेत्या डोरीन वेनेकॅम्प हिला ३८ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तसेच बल्गेरियाच्या मिरोस्लावा मिनचेवा हिने ३१ गुणांसह ब्राँझपदकाची कमाई केली.

ऑलिंपिक पदकविजेती यांग जिन हिची पाचव्या स्थानावर घसरण झाली. ऑलिंपिक पदकविजेती मनू भाकर व महाराष्ट्राची खेळाडू राही सरनोबत या भारताच्या अनुभवी नेमबाजांना या स्पर्धेतील महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात अपयशाचा सामना करावा लागला. मनू भाकर ही पात्रता फेरीत १२व्या स्थानी राहिली. राही सरनोबत हिला १४व्या स्थानावर समाधान मानावे लागले.



म्युनिचमधील स्पर्धा माझ्यासाठी खूप महत्त्वाची होती. विशेषतः पिस्तूल प्रकारात, कशा प्रकारची स्पर्धा असते, हे सर्वांनाच माहीत आहे. म्हणजे, पहिल्या आठमध्ये स्थान मिळवणेसुद्धा खूप आव्हानात्मक असते. इथे येण्याची ही माझी तिसरी वेळ असल्याने मला हे जिंकायचेच होते. माझ्यासाठी हा अनुभव मोलाचा ठरला. मी फक्त स्वतःवर, माझ्या कार्यपद्धतीवर आणि सरावात केलेल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केले आणि त्याचे फळ मला मिळाले. कोरियाला दोन पदके कोरिया देशातील खेळाडूंनी पहिल्या दोन दिवसांतील स्पर्धेच्या निकालानंतर दोन पदकांसह पहिले स्थान पटकावले आहे. कोरियन नेमबाजांकडून एक सुवर्ण व एक रौप्यपदक पटकावण्यात आलेले आहे. जर्मनीच्या नेमबाजांनीही दोन पदके पटकावली आहेत. मात्र, त्यांनी रौप्य व ब्राँझ अशी पदकांची कमाई केलेली आहे. चीन, भारत व नॉर्वे या देशांतील नेमबाजांनी प्रत्येकी सुवर्णपदक पटकावले आहे.

मायशा परवेझने कॉमनवेल्थ यूथ रॅपिड चेस चॅम्पियनशिप जिंकली

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



भारताची उदयोन्मुख बुद्धिबळपटू मायशा परवेझने कॉमनवेल्थ यूथ रॅपिड चेस चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले आहे. ही चॅम्पियनशिप १७ मे ते २५ मे दरम्यान श्रीलंकेतील कालूतरा येथे खेळली गेली.१४ वर्षीय मायशाने अंडर-१४ मुलींच्या गटातील रॅपिड चेसमध्ये पहिले स्थान पटकावले. तिने ९ फेऱ्यांमध्ये ७.५ गुण मिळवले.

मायशा पहिल्या फेरीत यजमान देशाच्या येसांदी विक्रमराचीकडून हरली. ती पहिल्या फेरीनंतर १७व्या स्थानावर होती. येथून मायशाने सलग ५ विजय मिळवून दमदार पुनरागमन केले. सहाव्या फेरीनंतर ती गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आली होती. तेव्हा तिच्याकडे ५ गुण होते. मायशाने दुसऱ्या फेरीत श्रीलंकेच्या विश्व विमुक्तीला हरवले आणि गुणतालिकेत ६ गुणांच्या वाढीसह ११व्या स्थानावर पोहोचली.मायशाने तिसऱ्या फेरीत उदाणी साविनद्या, चौथ्या फेरीत सनुली यहांसा परेरा, पाचव्या फेरीत सेनुधी अहस्या जयसिंघे आणि सहाव्या फेरीत दिव्याश्री कोल्लीपाराला हरवले.

मायशाने सातव्या फेरीत श्रीलंकेच्या विमेन फीडे मास्टर सेथुमली देवहारा पल्लियागेला ड्रॉ खेळण्यास भाग पाडले आणि गुण वाटून घेतले.

हैदराबाद आयपीएलमधून बाहेर

राजस्थानने ४७ धावांनी हरवले: आर्चरने ३ बळी घेतले

| न्यू चंदीगड | वृत्तसंस्था |

सनरायझर्स हैदराबाद आयपीएल २०२६ मधून बाहेर पडला आहे. एलिमिनेटर सामन्यात राजस्थान रॉयल्सने या संघाला ४७ धावांनी पराभूत केले. राजस्थानचा सामना २९ मे रोजी न्यू चंदीगड येथे क्वालिफायर २ मध्ये गुजरात टायटन्सशी होईल. या सामन्याचा विजेता ३१ मे रोजी अहमदाबाद येथे रॉयल चॅलेंजर्स बंगळूरविरुद्ध अंतिम सामना खेळेल.बुधवारी, मुल्लानपूर येथील महाराजा यादवेंद्र सिंग स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने २० षटकांत ८ गडी गमावून २४३ धावा केल्या. प्रत्युत्तरात, हैदराबादचा संघ १९.२ षटकांत १९६ धावांवर सर्वबाद झाला.

२४४ धावांचे लक्ष्य गाठताना हैदराबादची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. जोफ्रा आर्चरने पहिल्याच षटकात अभिषेक शर्माला शून्यावर बाद केले, त्यानंतर इशान किशन (३३) आणि ट्रॅव्हिस हेड (१७) यांना बाद करून सामन्याचे चित्रच पालटले. त्यानंतर नितीश रेड्डीने ३८ आणि सलील अरोराने ३५ धावा करण्यासाठी संघर्ष केला, पण संघ १९.२ षटकांत १९६ धावांवर सर्वबाद झाला.राजस्थानसाठी आर्चर सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला, त्याने ४ षटकांत ५८ धावा देऊन ३ बळी घेतले. नांद्रे बर्गर, रवींद्र जडेजा आणि सुशांत मिश्रा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले, तर यश पुंजाने १ बळी घेतला.

पॅरा भालाफेकपटू सुमीतने मोडला स्वत:चाच जागतिक विक्रम

७४.८२ मीटर लांब भाला फेकला; दोनदा पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले

| बेंगळुरू | वृत्तसंस्था |

पॅरा भालाफेकपटू सुमीत अंतिलने स्वत:चाच जागतिक विक्रम मोडला. बुधवारी बेंगळुरूमध्ये त्याने ७४.८२ मीटर लांब भाला फेकला. सुमितने ही कामगिरी ८व्या इंडियन ओपन पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये पुरुषांच्या भालाफेक ६४ स्पर्धेत केली. त्याने पाचव्या प्रयत्नात ही उपलब्धी मिळवली. आशियाई पॅरा गेम्समध्ये ७३.२९ मीटरची फेक केली होती. सुमितने स्वत:चाच जुना जागतिक विक्रम मोडला.

यापूर्वी त्याने २०२३ मध्ये चीनमधील हांगझोऊ येथे झालेल्या आशियाई पॅरा गेम्समध्ये ७३.२९ मीटरची फेक केली होती. यावेळी त्याने आपल्या मागील सर्वोत्तम कामगिरीपेक्षा १.५३ मीटर जास्त अंतर गाठले.

सुमितने आतापर्यंत सात वेळा जागतिक विक्रम मोडले आहेत. त्याने जून २०१९ मध्ये इटलीमध्ये झालेल्या वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्समध्ये ६०.४५ मीटर भाला फेकून पहिला जागतिक विक्रम प्रस्थापित केला होता. त्या स्पर्धेत त्याने रौप्य पदकही जिंकले होते.



त्यानंतर नोव्हेंबर २०१९ मध्ये दुबईमध्ये झालेल्या वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये त्याने ६२.८८ मीटरचा थ्रो केला. मार्च २०२१ मध्ये बेंगळुरू येथे झालेल्या नॅशनल पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुमितने ६६.९० मीटरचा थ्रो करून पुन्हा नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला.

ऑगस्ट २०२१ मध्ये टोकियो पॅरालिम्पिकच्या अंतिम फेरीत सुमितने एकाच सामन्यात तीन वेळा विश्वविक्रम मोडला. त्याने ६६.९५ मीटर, ६८.०८ मीटर आणि शेवटी ६८.५५ मीटरचा थ्रो केला. याच कामगिरीसह त्याने सुवर्णपदक जिंकले.त्यानंतर, जुलै २०२३ मध्ये पॅरिस येथे झालेल्या वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुमितने पहिल्यांदा ७० मीटरचा टप्पा ओलांडला. त्याने ७०.८३ मीटरचा थ्रो करून सुवर्णपदक पटकावले.

नीरज चोप्राकडून प्रेरणा मिळाली- सुमित

सुमितला २०२१ मध्ये मेजर ध्यानचंद खेल रत्न आणि २०२२ मध्ये पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले. सुमित हरियाणाच्या सोनीपतचा आहे आणि ऑलिम्पिक पदक विजेता कुस्तीपटू योगेश्वर दत्तला आपला आदर्श मानतो. तसेच, भालाफेकपटू नीरज चोप्राकडूनही त्याला खूप प्रेरणा मिळाली आहे.

भारत दौऱ्यासाठी अफगाण संघात अटल-रहमतचे पुनरागमन

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

अफगाणिस्तानने भारत दौऱ्यासाठी कसोटी आणि एकदिवसीय संघाची घोषणा केली आहे. भारताविरुद्ध ६ जूनपासून न्यू चंदीगड येथे होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यासाठी सेदीकुल्लाह अटल, रहमत शाह आणि अष्टपैलू अजमतुल्लाह ओमरझाई यांचे संघात पुनरागमन झाले आहे. तर फिरकीपटू रशीद खान कसोटी संघातून बाहेर पडला आहे.

हश्मतुल्लाह शाहिदीच्या नेतृत्वाखालील १५ सदस्यीय कसोटी संघात अटल आणि ओमरझाई यांना स्थान मिळाले आहे. दोन्ही खेळाडूंनी आतापर्यंत फक्त एक-एक कसोटी सामना खेळला आहे, जो त्यांनी २०२४ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध खेळला होता. अनुभवी फलंदाज रहमत शाह देखील संघात परतला आहे. त्याने अफगाणिस्तानच्या १२ पैकी ११ कसोटी सामने खेळले आहेत आणि मागील झिम्बाब्वे कसोटी सामना तो खेळला नव्हता.

मुख्य प्रशिक्षक रिचर्ड पायबस यांनी अलीकडेच राशिद खानला दीर्घकालीन तंदुरुस्तीला प्राधान्य देण्याचा सल्ला दिला होता. याच कारणामुळे राशिदला पुन्हा एकदा कसोटी संघात स्थान देण्यात आले नाही. त्याच्या अनुपस्थितीत कायस अहमद फिरकी आक्रमणाचे नेतृत्व करताना दिसू शकतो. त्याच्यासोबत शराफुद्दीन अशरफ आणि नांगेयालिया खारोटे फिरकी विभागाची जबाबदारी सांभाळतील.

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामना न्यू चंदीगडमध्ये खेळला जाईल. यानंतर दोन्ही संघांमध्ये तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका होईल, जी १४ जूनपासून धर्मशाळा येथे सुरू होईल.तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी निवडलेला संघ गेल्या वर्षी बांगलादेशला क्लीन स्वीप देणाऱ्या संघासारखाच आहे. डावखुरा वेगवान गोलंदाज फरीद मलिकचे पुनरागमन झाले आहे. त्याने शेवटचा वनडे सामना २०२४ मध्ये खेळला होता.

आयर्लंडविरुद्ध टॉम ब्लंडेलचे शतक

| बेलफास्ट | वृत्तसंस्था |

न्यूझीलंडने आयर्लंडविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात दमदार सुरुवात केली आहे. बुधवारी स्टंप्सपर्यंत संघाने ५ गडी गमावून ३६१ धावा केल्या. टॉम ब्लंडेल १४२ आणि डीन फॉक्स क्रॉफ्ट ३८ धावांवर नाबाद राहिले.



पहिल्या सत्रात संघाने ८६ धावांत ४ गडी गमावले होते. येथून रचिन रवींद्र आणि टॉम ब्लंडेलने शतके झळकावून डाव सावरला. दोघांनी पाचव्या विकेटसाठी विक्रमी २१७ धावांची भागीदारी केली.मार्क अडायरने दिवसाच्या सुरुवातीलाच कीवी सलामीवीरांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्याने दुसऱ्याच चेंडूवर टॉम लॅथमला इन स्विंग चेंडूवर बोल्ड केले. नंतर डेव्हॉन कॉन्वेला पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या लियाम मॅकार्थीच्या हाती झेलबाद केले. मॅकार्थीने केन विल्यमसनला (३६ धावा) करून कसोटी कारकिर्दीतील पहिले विकेट घेतले. नंतर अडायरने डॅरिल मिचेललाही यष्टिरक्षकाच्या हाती झेलबाद केले.

३८व्या षटकात रुबेन विल्सनच्या चेंडूवर दुसऱ्या स्लिपमध्ये अँड्र्यू बालबर्नीने रचिन रवींद्रचा सोपा झेल सोडला. यानंतर रचिन आणि ब्लंडेलने दुसऱ्या सत्रात एकही विकेट पडू दिले नाही. दोघांनीही वेगाने धावा केल्या.रचिनने ७०व्या षटकात मॅककार्थीच्या चेंडूवर स्विवेल पुल शॉटवर षटकार मारून १७५ चेंडूंमध्ये आपले ५वे कसोटी शतक पूर्ण केले. शतकानंतर तो हॅरी टेक्टरच्या चेंडूवर डीप मिडविकेटमध्ये झेलबाद झाला. टॉम ब्लंडेलने अँडी मॅकब्राइनच्या चेंडूवर स्वीप शॉट मारून कसोटी कारकिर्दीतील सहावे शतक पूर्ण केले.

पाटीदारने केली धोनी-रोहितची बरोबरी

| धर्मशाला | वृत्तसंस्था |

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने सलग दुसऱ्या हंगामात फायनलमध्ये स्थान मिळवले. धर्मशाळा येथे खेळल्या गेलेल्या क्वालिफायर-१ मध्ये संघाने गुजरात टायटन्सला ९२ धावांनी हरवून विजय मिळवला. कर्णधार रजत पाटीदारने या विजयासह एमएस धोनी आणि रोहित शर्माची बरोबरी केली. तो सलग दोन आयपीएल फायनलमध्ये संघाला पोहोचवणारा पाचवा कर्णधार ठरला.

पाटीदारने फलंदाजीतही कमाल केली आणि सर्वात जलद



२०० षटकार मारणारा भारतीय फलंदाज बनला. त्याने या बाबतीत अभिषेक शर्माचा विक्रम मोडला. पाटीदारच्या नाबाद ९३ धावांच्या खेळीमुळे बंगळुरूने आयपीएल प्लेऑफ इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्याही उभारली.

महिला क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेचा शुभारंभ

| रायगड | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीनेप्रथमचसंपूर्ण रायगड जिल्ह्यातील उत्कृष्ट आणि उदयोन्मुख महिला खेळाडूंसाठी टी ट्वेन्टी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

गव्हाण उलवे येथील सुसज्ज असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर ह्या महिला क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेला शुभारंभ करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील पुरुषांच्या बरोबरीने महिला क्रिकेट खेळला चालना देण्याच्या उद्देशाने



व भविष्यात रायगडच्या महिलांचा क्रिकेट संघ मजबूत करण्यासाठी ह्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले. समीरा तुळपुळे, चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर संघ मालक आकाश पटारिया अशा चार संघांचा समावेश स्पर्धेत करण्यात आला असून स्पर्धा २८ मे ते २ जून पर्यंत प्रथम साखळी व त्यानंतर बाद फेरीनुसार आयोजित केली आहे. स्पर्धेत सहभागी महिला खेळाडूना आरडीसीएच्या वतीने रंगीत गणवेश देण्यात आला आहे. हि स्पर्धा स्पर्धा यूट्यूबच्या माध्यमातून लाइव्ह असणार आहे. रायगड जिल्ह्यातील नामवंत महिला खेळाडू तसेच महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झालेल्या महिला खेळाडुंचा सहभाग ह्या स्पर्धेत असणार आहे.

असाउबायेवाला झाली पराभूत | गुकेश सलग दुसऱ्या फेरीत हरला

नॉर्वे चेसमध्ये प्रज्ञानानंदाने कार्लसनला हरवले

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानानंदाने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत जगातील नंबर-१ खेळाडू मॅग्नस कार्लसनला हरवून मोठा उलटफेर केला. तर, वर्ल्ड चॅम्पियन डी गुकेश सलग दुसऱ्या फेरीत हरला. पुढील फेरीत त्याचा सामना मॅग्नस कार्लसनशी होईल.प्रज्ञानानंदाने क्लासिकल सामन्यात कार्लसनला हरवून तीन गुण मिळवले. या विजयामुळे तो ४.५ गुण घेऊन दुसऱ्या स्थानावर पोहोचला. महिलांच्या गटात दिव्या देशमुखने विजयाची मालिका कायम ठेवली आहे. ती दुसऱ्या स्थानावर आहे.



प्रज्ञानानंदाने नॉर्वे चेसमध्ये क्लासिकल फॉरमॅटमध्ये कार्लसनला दुसऱ्यांदा हरवले आहे. त्याने २०२४ मध्येही माजी वर्ल्ड चॅम्पियनला हरवले होते. भारतीय खेळाडू म्हणाला की सामना खूप अटीतटीचा होता आणि टाइम स्क्रॅम्बलमध्ये निकाल कोणत्याही बाजूने जाऊ शकला असता. सात वेळा चॅम्पियन राहिलेला कार्लसन सहा खेळाडूंच्या गुणतालिकेत १.५ गुणांसह सर्वात खाली आहे. विश्वविजेता डी गुकेशची खराब फॉर्म कायम राहिली. फ्रान्सच्या अलीरेझा फिरोजा याने त्याला आर्मगेडन सामन्यात हरवून १.५ गुण मिळवले. सुमारे ५ तास चाललेला क्लासिकल सामना ड्रॉ राहिला, पण आर्मगेडनमध्ये फिरोजा जिंकला.

दिव्या देशमुखची चमकदार कामगिरी

महिला गटात भारताच्या दिव्या देशमुखने टूर्नामेंट लीडर बिबिसारा असाउबायेवाला आर्मगेडनमध्ये हरवून तिसरा टायब्रेकर विजय मिळवला. ती ४.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. तर कोनेरू हम्पी अन्ना मुजिचुककडून हरून दोन गुणांसह शेवटच्या स्थानावर आहे. बुद्धिबळात आर्मगेडन हा एक सडन-डेथ टाय-ब्रेकर गेम असतो, जो तेव्हा वापरला जातो जेव्हा एखादी स्पर्धा किंवा सामना ड्रॉ होतो आणि निकाल काढणे आवश्यक असते. यात ड्रॉ होण्याची शक्यता नसते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)